

जनमाध्यम

✦ अमरावती, मंगळवार १० नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १० एक प्रतिष्ठित सवय



देशभरात फटाक्यामुळे २५ जणांचा होरपळून मृत्यू

दिल्ली/नागपूर/पुणे /वृत्तसंस्था -दिवाळीच्या उत्साहादरम्यान देशातील काही राज्यांमधून आग लागण्याच्या घटना समोर आल्या आहेत. फटाक्यांमुळे आणि शॉर्ट सर्किटमुळे भडकलेल्या आगीत देशभरात २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. मध्य प्रदेशात सर्वाधिक १३, तर महाराष्ट्रात ६ जणांचा आगीत होरपळून मृत्यू झाला आहे.

राजस्थानच्या पाली येथे फटाक्यांच्या दुकानाला आग लागून दोन जणांचा मृत्यू झाला, तर तीन जण बेपत्ता आहेत. आगीच्या भक्ष्यस्थानी तीन दुकाने आणि अनेक दुचाकी वाहनेही जळून खाक झाली. दरम्यान, दिल्लीतील नरेला येथे रॉकेट फटाका पोटाला लागल्याने १० वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. जम्मूच्या नेहरू मार्केटमध्ये लागलेल्या आगीत १२ हून अधिक दुकाने जळून खाक झाली, तर उत्तर प्रदेशातील बांदा येथे भंगाराच्या दुकानाला आग लागल्याने सुमारे २०-२५ लाख रुपयांचे नुकसान झाले. दुकानमालकाने फटाके फेकून आग लावल्याचा आरोप केला आहे. नागपूरमध्ये टीव्हीएसच्या शोरूमला आग लागल्याने अनेक दुचाकी वाहने जळून खाक झाली. सिक्कीमच्या गंगटोकमध्ये सरकारी निवासस्थानाला, तर महाराष्ट्रातील ठाणे येथे १७ मजली इमारतीला आग लागली. ठाणे येथे कोणालाही दुखापत झाल्याची माहिती नाही.महाराष्ट्रातील पुण्यात दिवाळीच्या दिवशी आगीच्या ६३ घटना नोंदवण्यात आल्या. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. मुंबईतील डोंगरी परिसरात आगीमुळे अनेक दुकाने आणि झोपड्या जळून खाक झाल्या, तर दादर येथील कामगार स्टेडियममध्ये लागलेल्या आगीवर अग्निशमन दलाच्या जवानांनी ➪(पान २ वर)

राज्यात आगीचे तांडव!

नागपुरात ४३ ठिकाणी आग

मुंबई /प्रतिनिधी- दिवाळीच्या पहिल्यादिवशी लक्ष्मीपूजनावेळी रविवारी (८ नोव्हेंबर) राज्यात अनेक ठिकाणी आगीच्या घटनांनी गालबोट लागल्याचे दिसून आले. दिवाळीच्या रात्री राज्यात अनेक शहरांमध्ये फटाक्यांची आतिषबाजी आणि इतर कारणांमुळे आगीच्या भीषण घटना घडल्या. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, धुळे, अहिल्यानगर, बीड आणि नागपूरसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये अग्निशमन दलाला आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी मोठी धावपळ करावी लागली. फटाक्यांच्या आतषबाजीमुळे नागपूर शहरात तब्बल ४३ ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या आहे. फटाक्यांमुळे लागलेल्या या आगींमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले. यात सर्वात मोठी घटना देवनगर परिसरात घडली, इथे असलेल्या एका दुचाकी शोरूमला भीषण आग लागल्याने शोरूममधील सुमारे ४० ते ४५ नव्या को-या दुचाकी गाड्या जळून खाक झाल्या आहे.मुंबईतील डोंगरी येथील हाजी कासम चाळ परिसरातील पत्र्याची दुकाने आणि गॅरेजला भीषण आग लागली. या आगीने रौद्र रूप धारण केल्यामुळे परिसरातील ३० हून अधिक झोपड्या आणि दुकाने खाक झाली. याशिवाय, जोगेश्वरी, अंधेरी, मालवणी आणि कांदिवली अशा चार ठिकाणी आगी लागल्याच्या घटना ➪(पान २ वर)



फटाक्यांच्या धुरामुळे विमानसेवा विस्कळीत

बंगळुरू : फटाक्यांच्या धुरामुळे चेन्नई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील विमानसेवा विस्कळीत झाली. धुरामुळे धावपट्टीवर दृश्यमानता कमी झाल्याने २६ विमानांच्या उड्डाण व आगमनावर परिणाम झाला. रायपूरहून येणारे इंडिगोचे एक विमान बंगळुरूकडे वळवावे लागले. संध्याकाळी चेन्नई आणि उपनगरांमध्ये फटाके फोडण्याचे प्रमाण वाढले. रात्री १० नंतरही अनेक भागांत फटाके फोडणे ➪(पान २ वर)



धाराशिवमध्ये एकाच कुटुंबातील ६ जणांचा मृत्यू

धाराशिव तालुक्यातील येडशी येथे रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीच एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू झाला. करंडे किराण स्टोअर्स गिफ्ट वेअर या दुकानाला लागलेली आग शेजारील घरात पसरल्याने ही हृदयद्रावक दुर्घटना घडली. या घटनेमुळे ऐन दिवाळीच्या सणात संपूर्ण येडशी गावावर शोककळा पसरली आहे.उत्तम करंडे, चंद्रकला करंडे, गोविंद करंडे, ज्योती करंडे, गायत्री करंडे आणि सिद्धी करंडे अशी मृतांची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीच्या वेळी कुटुंबातील सर्व सदस्य गाढ झोपेत असताना ही दुर्घटना घडली. पाहता पाहता आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण घराला कवेत घेतले. घराखाली किराणा दुकान असल्याने दुकानात साठवून ठेवलेले साहित्य व इतर ज्वलनशील वस्तूंमुळे आग अत्यंत वेगाने संपूर्ण वास्तूत पसरली. आग लागल्याचे लक्षात येताच नागरिकांनी तातडीने अग्निशमन दल आणि स्थानिक पोलिसांना पाचारण केले.अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्यानंतर आग विझवण्याचे आणि आत अडकलेल्यांना बाहेर काढण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू करण्यात आले. मात्र, आगीची प्रचंड तीव्रता आणि बंद खोल्यांमध्ये साचलेला विषारी धूर यामुळे बचावकार्यात मोठे अडथळे निर्माण झाले.धुराच्या लोटांमुळे आत अडकलेल्या सदस्यांना बाहेर पडण्याची कोणतीही संधी मिळाली नाही, परिणामी गुदमरून आणि आगीत भाजून सहा जणांचा जागीच दुर्दैवी अंत झाला. या बचावकार्यात एका व्यक्तीला सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले असून त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

गळफास घेत शिक्षक दाम्पत्याची आत्महत्या

दिवाळीसाठी आले होते घरी



नागपूर/प्रतिनिधी- कुटुंबासोबत दिवाळी साजरी करण्यासाठी घरी आलेल्या शिक्षक दाम्पत्याने लक्ष्मीपुजनाच्या दिवशी गळफास घेत आत्महत्या केली. ही घटना रविवारी सकाळी बेसा येथील रेवतीनगर परिसरात उघडकीस आली.मनीष प्रल्हाद गणवीर (३८) आणि सोनाली मनीष गणवीर (३५) अशी गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या शिक्षक दाम्पत्यांची नावे आहेत. दोघेही सुरजागड येथे एका प्रसिद्ध शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते. ऑगस्ट महिन्यात दोघांचेही लग्न झाले होते. विशेष म्हणजे, दोघांचाही हा दुसरा विवाह होता.

मिळालेल्या माहितीनुसार, जयताळा येथील त्यांचे नातेवाईक प्रशिक अजय लांडगे (२६) हे रविवारी सकाळी सव्वानऊच्या सुमारास त्यांना भेटण्यासाठी घरी गेले होते. मात्र, घरातून प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांनी टिनाच्या शेडवरून दुसऱ्या मजल्यावरील गॅलरी गाठली. खिडकीतून पाहिले असता बेडरूममध्ये दोघेही ओढणीच्या साहाय्याने छताच्या पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसले. लांडगे यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली.

टोकाचे पाऊल उचलल्याने गुढ कायम -बेलतरोडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोघांचे मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी मेडिकल रुग्णालयात पाठविले. पती-पत्नीने टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. दोघांनीही मृत्यूला कवटाळल्याने यावरून गुढ वाढले आहे. बेलतरोडी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, या घटनेमागील कौटुंबिक किंवा अन्य कारणांचा तपास सुरू आहे.

नागपूरच्या शाळेत दाखल झाली रोबोट शिक्षिका 'वेदांती'

नागपूर/प्रतिनिधी : शाळेतील वर्गात आता फळा, खडू आणि पुस्तकांसोबतच कृत्रिम बुद्धिमत्तेचीही एन्ट्री झाली आहे. नागपुरातील व्यंकेश्वरनगर येथील पूजनीय गोळवलकर गुरुजी कृत्रिम बुद्धिमत्ता सार्वजनिक दादाजी कनिष्ठ महाविद्यालयात राज्यातील पहिली एआय आधारित रोबोट शिक्षिका 'वेदांती' दाखल झाली आहे. या रोबोट शिक्षिकेमुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे धडे अधिक रंजक पद्धतीने मिळणार आहेत.

रोबोटिक्स प्रयोगशाळेची उभारणी- विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासू वृत्ती आणि नवकल्पनांची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने शाळेत अत्याधुनिक रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. या प्रयोगशाळेचे उद्घाटन माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल दहिफळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भारतीय विद्या प्रसारक संस्थेचे रमेश बक्षी, सुनील खानखोजे, शुभांगी फुटाणे, ललित तपासे, मोहन साठे, गुणवंत अभ्यंकर आणि प्राचार्य डॉ. वंदना बडवाईक उपस्थित होते.



विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगातून शिक्षण- उद्घाटनानंतर मान्यवरांनी प्रयोगशाळेची पाहणी केली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध वैज्ञानिक प्रयोगांची माहिती घेत त्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून कौशल्याधारित शिक्षण देणे हा प्रयोगशाळेचा मुख्य ➪(पान २ वर)

'दिवाळी ही आनंदाची ईद!

खरगेंच्या वक्तव्याने राजकीय वादाला तोंड

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या दिवाळीसंदर्भातील वक्तव्यावरून वाद निर्माण झाला आहे. ७ नोव्हेंबर रोजी दिवाळीच्या शुभेच्छा देताना खरगे म्हणाले होते, 'दिवाळी ही आनंदाची ईद आहे, अनेक दिवस टिकणारी ईद.' या वक्तव्यानंतर भाजपने काँग्रेस आणि खर्गे यांना लक्ष्य केले आहे.भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी खरगे यांच्या वक्तव्यावर निशाणा साधताना म्हटले की, काँग्रेसने दिवाळीच्या निमित्तानेही व्होट बँकेचे राजकारण निवडले आहे. त्यांनी काँग्रेसवर सनातनविरोधी आणि हिंदूविरोधी मानसिकता असल्याचा आरोप केला.भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते गौरव भाटिया यांनीही खरगे यांच्या वक्तव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, ईदचे स्वतःचे महत्त्व आहे आणि दिवाळीची स्वतःची पवित्रता, परंपरा आणि ओळख आहे.काँग्रेसच्या तथाकथित धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली हिंदू सणांची ओळख बदलणे हे राजकीय शिष्टाचार बनले आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. भाटिया यांनी राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांना विचारले की, ईदला 'आनंदाची दिवाळी' म्हणण्याचे धाडस ते कधी करतील का.



भाजपचे प्रवक्ते तुहीन सिन्हा यांनीही काँग्रेसवर निशाणा साधत म्हटले की, मुस्लिम समाज वर्षातून दोनदा ईद साजरी करतो, पण काँग्रेसला प्रत्येक हिंदू सण 'आनंदाची ईद' म्हणून साजरा करायचा आहे. प्रदीप भंडारी यांनी दुसऱ्या एका पोस्टमध्ये आरोप केला की, काँग्रेस दिवाळीसारख्या ➪(पान २ वर)

अंत्यसंस्काराला जातांना ७ ठार

काशी /वृत्तसंस्था- एका नातेवाईकाच्या मृत्यूनंतर त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी बिहारहून काशीला निघालेल्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. प्रवासादरम्यान हजारीबाग येथील चौपारणमधील दनुआजवळ एका भरधाव ट्रकने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला, तर १४ जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बिहारमधील बगोदर परिसरातील बियाँरो टांड येथून काही लोक एका नातेवाईकाचा मृतदेह घेऊन काशीला अंत्यसंस्कारासाठी निघाले होते. वाहनाच्या आत इतर नातेवाईक बसले होते. दरम्यान प्रवासात काही प्रवाशांना थांबायचं असल्याने चालकाने वाहन रस्त्याच्या कडेला घेण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी मागून भरधाव वेगाने आलेल्या एका ट्रकने या वाहनाला जोरदार धडक दिली. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला आणि आरडाओरडा झाला. स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत पोलिसांच्या मदतीने जखमींना चौपारण येथील सामुदायिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तिथे उपचारादरम्यान ७ जणांच्या मृत्यूची पुष्टी करण्यात आली. १४ गंभीर जखमी प्रवाशांना प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी हजारीबाग येथील शेख भिखारी मेडिकल कॉलेज रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. एकाच कुटुंबातील सदस्यांचा मृत्यू झाल्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे.

'फटाके फोडल्याने अनेक आजार बरे होतात'

भाजप आमदाराचा अजब दावा

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- पश्चिम बंगालमध्ये काली पूजा आणि दिवाळीच्या उत्सवादरम्यान फटाक्यांच्या वापरावरून सुरू असलेल्या राजकीय चर्चेच्या पार्श्वभूमीवर एक नवीन विधान समोर आले आहे.टॉलीगंजचे भाजप आमदार पापिया अधिकारी यांनी दावा केला आहे की, फटाके फोडल्याने अनेक आजार बरे होऊ शकतात. त्यांचे हे विधान सोशल मीडियावर वेगाने चर्चेत येत आहे.

काली पूजेदरम्यान केलेला दावा - टॉलीगंजचे भाजप आमदार पापिया अधिकारी यांनी दावा केला आहे की, फटाके फोडल्याने अनेक आजार बरे होऊ शकतात. आपल्या मतदारसंघात काली पूजेचे उद्घाटन केल्यानंतर अधिकारी यांनी गर्दीसमोर ही टिप्पणी केली.

मायक्रोफोनवर बोलत असताना फटाका फुटला- काली पूजा केल्यानंतर, त्यांनी नुकताच मायक्रोफोन हातात घेतला होता आणि ते बोलू लागले होते, तेव्हाच त्यांच्यासमोर एक फटाका जोरात फुटला. त्यावर त्यांनी उत्तर दिले की, फटाके फोडल्याने आजार बरे होतात. मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या विधानाचा हवाला देत ते म्हणाले, 'आमचे मुख्यमंत्री म्हणाले आहेत की आम्ही फटाके फोडू.'





त्यांनी लोकांना विचारले, 'फटाक्यांशिवाय काली पूजा कशी पूर्ण होऊ शकते? त्यामुळे, आम्ही नक्कीच फटाके फोडू.' मात्र, त्यांनी नियम न मोडण्याचे आवाहन केले आणि पोलिसांच्या मार्गदर्शक सूचनांचेही पालन करण्याचे सांगितले. यापूर्वी, ॲमहर्स्ट स्ट्रीट आणि खलिशानीसह अनेक काली पूजा पंडालच्या उद्घाटनावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, उत्सवादरम्यान फटाके फोडले जातील. त्यांनी सर्वांना आवाहन केले की केवळ पर्यावरणपूरक, किंवा 'ग्रीन,' फटाक्यांचाच वापर केला जाईल आणि ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे पालन ➪(पान २ वर)

SIR मधून पाटील, पवार, जाधव, खान आडनाव असलेली सर्वाधिक नावे गायब

मुंबई/प्रतिनिधी- महाराष्ट्रातील मतदार यादीच्या एसआयआर-बाबतचा एक रिपोर्ट समोर आला आहे. या रिपोर्टमध्ये धक्कादायक गोष्टी समोर आल्या आहेत. महाराष्ट्रात एसआयआरनंतर २.०७ कोटी मतदारांची नावे ड्राफ्ट व्होटर लिस्टमध्ये नाहीये. त्याचा परिणाम १९० विधानसभा मतदारसंघावर पडणार आहे. ज्या ठिकाणी विजयाचं अंतर कमी आहे, तिथल्या मतदारांची नावे एसआयआरमध्ये कापल्या गेली आहेत, असा दावा केला जात आहे. सर्वात धक्कादायक म्हणजे ठरावीक आडनावांवर या यादीत फुली मारण्यात आली आहे.या



रिपोर्टमध्ये मुंबईतील कुलाबा विधानसभेच्या जागेचा उल्लेख आहे. या जागेवरील मतदारांची संख्या २०२४च्या निवडणुकीतील एकूण मतदारांपेक्षा अधिक आहे. एसआयआरमधून शेख, खान, पाटील, जाधव आणि पवार आडनाव असलेल्यांची नावे सर्वाधिक कापण्यात आली असल्याचं रिपोर्टमधून उघड झालं आहे. तसेच पुरुषांच्या तुलनेत महिलांची दुप्पट नावे या यादीतून हटवण्यात आल्याची धक्कादायक माहितीही समोर आली आहे.

रिपोर्टमधील माहितीनुसार, १९० जागांवर मृत्यूसह इतर कारणाने मतदारांची नावे हटवण्यात आली आहेत. त्यांची संख्या २०२४ च्या निवडणुकीतील आमदाराच्या विजयाच्या फरकापेक्षा जास्त आहे. जे सापडले नाहीत किंवा जे आपल्या पत्यावर आढळले नाहीत अशा ९५ जागांवरील ➪(पान २ वर)

देवस्थानांना धमकीचा ईमेल; मंदिरांच्या सुरक्षेत वाढ

मुंबई / प्रतिनिधी - ऐन दिवाळीच्या सणात राज्यातील काही प्रमुख देवस्थानांना नुकसान पोहोचविण्याचा धमकीचा ई-मेल प्राप्त झाल्याने सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. नाशिकमधील त्र्यंबकेश्वर आणि सप्तशृंगी या दोन महत्वाच्या देवस्थानांना धमकीचा ईमेल प्राप्त झाला आहे. या ईमेलमध्ये मंदिरांना नुकसान पोहोचवण्याची गंभीर धमकी देण्यात आली आहे.त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर व सप्तशृंगी ही दोन्ही मंदिरे महाराष्ट्रातील प्रमुख आणि अत्यंत श्रद्धेची असल्याने ➪(पान २ वर)







शेतकरी कर्जाचे नियम आणखी कठोर होणार

नवी दिल्ली /वृत्तसंस्था- भारतीय रिझर्व्ह बँकेने कर्जाशी संबंधित नियमांमध्ये बदल करण्याचा मसुदा प्रसिद्ध केला. तसेच या मसुद्यावर चर्चा करण्यासाठी बँकांना २६ नोव्हेंबरपर्यंत मुदत दिली. शेती कर्ज घेणा-या शेतक-यांसाठी हा बदल फार महत्त्वाचा ठरणार आहे. दरम्यान, सोने तारण ठेवून कर्ज घेणा-या शेतक-याला तसेच इतरांची जमीन कसणा-या शेतक-याला यापुढे शेत कर्ज घेताना कठीण प्रक्रियेला सामोरे जावे लागू शकते. दरम्यान, शेतीसाठी कर्ज मागणी केल्यास बँकेचे अधिकारी संबंधित शेतक-यांच्या शेतात जाऊन पडताळणी करू शकतात. त्यामुळे कर्जप्रक्रिया अधिक कठोर बनण्याची शक्यता आहे. दरम्यान, भारतीय रिझर्व्ह बँकेने सोने तारण ठेवून कर्ज घेण्याची प्रक्रिया तसेच स्वत:च्या नावावर एकही सातबारा नसणा-या शेतक-याला मिळणारे कर्ज बंद केले नाही. या दोन्हीही प्रकारचे शेत कर्ज पुढेही मिळत राहणार आहेत. विशेष म्हणजे यापुढे शेत कर्जासाठी अर्ज करणा-या शेतक-याला शासनाच्या अधिकच्या ➪(पान २ वर)

■ मंगळवार १० नोव्हेंबर २०२६

e paper www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

एमएआयडीसीच्या १०.२९ लाख रुपयांचा अपहार!

■ पशुखाद्य विक्रीची रक्कम वैयक्तिक खात्यात वळविल्याचा आरोप ■ कंत्राटी विक्री प्रतिनिधीवर गुन्हा

अमरावती/प्रतिनिधीः- महाराष्ट्र कृषी-उद्योग विकास महामंडळाच्या पशुखाद्य विक्रीतून जमा झालेली रक्कम कार्यालयात भरणा करण्याऐवजी स्वतःच्या बँक खात्यात जमा करून १० लाख २९ हजार १२५ रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी महामंडळाच्या अमरावती विभागीय कार्यालयातील व्यवस्थापकाच्या तक्रारीवरून तात्पुरत्या कंत्राटी विक्री प्रतिनिधी सुबोध (वय ३०, वाघोली, ता. धामणगाव, जि. अमरावती) याच्याविरुद्ध सिटी कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार सत्यजित खंडुजी ठोसरे (वय ५३, दस्तूरनगर) हे महाराष्ट्र कृषी-उद्योग विकास महामंडळ मर्यादितच्या चौधरी कॉम्प्लेक्स, चौधरी चौक येथील विभागीय कार्यालयात व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. सुबोध याची १ नोव्हेंबरपासून कार्यालयात तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी विक्री प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्याच्याकडे पशुखाद्याची विक्री करणे, दुकानदारांकडून विक्रीची रक्कम वसूल करणे आणि ती




महामंडळाच्या कार्यालयात जमा करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. आरोपी सुबोध याने गुरु माऊली ट्रेडर्ससह अन्य सहा दुकानदारांना पशुखाद्याचा माल पुरविला होता. या विक्रीतून काही रक्कम महामंडळाच्या कार्यालयात जमा करण्यात आली. मात्र, उर्वरित रक्कम जमा झाली नसल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर कार्यालयाकडून तपासणी करण्यात आली असता, १० लाख २९ हजार १२५ रुपये कार्यालयात जमा करण्याऐवजी आरोपीने स्वतःच्या वैयक्तिक बँक खात्यात जमा केल्याचे समोर आले. महामंडळाची आर्थिक फसवणूक करून रकमेचा अपहार केल्याचा आरोप व्यवस्थापक सत्यजित ठोसरे यांनी तक्रारीत केला आहे. त्यांच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी सुबोध याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

कळंब तालुक्यात भूकंपाचा धक्का ३ रिश्टर तीव्रतेची नोंद

यवतमाळ/प्रतिनिधीः-कळंब तालुक्यातील एकलासपूर या उजाड गावात सोमवारी, ९ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता भूकंपाचा धक्का बसला. याची नोंद अप्पर वर्धा व नागपूर येथील भूकंप मापक यंत्रात झाल्याचे सांगण्यात येत आहे. या बाबतचा संदेश जिल्हा प्रशासनाला मिळाला आहे.

भूकंपाचे केंद्र असलेल्या एक किलोमीटर अंतरातील शिंगणापूर व कामठवाडा येथे तालुका प्रशासनाने चौकशी केली असता, स्थानिक नागरिकांनी कोणताच धक्का जाणवला नसल्याचे सांगितले. भूकंप मापक यंत्राच्या संदेशानुसार एकलासपूर या ठिकाणी भूकंपाचे केंद्र आढळून आले आहे. कळंब तालुक्यातील एकलासपूर हे उजाड आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर भूकंपाचा धक्का बसला की नाही, याला दुजोरा देणारी कोणतीच यंत्रणा उपलब्ध नाही. जिल्ह्यातील उमरखेड, आर्णी तालुक्यात आतापर्यंत भूकंपाचे धक्के जाणवल्याची नोंद



आहे. याचा केंद्रबिंदू मराठवड्यात असते. आता पहिल्यांदाच जिल्ह्यातील मध्यवर्ती भागात असलेल्या कळंब तालुक्यात भूकंपाचे धक्के बसले आहेत. त्यामुळे चर्चेला उधाण आले आहे. जिल्हा प्रशासन स्थानिक पातळीवर याची चौकशी करत आहे. नुकसान झाल्याची कोणतीही माहिती अद्यापर्यंत मिळाली नसल्याने निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी सांगितले.

पान १ व १० वरून

दिवाळीच्या रात्री तरुणाची

गळ्यावर चाकूने वार केले. गंभीर जखमी झालेल्या चैतन्यला आरोपी घटनास्थळी सोडून पसार झाले. गुल्ल्या हा भूषण टाले याच्या दुचाकीवरून पळून गेला. दरम्यान, जखमी चैतन्यला कुटुंबीयांनी तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने त्याला खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. वडील राजेंद्र कचरे यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी राजू काळे, विशाल यादव, गुल्ल्या ऊर्फ अश्विन पहाडण आणि भूषण टाले यांच्याविरुद्ध कट रचून हत्या केल्याचा गुन्हा दाखल केला. गाडगेनगर पोलिसांच्या दोन्ही डीबी पथकांनी संयुक्त कारवाई करून तिघांना अटक केली. फरार गुल्ल्या याचा शोध सुरू आहे.

ऊर्ध्व वर्धा क्ष्काल्प क्षेत्रात पाणीटंचाई

येईल.जलसंपदा विभागाने पाणी वापर संस्था, लाभधारक आणि नागरिकांना पाणी सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. पाणी ही राष्ट्रीय संपत्ती समजून प्रत्येकाने त्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा, धरणातून किंवा कालव्यातून पाण्याचा अनधिकृत वापर केल्यास 'महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६' मधील तरतुदींनुसार कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असे कळविण्यात आले आहे.

दहा क्विंटल झेंडूची फुले नागरिकांना

फुले नागरिकांना मोफत वाटप करण्याचा एक अनोखा आणि विक्रमी उपक्रम राबविण्यात आला आहे.यावर्षी पावसाने दगा दिल्यामुळे सर्वत्र कोरडा दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळामुळे बाजारात सर्वच वस्तूंच्या किमती गगनाला भिडल्या आहेत, मात्र दुसरीकडे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नसल्याची परिस्थिती आहे. दिवाळीच्या सणात घराची सजावट, पूजा आणि रोषणाईसाठी झेंडूच्या फुलांना प्रचंड महत्त्व असते. बाजारात फुलांचे भाव कडाडल्याने सर्वसामान्यांना ती खरेदी करणे कठीण झाले होते. हीच बाब ओळखून सातेगावातील दानशूर व प्रगतशील शेतकरी मोहन पाटील पळसकर, हिम्मत बारेवार आणि दिनेश शर्मा यांनी एक मोठा निर्णय घेतला.या तिन्ही सहकाऱ्यांनी आपल्या 'जय किसन बाग' मध्ये मोठ्या कष्टाने झेंडूची लागवड केली होती. बाजारात फुलांना चांगला भाव मिळू शकला असता, परंतु त्यांनी नफ्याचा विचार न करता सामाजिक बांधिलकी जपली. दुष्काळामुळे कोणत्याही गरिबाची दिवाळी फुलांविना अंधारात जाऊ नये, म्हणून त्यांनी बागेतील तब्बल दहा क्विंटल झेंडूची फुले सर्वसामान्य नागरिकांना आणि ग्रामस्थांना पूर्णपणे मोफत वाटून दिली.ग्रामीण भागातील या अत्यंत महत्त्वाच्या आणि संवेदनशील उपक्रमाचे तालुक्यात कौतुक होत आहे .दुष्काळात होरपळणाऱ्या जनतेला या अनोख्या उपक्रमामुळे मोठा दिलासा मिळाला असून, अनेकांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद ओसंडून वाहताना दिसला.आपल्या पिकाचा व्यावसायिक विचार न करता, संकटकाळात गावकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणाऱ्या मोहन पाटील पळसकर, हिम्मत बारेवार व दिनेश शर्मा यांच्या या विक्रमी आणि दातृत्वाच्या उपक्रमाचे सातेगावसह संपूर्ण अंजनगाव सुर्जी तालुक्यात भरभरून कौतुक होत आहे. हा उपक्रम इतर शेतकऱ्यांसाठी आणि समाजसेवकांसाठी एक आदर्श ठरला आहे.

गोकुळ निवडणुकीतील सत्तेचे गणित

शेतकरी समविचारी आघाडीने स्पष्ट बहुमत मिळवत २५ संचालकामधून झालेल्या निवडणुकीत समविचारी आघाडीचे १३ उमेदवार विजयी झाले होते. सत्ताधारी महायुतीच्या पॅनलला केवळ १२ जागा मिळाल्या होत्या. मतदारांनी सत्ताधारी महायुतीला नाकारून समविचारी आघाडीच्या बाजूने आपला कौल दिल्यावर सुद्धा महायुती सरकारने गोकुळ मधील सत्तेचे गणित बदलण्यासाठी शासन नियुक्त सदस्यांचा बेकायदेशीर आणि लोकशाही विरोधी मार्ग अवलंबिला असून सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या पॅनेलला सत्तेपासून वंचित ठेवण्यासाठी अतोनात व बेकायदेशीर प्रयत्न महायुती सरकार करत आहेत. हि एकप्रकारे हुकूमशाहीकडे वाटचाल असून अश्या प्रकारचा कोणताही निर्णय न घेता निवडणुकीत लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या पॅनेल ला संधी देण्यात येऊन सहकार क्षेत्रातील लोकशाही मूल्ये आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांचे अधिकार अबाधित ठेवण्यासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा अशी मागणी मोर्शी शहर काँग्रेस कमेटी तर्फे सादर निवेदणाद्वारे शासनाकडे करण्यात आली. याप्रसंगी निवेदन देतेवेळी विपुल भडांगे सचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटी ओबीसी सेल, भुषण कोकाटे अध्यक्ष मोर्शी शहर काँग्रेस कमेटी तथा नगरसेवक न प मोर्शी, जावेद पठाण, सय्यद साबीर सय्यद जाबीर,आशिष कडू, राजेंद्र लाखोडे, सय्यद शकील, विक्रम धोटे, पंकज वाघमारे, यश पांडे, सौरभ गाडे तसेच इतर अनेक काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते

वंशपरंपरेने चालत आलेली

काठ्यांची व्यवस्था केली असते. धेंडाईमध्ये एकूण ८५ दिवे लावले जातात. दिव्यांची संख्या पुरातन काळातील चौसर या खेळावरून घेण्यात आली आहे.चौरसमध्ये ८४ घरे असतात म्हणजेच एक भागामध्ये २१ घरे असतात. याच आधारावर धेंडाईच्या एका भागामध्ये २१ दिवे असतात, चार भाग मिळून ८४ आणि एक दिवा धेंडाईच्या मधात अशा एकूण ८५ पणत्या लावण्यात येतात. धेंडाईच्या वरच्या टोकावर गवताचा प्रकार असलेल्या लईपासून बनविलेली रई व त्या रईमध्ये भाताचा दिवा लावलेला असतो. अंधार, अज्ञान व गरिबीवर मात करण्याच्या उद्देशाने ही धेंडाई रात्री घरोघरी फिरविली जाते. यावेळी घराघरातील महिला या धेंडाईची पुजा करतात. नंतर आरती होऊन ती धेंडाई समोर अनेक ओव्या गायिल्या जातात. दुसऱ्या दिवशी धेंडाईची सांगता होते.अधिक मासात महाप्रसादाचा कार्यक्रम ठेवण्यात येतो. पहिली धेंडाई सुलतान पुऱ्यातील बजरंगबली संस्थान येथून, दुसरी माळीपुऱ्याच्या रामजीबाबा संस्थान येथून,तिसरी दिव्यज्योती धेंडाई मंडळ आणि चौथी धेंडाई महादेवराव गहुकार यांच्या घरून निघते. ही परंपरा मोर्शीवासियांनी मोठ्या आनंदाने जपली आहे. सावंगा येथून आलेली ही धेंडाई गावागावात पोहचली आहे. शिरजगाव,अंबाडा, नेर पिंगळाई,ब्राह्मणवाडा, हिवरखेड या गावातून धेंडाई निघत होती. मोर्शीकरांनी मात्र ही प्रथा आजही जोपासून ठेवली. या धेंडाईसोबत चारही मंडळाचे सदस्य व कार्यकर्ते तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

ग्रामीण भागात १८ पर्यंत

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी चोख बंदोबस्त ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे आणि कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

कोकड्यात विविध मागण्यांसाठी

कामाच्या दर्जाबाबतही प्रश्न उपस्थित उपस्थित होत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून रस्त्याचे काम दर्जेदार पद्धतीने व निर्धारित वेळेत पूर्ण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. सोबतच कोकर्डा येथील शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र पॉवर हाऊस (विज उपकेंद्र) उभारण्यात यावे ही दुसरी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांना वारंवार भेडसावणाऱ्या विज समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी स्वतंत्र विज उपकेंद्राची आवश्यकता आहे. या साखळी उपोषणाला परिसरातील ज्येष्ठ नागरिक महिला मंडळी तसेच युवकांनी पाठिंबा दर्शविला असून, आंदोलनाला अनेकांचा पाठींबा मिळत आहे. या साखळी उपोषणात बुद्धभूषण गवई, शुभम घाटे, स्वराज बारब्दे, सौरभ पुनसे, सौरभ माहोरे, सूरज सावरकर, सत्यम राऊत, श्रीनिकेत बारब्दे आदी युवक सहभागी झाले आहेत. प्रशासनाने दोन्ही मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन लेखी स्वरूपात ठोस आश्वासन द्यावे आणि प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करावी. जोपर्यंत मागण्यांबाबत लेखी स्वरूपात ठोस निर्णय होत नाही तोपर्यंत साखळी उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार उपोषणकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

देशभरात फटाक्यामुळे

१७ मिनिटांत नियंत्रण मिळवले. मुंबईतील लोखंडवाला येथे लागलेल्या आणखी एका आगीत एका व्यक्तीचा मृत्यू झाला. याशिवाय आसाममधील जोनाई, पुण्यातील वडगाव शेरी, मुंबईतील विद्याविहार आणि गाझियाबादमधील क्रॉसिंग रिपब्लिक परिसरातही आगीच्या घटना समोर आल्या. या घटनांनंतर अग्निशमन दल आणि पोलिसांची पथके मदत व बचावकार्यात गुंतली होती.

मध्य प्रदेशात सर्वाधिक १३ जणांचा मृत्यू- मध्य प्रदेशातील कटनी जिल्ह्यात एका निवासी घराला लागलेल्या भीषण आगीत गुदमरून आणि होरपळून एकाच कुटुंबातील ६ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन महिन्यांच्या बाळासह तीन लहान मुलांचा समावेश आहे. तसेच, सिवनी जिल्ह्यात सराफा व्यावसायिकाच्या घराला लागलेल्या आगीत ६ जणांचा मृत्यू झाला. उज्जैनमध्ये १०७ वर्षांच्या वृद्धाचा आगीत मृत्यू झाला.

राजस्थानच्या पाली जिल्ह्यात फटाक्यांच्या दुकानाला आग लागली. या घटनेत २ जणांचा मृत्यू झाला. तर ३ जण बेपत्ता झाले आहेत. दिल्लीतील नरेला भागात १० वर्षांच्या बालकाच्या पोटावर फटाक्याचा रॉकेट लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. याशिवाय उत्तर प्रदेशातील बांदा येथे कबाड गोदामाला लागलेल्या आगीत २५ लाखांचे नुकसान झाले, तर जम्मूच्या नेहरू मार्केटमध्ये १२ पेक्षा जास्त दुकाने जळून खाक झाली.

राज्यात आगीचे तांडव!

घडल्या. अंधेरीतील मरोळ मिलिटरी रोड परिसर, मालवणी परिसरातही आग लागल्याची माहिती समोर आली आहे. तर कांदिवली पश्चिम येथील कांदिवली रिक्रिएशन क्लबच्या गार्डन परिसरातही रात्री आग लागली होती. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने रात्री उशिरा घटनास्थळी धाव घेत आग विझवली.

ठाण्यातही घडल्या आगीच्या घटना

ठाण्यात तीन हात नाका येथील रहेजा गार्डनच्या कारलाइन इमारतीच्या ८ व्या मजल्यावर भीषण आग लागली. ही आग वेगाने १४ व्या मजल्यापर्यंत पसरली आणि इमारतीत प्रचंड धूर झाला. अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन पथकाने शर्थीचे प्रयत्न करून ५० रहिवाशांची सुखरूप सुटका केली. तसेच, कासारवडवली येथे सांघवी हिल्स परिसरातील आरावली हिल्स सोसायटीच्या ७ व्या मजल्यावरील कॉरिडॉरमध्ये आग लागल्याची घटना घडली. यावेळी ४ जण जखमी झाले. आशर गृहसंकुलातील एका इमारतीच्या २९ व्या मजल्यावरील घरात आग लागली.

नाशकात २० ठिकाणी आग- फटाक्याच्या अतषबाजीदरम्यान शहरात २० ठिकाणी आगीच्या घटना घडल्या. जुने नाशिक भागातील मदिना चौकातील भंगारच्या गोदामाला किरकोळ आग लागली. यानंतर पंचवटी येथील श्रीकाळाराम मंदिर परिसरात फटाक्यामुळे आग लागली. तसेच इंदिरानगर, नाशिक रोड, अंबड, सातपूर, के. के. वाघ महाविद्यालय, द्वारका परिसरात आगीच्या घटना घडल्या.

छत्रपती संभाजीनगरात २६ ठिकाणी आग

छत्रपती संभाजीनगरमध्ये जवळपास २५ ते २६ ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या आहेत, या घटना नेमक्या कशामुळे घडल्या याबाबत अद्याप स्पष्टता देण्यात आली नाही. मात्र अग्निशमन दलाच्या विभागांनी दिलेल्या माहितीनुसार रात्री एक वाजेपर्यंत विविध ठिकाणी घटना घडल्या आहेत. नारेगाव भागात कुलरच्या कंपनीला आग लागून मोठे नुकसान झाले.

पुण्यात २४ ठिकाणी आग- पुणे शहरात दिवाळीचा जल्लोष सुरू असताना दुपारी ३ ते रात्री ९ या ६ तासांच्या कालावधीत तब्बल २४ ठिकाणी आगीच्या घटना घडल्या. येरवडा, सदाशिव पेठ, वडगाव, खराडी या भागांत या घटना घडल्या असून अग्निशमन दलाने सर्व ठिकाणी वेळेत आग विझवली. सुदैवाने येथे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

चंद्रपूर आणि अहिल्यानगरमध्ये मोठे नुकसान- चंद्रपूरपुरात बालाजी वॉर्डात फटाक्याची ठिणगी उडून एका घराच्या दुस-या माळ्याला भीषण आग लागली. अहिल्यानगर येथील अकोले रोडवरील एका बॅटरीच्या दुकानाला फटाक्यांमुळे आग लागून दोन दुकानांचे मोठे नुकसान झाले.

फटाक्यांच्या धुरामुळे विमानसेवा

सुरूच होते. याचा विमानसेवेवर परिणाम झाला. चेन्नई विमानतळाच्या परिसरातील मीनाम्बक्कमसारख्या निवासी भागांत परिस्थिती अधिक चिंताजनक होती. तिथे सतत फटाके फोडल्यामुळे निर्माण झालेला धूर धावपट्टीच्या दिशेने आल्याने दृश्यमानता कमी झाली. यामुळे कोलकाता, दिल्ली, पुणे, श्रीलंका, बँकॉक, तिरुवनंतपुरम, सिंगापूर, रायपूर, सिलिगुडी, तिरुचिरापल्ली आणि क्वालालंपूर येथून येणारी एकूण ११ विमाने प्रभावित झाली. नंतर दृश्यमानता सुधारल्यावर १० विमाने चेन्नई विमानतळावर उतरू शकली, परंतु १५६ प्रवाशांना घेऊन येणारे इंडिगोचे एक विमान बराच वेळ आकाशात घिरट्या घातल्यानंतर बंगळुरूकडे वळवण्यात आले. विमानतळावरून उड्डाण घेणा-या विमानांनाही या धुराचा फटका बसला. कोलकाता, तिरुवनंतपुरम, दिल्ली, पुणे, तिरुचिरापल्ली, श्रीलंका, दुबई, क्वालालंपूर, सिंगापूर, हाँगकाँग आणि अबू धाबीला जाणारी १५ विमाने विलंबाने रवाना झाली.

नागपूरच्या शाळेत दाखल

उद्देश असल्याचे प्राचार्य डॉ. वंदना बडवाईक यांनी सांगितले. आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख शालेय स्तरावरच व्हावी, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

'वेदांती'च्या उत्तरांनी मान्यवरही थक्क- या कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरली ती रोबोट शिक्षिका 'वेदांती'. उपस्थितांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना तिने अचूक उत्तरे दिली. तिच्याशी संवाद साधताना विद्यार्थ्यांमध्येही विशेष उत्सुकता दिसून आली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने संवाद साधणाऱ्या या रोबोट शिक्षिकेमुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. प्रयोगशाळेच्या उभारणीत योगदान देणाऱ्या डॉ. बडवाईक यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

भविष्यातील तांत्रिक आव्हानांसाठी विद्यार्थी सज्ज

ही केवळ नागपूरसाठीच नव्हे, तर संपूर्ण विदर्भासाठी अभिमानाची बाब असल्याचे माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल दहिफळे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी नव्या संकल्पना प्रत्यक्षात उतरवून भविष्यातील तांत्रिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. रमेश बक्षी यांनीही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेली परसबाग, गणितीय उद्यान, आकाशदीप आणि शुभेच्छापत्रांचेही मान्यवरांनी विशेष कौतुक केले.आत्महत्याष्ठगडचिरोलीत करायचे नोकरी, दिवाळीसाठी आले होते घरी

दिवाळी ही आनंदाचा

प्रसंगीसुद्धा तुष्टीकरण आणि व्होट बँकेच्या विचारात मग्न आहे.शिवसेनेनेही निशाणा साधला-मुंबईत शिवसेना नेते आनंद दुबे यांनीही खरगे यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, काही जण दिवाळीत ईद पाहतात, तर काही जण ईदमध्ये दिवाळी पाहतात. ते म्हणाले की, दिवाळी हे प्रभू रामाच्या वनवासातून अयोध्येत परतण्याचे प्रतीक आहे आणि ती दिवाळीच राहिली पाहिजे. आनंद दुबे म्हणाले की, सर्व धर्म आणि सणांचा आदर केला पाहिजे, परंतु दिवाळी आणि ईद वेगळे आहेत आणि त्यांचे स्वतःचे महत्त्व आहे.काँग्रेसचा बचाव-मल्लिकार्जुन खरगे यांच्या 'दिवाळी ही आनंदाची ईद आहे' या वक्तव्यावरून निर्माण झालेल्या वादावरून काँग्रेस नेते पवन खेरा यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. त्यांनी 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले आहे की, खरगे यांच्या वक्तव्यावरून गदारोळ करणाऱ्यांना या शब्दाचा अर्थच माहीत नाही. पवन खेरा म्हणाले की, 'ईद' या शब्दाचा शब्दशः अर्थ 'उत्सव' आहे आणि खरगे यांचे वक्तव्य त्याच संदर्भात समजून घेतले पाहिजे. ते म्हणाले की, खरगे यांचे वक्तव्य पूर्णपणे सामान्य होते, परंतु 'संघी नकारात्मकतेमुळे' काही लोक हा सणसुद्धा साजरा करत नाहीत. पवन खेरा यांनी पुढे लिहिले की, दिवाळीच्या आणि देवावरील प्रेमाच्या भावनेने लोकांनी आपल्या डोक्यातही एक-दोन दिवे लावावेत आणि आपला 'मूर्खपणाचा जाहीर देखावा' थांबवावा.

फटाके फोडल्याने अनेक

केले जाईल याची खात्री करावी. फटाक्यांमुळे आजार बरे होऊ शकतात हा वैज्ञानिक सिद्धांत विचित्र वाटतो. विरोधी पक्ष आता या मुद्द्यावर भाजपला कोंडीत पकडू शकतात, विशेषतः दिवाळीनंतर कोलकाताच्या हवेची गुणवत्ता लक्षणीयरीत्या खालावली असल्याने.

SIR मधून पाटील, पवार,

मतदारांची संख्याही विजयाच्या फरकापेक्षा जास्त आहे, महाविकास आघाडीच्या जिंकलेल्या जागांवर १८.५ टक्के आणि महायुतीच्या जिंकलेल्या जागांवर १७.६ टक्के मतदारांची नावे ड्राफ्ट लिस्टमध्ये नाहीयेत.

या आडनावांवर फुली- रिपोर्टनुसार, महाराष्ट्रातील शेख आडनाव असलेले ७.५४ लाख, पाटील आडनाव असलेले ४.८४ लाख, खान आडनाव असलेले ३.६९ लाख, जाधव आडनाव असलेले ३.४० लाख आणि पवार आडनाव असलेले २.७५ लाख मतदारांची नावे ड्राफ्ट लिस्टमध्ये नाहीयेत.रिपोर्टमधील सर्वात महत्त्वाचा दावा म्हणजे, ड्राफ्ट लिस्टमधून ज्या मतदारांची नावे हटवण्यात आली आहेत, त्यापैकी ८३.२ टक्के लोक जिवंत आहेत. तर ४६ टक्के लोक ४० वर्षाखालील आहेत. मुंबईत ३४.७ टक्के आणि ठाणे जिल्ह्यात ३५.४ टक्के मतदारांची नावे हटवण्यात आली आहेत. महाराष्ट्रातील इतर भागातील १९.५ टक्के मतदारांची नावे हटवण्यात आली आहेत.

१४.६ टक्के मुस्लिमांचा पत्ता कट- एसआयआरच्या यादीतून १४.६ टक्के मुस्लिम मतदारांची नावे हटवण्यात आली आहेत. राज्यातील एकूण मतदार यादीतील मुस्लिमांचं प्रमाण ११.८ टक्के आहे. मुंबई शहरातील प्रमाण २८/४ टक्के आहे आणि मुंबई उपनगरातील प्रमाण २४.१ टक्के आहे. मुस्लिम नावे असलेल्या मतदारांची नावे दुसऱ्या ठिकाणी असण्याची शक्यता अधिक आहे, इतर मतदारांच्या तुलनेत ही शक्यता २.७ टक्के असावी, असं या रिपोर्टमध्ये म्हटलं आहे. तृतीय पंथीयांचे आकडेही धक्कादायक आहेत. २०२४ मतदार यादीतील ६,१०१ थर्ड जेंडर मतदारांपैकी ३,२५० म्हणजे ५३.३ टक्के नावे लिस्टमध्ये नाहीयेत.

महिलांची सर्वाधिक नावे हटवली- १८ ते २९ वयोगटातील जे मतदार मुंबईच्या बाहेर इतर ठिकाणी कायमस्वरुपी शिफ्ट झाले आहेत, त्यामध्ये ८ लाख २२ हजार ७९८ महिला आणि ३ लाख ७९ हजार ९९१ पुरुष आहेत. म्हणजे पुरुषांच्या तुलनेत महिलांची नावे २.२ पट वगळण्यात आली आहेत. लग्नानंतर महिलांनी नवऱ्याच्या घरी जाणं, त्यांचा पत्ता बदलणं, नावांची डबल नोंदणी करणं आदी कारणांमुळे महिलांची नावे वगळल्या गेल्याचं या रिपोर्टमध्ये सांगण्यात आलं आहे.

पुणे आणि ठाण्यातील सर्वाधिक नावे- जिल्हावार आकड्यांवर नजर टाकली तर पुण्यातील २८.७ लाख, ठाण्यातील २८.६ लाख, मुंबई उपनगरातील २६.६ लाख, नागपुरातील १४.४ लाख आणि नाशिकमधील १०.३ लाख मतदातारांची नावेच लिस्टमध्ये नाहीयेत.कोलकात्यातील सबर इन्स्टिट्यूटने महाराष्ट्रातील एसआयआर प्रक्रियेवर सवाल उपस्थित केला आहे. संस्थेचे प्रमुख साबिर अहमद यांनी याबाबत गंभीर आरोप केला आहे. व्होटर लिस्ट तयार करण्यासाठी वापरण्यात आलेल्या सॉफ्टवेअरमध्ये तांत्रिक अडचणी असल्याने मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे मतदार यादीतून हटवली गेली आहेत, असा आरोप साबिर अहमद यांनी केला आहे. तसेच निवडणूक आयोगाने या मोहिमेची चौकशी करावी. व्होटर आयडीचा वापर अनेक सरकारी आणि प्रशासकीय कामासाठी होतो. अशावेळी व्होटर लिस्टमधून नाव हटवल्यास पासपोर्ट रिन्यू करने, डोमिसाइल सर्टिफिकेट, सरकारी योजना आणि विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर त्याचा परिणाम होऊ शकतो, असं साबिर अहमद यांनी म्हटलंय.

निवडणूक आयोग काय म्हणाले?

या आरोपांवर महाराष्ट्रातील निवडणूक आयोगाकडून उत्तर आलं आहे. एसआआरची प्रक्रिया अजून पूर्ण झालेली नाही. ड्राफ्ट व्होटर लिस्टमध्ये नाव नाही म्हणजे याचा अर्थ मतदारांचे नाव कायमस्वरुपी काढून टाकलं गेलं सं नाहीये. मतदारांची माहिती घेण्याचं काम सुरू आहे, असं आयोगाने म्हटलं आहे. आयोगाच्या आकडेवारीनुसार, राज्यातील २१ टक्के मतदारांचे नाव ड्राफ्ट लिस्टमध्ये नाहीये. त्यातील १६.८ टक्के मतदारांची नावे मृत्यू झाल्याने हटवण्यात आली आहेत.

मुंबई आणि ठाण्यात इतर शहरातून येणाऱ्या लोकांची संख्या अधिक आहे. दिल्ली, बंगळुरू आणि चेन्नईसारख्या महानगरातून मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे हटवण्यात आली आहे, त्यामागचं कारण हेच आहे. मुस्लिम मतदारांची नावेही ड्राफ्ट लिस्टमध्ये नाही. पण त्याचा धर्माशी काही संबंध नाही, असं आयोगाने स्पष्ट केलं आहे.

१६ नोव्हेंबरला पुन्हा संधी- ज्या लोकांची नावे ड्राफ्ट व्होटर लिस्टमध्ये नाहीत आणि ज्यांना काही आक्षेप आहेत, ते लोक १६ नोव्हेंबरपर्यंत त्यांचे आक्षेप नोंदवू शकतात. ज्यांची नावे मतदार यादीत नाहीत, ते गणना फॉर्म भरू शकतात. मतदार यादीत नाव टाकण्यासाठी दुसऱ्यांदा अर्ज करू शकतात, असंही आयोगाने म्हटलं आहे.

देवस्थानांना धमकीचा ईमेल;

येथे रोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. त्यामुळे या घटनेला गांभीर्याने घेतले जात आहे.या धमकीच्या ईमेलनंतर तातडीने उपाययोजना करण्यात आल्या आहेत. नाशिक जिल्ह्यातील सप्तश्रृंग गड, त्र्यंबकेश्वर मंदिर तसेच शहरातील काळाराम मंदिराच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. दोन दिवसांपूर्वी हा ई-मेल प्राप्त झाल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. नाशिकचे पोलिस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांनीही धमकीच्या ई-मेलला दुजोरा दिला आहे.मागच्या आठवड्यात नाशिकसह राज्यातील अनेक न्यायालयांना धमकीचे ई-मेल प्राप्त झाले होते. त्यानंतर आता अज्ञात व्यक्तींनी प्रमुख देवस्थानांना लक्ष्य केल्याने पोलिस प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून बंदोबस्त वाढविला आहे. त्र्यंबकेश्वर आणि सप्तशृंगी या दोन्ही देवस्थानांच्या परिसरासह संवेदनशील ठिकाणी पोलीस बंदोबस्त कडक करण्यात आला आहे. पोलीस दलाने संशयास्पद व्यक्ती किंवा हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्याचे आदेश दिले आहेत. पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.विशेष करुन सप्तश्रृंग गड आणि त्र्यंबकेश्वर येथे अतिरिक्त ५० ते ६० पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. यामध्ये शस्त्रधारी पोलिसांचाही समावेश आहे. दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे या दोन्ही देवस्थानांसह काळाराम मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होत आहे.त्यामुळे मंदिर परिसरात पोलिसांची गस्त वाढविण्यात आली आहे. देवस्थानांमधील सीसीटीव्ही कॅमे-यांचे फुटेज वारंवार तपासले जात असून, परिसरातील संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. येणा-या-जाणा-या भाविकांच्या गर्दीवरही पोलिस लक्ष्य ठेऊन आहेत.दरम्यान, धमकीच्या ई-मेलमधील नेमका मजकूर काय आणि तो कोणाच्या नावाने पाठविण्यात आला आहे. तसेच त्यामागील व्यक्ती कोण आहे, याबाबत पोलिसांनी गोपनीयता पाळली आहे. भाविकांनी घाबरून जाऊ नये, पोलिस प्रशासन सुरक्षेसाठी कटिबद्ध असून, प्राप्त ई-मेलबाबत वरिष्ठ पातळीवर चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांनी दिली आहे.

शेतकरी कर्जाचे नियम

प्रक्रियेला सामोरे जावे लागू शकते. जर संबंधित शेतकरी सोने तारण ठेवून कर्ज घेत असेल तर अशावेळी संबंधित बँकेचे अधिकारी अर्जकर्त्या शेतक-याच्या शेतावर येऊन तपासणी करू शकतात. या तपासणीचा मुख्य मुद्दा असा की, संबंधित शेतकरी खरोखरच शेती करण्याच्या उद्देशाने शेत कर्ज घेत आहे का, याचा आढावा घेतला जाणार आहे.यात जर अर्ज करणा-या शेतक-याकडे स्वत:ची जमीनच नसेल तर त्या शेतक-याला शेतकर्ज मिळवण्याची मुभा असेल. पण त्यासाठी संबंधित शेतक-याला अधिकचे कागदपत्र सादर करावे लागू शकतात. या कागदपत्रांची योग्य तपासणी झाल्यावरच संबंधित अर्ज कर्त्या शेतक-याला पात्र असल्यास शेत कर्ज प्राप्त होऊ शकते. भारतीय रिझर्व्ह बँकेने सूचवलेल्या बदलांमुळे सामान्य शेतक-यांच्या कर्ज मिळविण्याच्या हक्कावर मोठा परिणाम होणार नाही. तसेच या नियमांमुळे संबंधित शेतक-यांना कर्ज मिळणे बंद होणार नाही. परंतु अधिकच्या तपासणीमुळे काही प्रकरणात एखाद्या शेतक-याने केलेले अर्ज फेटाळले जाऊ शकतात. सोने गहाण ठेवून शेत कर्ज घेताना शेतक-यांना अधिकची माहिती द्यावी लागू शकते. जर माहितीत तफावत आढळली तर कर्ज रद्द होण्याचीही शक्यता आहे. दुसरीकडे जर स्वत:ची जमीन नसताना एखाद्या शेतक-याने शेत कर्जासाठी अर्ज केले, पण पुरवलेल्या दस्तावेजांमध्ये तफावत आढळली तर अर्ज फेटाळले जाऊ शकते.

कर्ज वाटपाचे उद्दिष्ट वाढणार- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तावानुसार जर बँकांच्या कर्जाचा आधार १० हजार कोटी रुपयांनी वाढला तर प्राधान्य क्षेत्राला कर्ज देण्याचे उद्दिष्टही ४ हजार कोटी रुपयांनी वाढेल. यात शेती क्षेत्रासाठी १८०० कोटी रुपये, दुर्बल घटकांसाठी १२०० कोटी रुपये आणि सूक्ष्म उद्योगांसाठी ७५० कोटी रुपयांचे अतिरिक्त कर्ज देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे बँकांचे उद्दिष्टही वाढवावे लागणार आहे.

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ मंगळवार, १० नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

गोकुळ दूध संघ निवडणुकीत लोकशाहीची गळचेपी!

नियुक्त सदस्यांना मतदानाचा अधिकार देण्याच्या शासन निर्णयाविरोधात मानोरा काँग्रेस आक्रमक!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ दूध संघ) याच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत शासनाने नियुक्त सदस्यांना मतदानाचा अधिकार देऊन लोकशाहीची गळचेपी केल्याचा गंभीर आरोप मानोरा तालुका काँग्रेस कमिटीने करत याबाबत जिल्हाधिकारी वाशिम यांना तहसीलदार मार्फत दि. ९ सप्टेंबर रोजी निवेदन दिले.



गोकुळ दूध संघाच्या नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या नेतृत्वाखालील समविचारी पक्षाच्या विकास पॅनलला सभासदांनी स्पष्ट आणि कायदेशीर बहुमत दिले आहे. लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या या पॅनलला सत्ता तातडीने आणि तात्काळ अध्यक्षपदाची निवडणूक घेऊन कार्यभार सोपवणे बंधनकारक असताना, प्रशासन आणि सरकार जाणीवपूर्वक अध्यक्षपदाची निवडणूक लांबणीवर टाकत आहे, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

यापेक्षाही धक्कादायक बाब म्हणजे, नियमबाह्य वाद म्हणून, स्पष्ट बहुमत असतानाही निवडणुकीचा निकाल सत्ताधाऱ्यांच्या बाजूने बदलवण्यासाठी शासनाने तातडीने पाच शासन नियुक्त सदस्यांची घाईगडबडीने नेमणूक केली आहे. इतकेच नव्हे तर, सहकाराच्या मूलभूत तत्त्वांना पायदळी तुडवून या नियुक्त सदस्यांपैकी चौघांना थेट मतदानाचा अधिकार बहाल करण्यात आला आहे, असा थेट आरोप काँग्रेसने केला आहे.

हा प्रकार पूर्णपणे नियमबाह्य आणि अलोकतांत्रिक आहे. निवडणुकीत सभासदांनी ज्या पॅनलला स्पष्ट बहुमत दिले आहे, त्याचा लोकशाही अधिकार डावलून मागच्या दाराने सत्ता हस्तगत करण्याचा हा प्रयत्न आहे. सहकार कायद्यातील पक्षपाताचा वापर करून, केवळ राजकीय स्वार्थासाठी हे केले जात आहे.

स्वार्थापोटी नियुक्त सदस्यांना मतदानाचा अधिकार देणे हे सहकार क्षेत्रातील स्वायत्ततेला मारक आहे. सहकार क्षेत्र हे सभासदांच्या अधिकारावर चालते, तेथे शासकीय बळाचा वापर करून सदस्यांवर दबाव आणणे किंवा निवडणुकीचे निकाल फिरवणे हे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. हा केवळ गोकुळ दूध संघापुरता मर्यादित विषय नसून, संपूर्ण महाराष्ट्रातील सहकार चळवळ बुडवण्याचा आणि लोकशाहीचा गळा घोटण्याचा हा एक धोकादायक पायंडा पाडला जात आहे. सहकाराच्या आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी आम्ही सर्व काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व सहकारी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध नोंदविला.

महाराष्ट्र शासनाने गोकुळ दूध संघाच्या पार्श्वभूमीवर काढलेला आणि सहकार क्षेत्राच्या स्वायत्ततेवर गदा आणणारा शासन नियुक्त सदस्यांच्या मतदानाचा अध्यादेश तातडीने रद्द करण्यात यावा, गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदाची निवडणूक कोणत्याही दबावाला बळी न पडता, तात्काळ आणि पारदर्शक पद्धतीने घेण्यात यावी, स्पष्ट बहुमत असलेल्या लोकशाही पॅनलला कायदेशीरपणे सत्ता स्थापन करण्याची संधी मिळावी. तरी माननीय जिल्हाधिकाऱ्यांनी या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन आमच्या भावना आणि कायदेशीर मागण्या तातडीने राज्य सरकार व सहकार मंत्रालयाकडे सादर कराव्यात, ही नम्र विनंती करण्यात आली आहे. या निवेदनावर काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष रामनाथ राठोड, शहर अध्यक्ष नजीर शेख, हनीफ ठेकेदार, गोलू वाळले, जय चव्हाण, डॉ. निरंजन खुपसे, अल्ताफ बेग, उरखडे यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

भटक्या-विमुक्तांच्या चेहऱ्यावर फुलविले आनंदाचे हास्य

डॉ. जयश्री गुट्टे यांचा दिवाळीचा अनोखा उपक्रम!

■ प्रतिनिधी | वाशिम ■



दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि मांगल्याचा सण. मात्र समाजातील प्रत्येक घटकाला हा सण उत्साहात साजरा करता यावा, यासाठी सामाजिक संवेदनशीलता आणि माणुसकीची जोड असणे आवश्यक आहे. याच भावनेतून भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा सचिव डॉ. सौ. जयश्री मधुकर गुट्टे यांच्या पुढाकारातून शहरातील शेलू बाजार रोड परिसरातील भटक्या-विमुक्त जातींच्या वस्तीतील गरीब व गरजू कुटुंबांना मिठाई, दिवाळीचा फराळ आणि फटाक्यांचे वाटप करून त्यांच्यासोबत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

दिवाळीच्या सणानिमित्त सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण असताना समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांच्या घरातही सणाचा गोडवा निर्माण व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमातून केवळ मिठाई, फराळ किंवा फटाक्यांचे वाटप करण्यात आले नाही, तर समाजातील प्रत्येक व्यक्ती महत्त्वाची असून सुख-दुःखात एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे, असा माणुसकीचा संदेश देण्यात आला. या उपक्रमामुळे वस्तीत राहणाऱ्या लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. हातात मिठाई आणि फटाके मिळाल्याने चिमुकल्यांचा उत्साह द्विगुणित झाला. अनेक कुटुंबीयांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करीत आयोजकांचे आभार मानले. समाजातील गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याबरोबरच त्यांच्याशी आपुलकीचे नाते निर्माण करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. सण-उत्सव हे केवळ स्वतःच्या आनंदापुरते मर्यादित न ठेवता समाजातील शेवटच्या घटकापर्यंत त्याचा आनंद पोहोचविणे गरजेचे आहे. दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यातच सण साजरा करण्याचे खरे समाधान आहे, ही भावना या उपक्रमातून अधोरेखित झाली. भटक्या-विमुक्त समाजातील बांधवांसोबत दिवाळी साजरी करून सामाजिक समरसता, बंधुभाव आणि एकतेचा आदर्श निर्माण करणारा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला. यावेळी निखिल सदावर्ते, विनोद खंडारे, विनोद अदमने, हरिदास भोयर, आकाश मोरे, विठ्ठल राऊत आणि मारोती महाले यांच्यासह अन्य उपस्थित होते.

मनोज जरांगे पाटील यांचे भव्य स्वागत

महंत कबीरदास महाराजांच्या हस्ते नागरी सत्कार



■ प्रतिनिधी | मानोरा ■

संत नागोजी नपते पाटील व संत सेवालाल महाराज यांच्या पावन नगरीत म्हणजेच तीर्थक्षेत्र पोहरादेवी गडावर मराठा आरक्षणाचे संघर्षयोद्धा माननीय मनोजदादा जरांगे पाटील यांचे आगमन झाले. मराठा समाजाला हक्काचे आरक्षण मिळवून देण्यासाठी त्यांनी उभारलेल्या ऐतिहासिक लढ्याची दखल घेत, विजय अनंतकुमार पाटील यांच्या प्रमुख पुढाकाराने आणि उपस्थितीत गडावर संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यापसंगी देवी सेवादास महाराज संस्थान ट्रस्टचे भावी अध्यक्ष महंत कबीरदास महाराज यांच्या हस्ते मनोजदादा जरांगे पाटील यांना शाल, श्रीफळ आणि संत सेवालाल महाराज यांची प्रतिमा देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात जगदीश महाराज सर यांनी शब्दसुमनांनी स्वागत करून केली.

वंचित बहुजन आघाडीचे 'काळी दिवाळी' आंदोलन; जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

■ प्रतिनिधी | वाशिम ■



महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती आणि शासनाच्या शेतकरीविरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दिवाळीच्या दिवशी दि. ८ नोव्हेंबर रोजी वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'काळी दिवाळी' आंदोलन यशस्वीरित्या पार पडले.

श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या सूचनेने आणि प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे यांच्या निर्देशानुसार हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.

या आंदोलनाचे मुख्य आकर्षण म्हणजे वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसोबत थेट जमिनीवर बसून 'चटणी-भाकर' खाऊन शासनाचा अनोखा निषेध नोंदवला.

हे आंदोलन वंचित बहुजन आघाडीचे वाशिम पूर्व जिल्हाध्यक्ष विलास खिल्लारे आणि पश्चिम जिल्हाध्यक्ष दत्तराव धांडे यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली पार पडले. दोन्ही जिल्हाध्यक्षांच्या नेतृत्वात आंदोलक आणि शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देऊन आपल्या न्याय्य मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर केले.

शासनाच्या भूमिकेवर तीव्र प्रहार

यावेळी बोलताना नेत्यांनी सांगितले की, राज्य शासनाने शेतकऱ्यांना केवळ कर्जमुक्तीची खोटी आश्वासने दिली आहेत. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर जाहीर झालेली ५ हजार रुपयांची तुटपुंजी मदतदेखील अद्याप ७५ टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेली नाही. मंत्री, आमदार आणि खासदार शेतकऱ्यांच्या बांधावर जायला तयार नसून, हे सरकार पूर्णपणे असंवेदनशील झाले आहे.

या आंदोलनात जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आणि अल्पभूधारक शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शांततामय, लोकशाही आणि कायदेशीर मार्गाने करण्यात आलेल्या या आंदोलनाद्वारे शासनाचे डोळे उघडण्याचा प्रयत्न वंचित बहुजन आघाडीने केला आहे. या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष दत्ताराव धांडे, पूर्व विभाग जिल्हाध्यक्ष विलास खिल्लारे, दिलीप समाधान भगत, गणेश देशमुख, बाळासाहेब भगत, देवानंद मोरे अरविंद पडघान, महिला जिल्हाध्यक्ष ज्योतीताई इंगळे, जिल्हा संपर्क प्रमुख संतोष सरकटे, संदिप सावळे, सारनाथ अवचार बाळासाहेब खंडारे, युवा जिल्हाध्यक्ष सूर्यकांत गायकवाड, रमेश टाले, सुमेध वानाखेडे, शंकर तायडे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी बांधव मोक्षा संख्येने उपस्थित होते.

गोकुळ दूध संघातील शासकीय हस्तक्षेपाविरोधात वाशिम काँग्रेस आक्रमक!



ह प्रतिनिधी | वाशिम ह

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत होत असलेल्या कथित नियमबाह्य शासकीय हस्तक्षेपाविरोधात आणि सहकार क्षेत्रातील लोकशाहीच्या रक्षणासाठी वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने सोमवारी (दि. ९ नोव्हेंबर) जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांच्या नेतृत्वात हे निवेदन सादर करण्यात आले. महाराष्ट्र शासनाने गोकुळ दूध संघाच्या पार्श्वभूमीवर काढलेला शासन नियुक्त सदस्यांना मतदानाचा अधिकार देणारा अध्यादेश सहकार क्षेत्राच्या स्वायत्ततेवर गदा आणणारा असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला. हा अध्यादेश तातडीने रद्द करावा, गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदाची निवडणूक कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता तात्काळ व पारदर्शक पद्धतीने घेण्यात यावी, तसेच सतेज पाटील यांच्या आघाडीला स्पष्ट बहुमत असलेल्या लोकशाही पॅनलला कायदेशीररीत्या सत्ता स्थापन करण्याची संधी द्यावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

सहकारी संस्थांच्या कारभारात लोकशाही मूल्ये, स्वायत्तता आणि सभासदांच्या मताधिकाराचे संरक्षण होणे आवश्यक आहे. शासनाच्या हस्तक्षेपामुळे सहकार क्षेत्रातील लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचू नये.

जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार भारतीय स्टेट बँक यांच्या कडून श्री सचिन देविदास राठोड व स्नेहलता वसंतराव चव्हाण हे त्यांच्या मालकीचे मौजे काळी, ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथील शेत सर्व्हे / गट नंबर १९४ व १५० मधील प्लॉट नंबर १२ याचे एकंदर क्षेत्रफळ १३२.०० चौरस मीटर व प्लॉट नंबर २१ याचे एकंदर क्षेत्रफळ १३२.०० चौरस मीटर जागेवर कर्ज घेत आहे. परंतु सदर प्लॉटचा जुना खरेदीखताचे दस्त कारंजा दुय्यम निबंधक कार्यालया मध्ये नोंदविला असून त्याच दस्त क्र. १२६१/२०२१ अन्वये दिनांक १२/०२/२०२१ हा आहे, या मूळ खरेदीखताच्या दस्ता दिनांक २५/१०/२०२६ रोजी श्री सचिन देविदास राठोड यांच्या राहते घरून म्हणजेच रा. पो. बायपास, कारंजा (लाड), ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथून गहाळ झाले असुन, त्या स्वरूपाची तक्रार श्री सचिन देविदास राठोड यांनी पोलीस स्टेशन कारंजा (शहर) ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथे दिनांक ०४/११/२०२६ रोजी दिली असून त्याचा साना क्र. ३१/२०२६ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदीखताबाबत कोणाला कोणत्याही प्रकार दावा अथवा इतर अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसाचे आंत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा जर विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाच्या मुळ खरेदीखता दस्त कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर ८ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी. करीता ही जाहीर नोटीस.

सही
शिक्का ॲड. व्ही. व्ही. ठाकरे
शॉप नं. एल १०, वर्धमान प्लाझा,
स्टेट बँक समोर, कारंजा (लाड), जि. वाशीम
मो. नं. ९७६६८८०७६४, ९१४६०४८३१४



कारंजा-मानोरा मार्गावर बैल आडवा आल्याने दुचाकीचा अपघात

■ प्रतिनिधी | कारंजा ■



कारंजा-मानोरा मार्गावर दुपारी ३ वाजताच्या सुमारास अचानक बैल दुचाकीसमोर आडवा आल्याने दुचाकी घसरून अपघात झाला. या घटनेत दोघे जण जखमी झाल्याची घटना घडली. दशरथ किसन साखरकर (वय ५५) आणि जयकुमार राठोड (वय ४०), दोघेही रा. धामणगाव देव, अशी जखमींची नावे आहेत.

अपघाताची माहिती मिळताच सास कंट्रोल रूम, इझोरी येथील अजय ढोक यांनी जगद्गुरू नरेंद्राचार्य स्वामी महाराज संस्थानच्या रुग्णवाहिकेला तातडीने कळविले. माहिती मिळताच रुग्णवाहिकेने क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. रुग्णवाहिका पथकाने तत्परता दाखवत दोन्ही जखमींना तातडीने कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले.

या मदतकार्यात कक्षसेवक विजय शिरसाठ, श्री गुरुमाऊली रुग्णवाहिकेचे रमेश देशमुख, दीपक सोनवणे, अजय घोडेश्वर, राजूभाऊ राठोड आणि छोटू उके यांनी मोलाचे सहकार्य केले.

धनगर बांधवांसोबत आ. सई डहाके यांनी साजरी केली दिवाळी!

■ प्रतिनिधी | कारंजा ■



दिवाळी हा आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण. या सणाचा आनंद समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, या भावनेतून कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या भाजपा आमदार श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके यांनी शिवनगर येथील धनगर पाड्यावर धनगर बांधवांसोबत दिवाळी साजरी केली. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी त्यांनी धनगर वस्तीला भेट देत तेथील महिला आणि बांधवांशी संवाद साधला. त्यांच्या अडीअडचणी जाणून घेत सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय दिला.

राज्यातील भाजपा आमदारांनी आपल्या मतदारसंघातील कोणत्याही एका गावात जाऊन गोरगरीब नागरिकांसोबत दिवाळी साजरी करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता आमदार सईताई डहाके यांनी शिवनगर परिसरातील पोहा जंगलातील धनगर पाड्यावर भेट दिली. यावेळी त्यांनी धनगर समाजातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि बांधवांसोबत बराच वेळ संवाद साधत त्यांच्या जीवनातील प्रश्न, अडचणी आणि अपेक्षा जाणून घेतल्या. धनगर समाजातील बांधवांनी शेळ्या-मेंढ्या चारण्यासाठी जाताना येणाऱ्या विविध अडचणी, पशुधनाच्या संगोपनासंबंधीच्या समस्या तसेच दैनंदिन जीवनातील अडथळे आमदार डहाके यांच्यासमोर मांडले. यावेळी धनगर बांधवांच्या वतीने समाजाचे नेते छगनराव बहाळे यांनी आमदार श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके यांचा पारंपरिक घोंगडी देऊन सन्मान केला. धनगर समाजाच्या परंपरेचे प्रतीक असलेल्या घोंगडीच्या माध्यमातून त्यांच्याप्रती कृतज्ञता आणि आदर व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी भाजपा तालुकाध्यक्ष अमोल ठाकरे, सरपंच पदमाताई बहाळे, छगनराव बहाळे, विठ्ठलराव शिंदे, मोहन देवकते, मच्छिंद्र मदने, बबनराव शिंदे, रमेश टूले, अरुण टूले, सुरेश नेवारे, संतोष कोळकर, दादाराव कोपनर, बबनराव कोपनर, मोतीराम ठोंबरे यांच्यासह धनगर समाजातील महिला व बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सणाच्या वंचित घटकांच्या प्रश्नांना जाणून घेण्याचा प्रयत्न, अशी या दिवाळी भेटीची विशेष ओळख ठरली.

गृहलक्ष्मीचे पूजन करून सामाजिक कार्यकर्त्यांनी घडविला आदर्श

■ प्रतिनिधी | वाशिम ■

- घरातील महीला हिच खरी लक्ष्मी असल्याचे मत
- पत्नीपूजन कार्यक्रमाचे सर्व स्तरातून झाले कौतूक



दिवाळीच्या दिवशी सर्वत्र मूर्तीच्या लक्ष्मीचे पूजन केले जाते. तथापि, महापूरूषांचा वारसा घेऊन सत्याच्या मार्गाने वाटचाल करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांनी घरातील गृहलक्ष्मी असलेल्या आपली पत्नी तसेच आई व मुलीला लक्ष्मी मानून त्यांचे पूजन करून आरती ओवाळून दर्शन घेतले आणि त्यांना साडीचोळी भेट देत अनोख्या पध्दतीने दि.८ नोव्हेंबर रोजी जिल्हाभरात दिवाळी साजरी केली. या आगळ्यावेगळ्या पत्नीपूजन कार्यक्रमाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

गेल्या २१ वर्षांपासून सुरू असलेला सत्यशोधक कार्यकर्त्यांचा हा पायंडा आता सर्वत्र रूढ होत आहे. सामाजिक कार्य करणारे अनेक कार्यकर्ते आता दिवाळीच्या दिवशी आपल्या पत्नीचे पूजन करत आहेत. आनंद, उत्साह व जल्लोषाचे प्रतिक म्हणून पारंपारीक पध्दतीनूसार दिवाळी हा सण साजरा केला जातो. परंतू बलीप्रतिपदेच्या दिवशी दानशूर अशा प्रजावत्सल बळीराजाचा बटू वामनाने कपट नितीने खुन केला. म्हणून समस्त कृषीप्रधान शेतकरी तथा बहूजनांच्या पराभवाचा हा दिवस असल्याने परिवर्तनवादी विचारसरणीचे लोक दिवाळी दरम्यान बळीराजा स्मृती महोत्सव साजरा करतात. सोबतच घराला घरपण देणारी महीला हिच खरी लक्ष्मी असल्याचे मानून मूर्तीच्या लक्ष्मीचे पूजन करण्याऐवजी आपल्या पत्नीचे पूजन करण्याची प्रथा जिल्ह्यातील सत्यशोधक कार्यकर्त्यासह मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व ईतर सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये रूढ होत आहे. आपल्या पत्नीला अर्धांगिनी न संबोधता आता पूर्णांगिनी संबोधले जात आहे. सत्यशोधक साहित्य संस्कृती आणि संशोधन परिषदेचे माजी केंद्रीय अध्यक्ष सतिष जामोदकर, यांच्या पुढाकारातून वाशिम तालूक्यातील भट उमरा येथील सत्यशोधक समाजाचे जिल्हा प्रचार प्रमुख पेन्टर केशवराज काळे हे गेल्या २१ वर्षांपासुन दिवाळीच्या दिवशी आपल्या पत्नीचे साडीचोळी देऊन विधिवत पूजन करतात. त्यांचा वारसा आता जिल्ह्यातील अनेक घरांमधून पूढे जात आहे.

दि. ८ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या दिवाळी निमित्त सत्यशोधक समाजाचे माजी जिल्हाध्यक्ष गजानन धामणे यांनी आपल्या पत्नी सौ. मालती धामणे यांची ओवाळणी करून दर्शन घेत साडीचोळी भेट देऊन पूजन केले. यावेळी ऊभयतांनी शेतकऱ्यांचा दानशूर राजा बळीराजा, राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फूले यांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांना अभिवादन केले. रिसोड तालूक्यातील येवती येथील सत्यशोधक समाजाचे पदाधिकारी गणेश नाना शिंदे यांनीही आपल्या पत्नी सौ. अंजली शिंदे तसेच आई व मुलीचे पूजन करून त्यांना साडीचोळी भेट दिली. रिसोड येथिल संभाजी ब्रिगेडचे गोपाल खडसे यांनीही आपल्या पत्नी सौ. रूपाली खडसे यांचे विधीवत पूजन करून साडीचोळी भेट दिली. रिसोड येथिल मराठा सेवा संघांचे तालुकाध्यक्ष शिवाजी कव्हर यांनी आपली आई, मुलगी व पत्नी आणि जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्ष सौ. किरण कव्हर यांचे पूजन करुन साडीचोळी भेट दिली. वाशिम येथील समनक जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष अजय सोनूनकर यांनी आपल्या पत्नी सौ. शुभांगी सोनूनकर यांचे पूजन करून साडीचोळी भेट दिली. तसेच रिसोड तालुक्यातील लोणी येथील रहिवासी तथा प्रसिद्ध शिवधर्म विवाह विधिकर्ते शाहीर पंडीतराव देशमुख यांनी आपल्या पत्नी सौ. जयश्री देशमुख यांचे साडीचोळी देऊन पूजन केले.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३४२ ■ मंगळवार १० नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

दुष्काळाचे सावट गडद, आता पाण्याचे नियोजन करा - पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

नवरगावात शेतकऱ्यांसोबत दिवाळी, सालोडमध्ये बळीराजा मिलन सोहळा

वर्धा जनमाध्यम : पावसाने यंदा अपेक्षित साथ न दिल्याने जिल्ह्यावर दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. खरीप हंगामातील नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. आता भविष्यात पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठीही टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी उपलब्ध पाण्याचे काटकसरीने नियोजन करणे गरजेचे आहे. पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी शासन, प्रशासनासोबत नागरिकांनीही सामूहिक प्रयत्न करावेत, असे आवाहन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले. सेलू तालुक्यातील नवरगाव पुनर्वसन ग्रामपंचायतीत आदिवासी बांधव आणि शेतकऱ्यांसोबत दिवाळी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालकमंत्री बोलत होते. उपविभागीय महसूल अधिकारी कुश मोटवाणी, तहसीलदार डॉ. शकुंतला पाराजे, गटविकास अधिकारी देवानंद पानबुडे, मयूर दखणे महाराज, किशोर दिघे, अशोक कलोडे, विनोद लाखे, माजी सरपंच कडूकर, राहुल वांदिले, प्रफुल्ल खोडे आदी उपस्थित होते.



राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी संकटात सापडला आहे. अशा कठीण काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून त्यांना मदत करण्याचे काम करीत आहे. संकटग्रस्त शेतकऱ्यांना आधार, बळ आणि आत्मविश्वास देण्यासाठी त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्याचा उपक्रम राबविण्यात आल्याचे भोयर म्हणाले.बोर व्याघ्र प्रकल्पाच्या विस्तारात नवरगाव, गरमसूरसह अन्य गावांचे पुनर्वसन करण्यात आले. नवरगावच्या पुनर्वसनावेळी जमिनीच्या भूसंपादनाचा मोठ्या प्रमाणात मोबदला देण्यात आला. त्यामुळे राज्यातील इतर पुनर्वसित गावांकडूनही नवरगावप्रमाणे मोबदला मिळण्याची मागणी होत असल्याचे त्यांनी सांगितले. पुनर्वसित नवरगावात आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचे कुश मोटवाणी यांनी स्पष्ट केले.

यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते शेतकऱ्यांना दिवाळी फराळाचे वितरण करण्यात आले. तसेच ग्रामपंचायतीच्या नवनिर्मित प्रवेशद्वाराचे लोकार्पण करण्यात आले. तहसीलदार डॉ. शकुंतला पाराजे यांनी प्रास्ताविक केले.

संकटात शेतकऱ्यांनी खचू नये

सालोड (हिरापूर) येथे आयोजित बळीराजा शेतकरी दीपावली मिलन सोहळ्यातही पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी शेतकऱ्यांना धीर दिला. नैसर्गिक आपत्ती आणि बदलत्या हवामानामुळे शेतीसमोरील आव्हाने वाढत असली, तरी शेतकऱ्यांनी धैर्याने आणि सामूहिकपणे संकटांचा सामना करावा. शासन त्यांच्या प्रत्येक अडचणीत पाठीशी असून समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी माजी खासदार रामदास तडस, सुनील गफाट, सरपंच अमोल कन्नाके, उपसरपंच आशिष कुचेवार, राहुल वांदिले आणि पृथ्वीराज शिंदे उपस्थित होते.

शेतकऱ्यांना पीककर्ज आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची भूमिका महत्त्वाची आहे. आर्थिक अडचणीत सापडलेल्या वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला पुन्हा सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विनंती केली होती. त्यानुसार ही बँक महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे सुपूर्द करण्यात आली असून त्यामुळे बँकेला पुन्हा उभारी मिळेल, असे भोयर यांनी सांगितले.

दरम्यान, शेतकऱ्यांनी एकाच पिकावर अवलंबून न राहता दुग्धव्यवसाय, पशुपालन आणि अन्य पूरक व्यवसायांच्या माध्यमातून उत्पन्नाचे स्रोत वाढवावेत, असे आवाहन माजी खासदार रामदास तडस यांनी केले. यावेळी महिला, युवा आणि ज्येष्ठ शेतकऱ्यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

बालविकास विभागात ७३.५१ लाखांचा सरकारी खजिन्यावर डल्ला

स्वतःच्या वेतनात लाखोंची वाढ, बचत गटाच्या आहार देयकातही घोटाळा

समुद्रपूरच्या कनिष्ठ सहाय्यकावर फसवणुकीचा गुन्हा, लेखापरीक्षणात कारनामे उघड

समुद्रपूर जनमाध्यम

सरकारी तिजोरी म्हणजे स्वतःची मालमत्ता समजून शासकीय निधीवरच डल्ला मारण्याचा धक्कादायक प्रकार समुद्रपूरच्या एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयात उघडकीस आला आहे. स्वतःच्या वेतन देयकात अवाढव्य वाढ करून ७० लाख ५१ हजार ९१० रुपये हडपल्याचा, तर बचत गटाच्या आहार देयकातून आणखी तीन लाखांचा अपहार केल्याचा आरोप कनिष्ठ सहाय्यक अभिषेक ऊर्फ पियुष प्रकाश जगताप (वय २८) याच्यावर आहे. तब्बल ७३ लाख ५१ हजार ९१० रुपयांच्या या आर्थिक गैरव्यवहाराने महिला व बालविकास विभागातील आर्थिक नियंत्रण आणि देखरेखीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अभिषेक जगताप हा समुद्रपूर येथील एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयात कनिष्ठ सहाय्यक म्हणून कार्यरत होता. त्याला जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागात प्रतिनियुक्ती देण्यात आली होती. याच कालावधीत १ मे २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान त्याने स्वतःच्या वेतन देयकात अवाजवी वाढ करून शासनाच्या ७० लाख ५१ हजार ९१० रुपयांच्या निधीचा अपहार केल्याचे लेखापरीक्षणात समोर आले. संबंधित रक्कम स्वतःच्या बँक खात्यात वळती केल्याचा आरोप आहे.

इतकेच नव्हे, तर बचत गटाच्या आहार देयकांसाठी खोटी आणि चुकीची पीपीए तयार करून त्यातून तीन लाख रुपयांचा अतिरिक्त अपहार केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. म्हणजेच बालविकास विभागाच्या आर्थिक व्यवहारांमध्ये स्वतःच्या वेतनापासून ते बालकांच्या आहारासाठीच्या निधीपर्यंत गैरव्यवहार झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

जिल्हा परिषदेच्या वित्त विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेल्या लेखापरीक्षणात हा आर्थिक घोटाळा उघड झाला. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत जगताप याला निलंबित केले. तसेच संबंधित प्रकरणात फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार ८ नोव्हेंबर रोजी समुद्रपूरच्या प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी ज्योत्स्ना चव्हाण यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून समुद्रपूर पोलिसांनी अभिषेक ऊर्फ पियुष प्रकाश जगताप याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३१६ (२) आणि ३१६ (५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. शासकीय कार्यालयातील आर्थिक व्यवहारांची तपासणी झाली नसती, तर हा प्रकार आणखी किती काळ सुरू राहिला असता, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. बालविकास विभागातील या आर्थिक गैरव्यवहारामुळे प्रशासकीय यंत्रणेतील नियंत्रण आणि जबाबदारीची पोलखोल झाली आहे.

लेखापरीक्षणाने उघड केला आर्थिक गैरव्यवहार

स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वेतन देयकांमध्ये फेरफार केल्याचा प्रकार जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाच्या लेखापरीक्षणात उघडकीस आला. ७० लाख ५१ हजार ९१० रुपयांच्या वेतनाविषयक गैरव्यवहारासोबतच बचत गटाच्या आहार देयकातील तीन लाख रुपयांचा अपहारही समोर आला. मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी तातडीने निलंबनाची कारवाई करीत फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. अखेर ८ नोव्हेंबरला समुद्रपूर पोलिसांत गुन्हा दाखल झाला. मात्र, एवढ्या मोठ्या रकमेचा गैरव्यवहार होईपर्यंत संबंधित कार्यालयातील नियंत्रण यंत्रणा काय करीत होती, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

भारसवाड्यात चोरट्यांचा धुमाकूळ

एकाच रात्री ३ दुकाने फोडली





शटर वाकवून हजारोंचा मुद्देमाल लंपास, सीसीटीव्हीत चोरीची घटना कैद

आष्टी (शहीद) जनमाध्यम : दिवाळीच्या सणाचा उत्साह सुरू असतानाच आष्टी तालुक्यातील भारसवाडा येथे अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घातला. एकाच रात्री तीन दुकाने फोडून चोरट्यांनी हजारो रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. पहाटे तीन वाजताच्या सुमारास घडलेल्या या घटनांमुळे व्यापारी वर्गात खळबळ उडाली असून गावातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी सर्वप्रथम प्रवीण लोखंडे यांच्या दुकानाला लक्ष्य केले. दुकानाचे शटर वाकवून आत प्रवेश करत दोन हजार रुपये रोख, तेलाचे दोन डबे आणि अंदाजे सात हजार रुपये किमतीचे फटाके चोरून नेले.

त्यानंतर तुकडोजी महाराज मंदिर परिसरातील प्रवीण गोपालदास मालपाणी यांच्या किराणा दुकानाचे शटर वाकवून तसेच दरवाजा तोडून चोरट्यांनी प्रवेश केला. दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरे दुसरीकडे वळवून गल्ल्यातील अंदाजे सात हजार रुपये रोख लंपास केले. विशेष म्हणजे, दुकानातील किराणा मालाला चोरट्यांनी हात लावला नाही.

तिसऱ्या घटनेत गोपाल शामसुंदर तावरी यांच्या गणेश कृषी रसायन दुकानाचे शटर तोडून चोरट्यांनी पीसीओ आणि अंदाजे सात हजार रुपये रोख चोरून नेले. अशा प्रकारे एकाच रात्री तीन दुकाने फोडून चोरट्यांनी पोलिसांसमोर आव्हान उभे केले आहे. ८ नोव्हेंबर रोजी सकाळी चोरीच्या घटना उघडकीस येताच गावात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच तळेगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी ठाणेदार आशिष शिलागे, पोलीस कर्मचारी अतुल अडसाड आणि निखिल काळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. तसेच दुकानांमधील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. प्राथमिक तपासात चोरी पहाटे तीन वाजताच्या सुमारास झाल्याचे समोर आले आहे.

दिवाळीच्या सणात बाजारपेठेत वर्दळ वाढलेली असताना चोरट्यांनी एकाच रात्री तीन दुकाने फोडल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. चोरट्यांनी थेट शटर वाकवून दुकाने फोडण्याचे धाडस केल्याने रात्रीच्या पोलिस गस्तीचा प्रश्नही उपस्थित होत आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिक व व्यापाऱ्यांकडून होत आहे.

दुष्काळाच्या झळा, शेतीचे प्रश्न अन् व्यवस्थेच्या जबाबदारीवर मंथन

किसान अधिकार अभियानचा १९ वा बळी महोत्सव उत्साहात

प्रगतिशील शेतकरी व कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सन्मान

वर्धा जनमाध्यम शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्यासाठी केवळ घोषणा नव्हे, तर शासनाची ठोस इच्छाशक्ती आणि समाजाची संवेदनशीलता आवश्यक आहे. दुष्काळाच्या झळांनी होरपळणारी शेती, पाण्याचे नियोजन, कर्जाचा विळखा आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शासन व समाजाची नेमकी जबाबदारी काय, यावर १९ व्या बळी महोत्सवात विचारमंथन झाले. किसान अधिकार अभियानच्या वतीने रविवार, ८ नोव्हेंबर रोजी आयोजित या महोत्सवात शेतीच्या प्रश्नांसह सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचाही जागर करण्यात आला.

किसान अधिकार अभियानाच्या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभियानाचे मुख्य प्रेरक अविनाश काकडे होते. अभियानाचे अध्यक्ष सुदाम पवार, वैद्यकीय जनजागृती मंचचे अध्यक्ष डॉ. सचिन पावडे, नाट्यकर्मी हरिश इथापे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक वैभव लहाने, वर्धेचे नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, देवळीचे नगराध्यक्ष किरण ठाकरे, प्रा. नूतन माळवी, यशवंत झाडे, द्वारका इमडवार आणि महेंद्र मुनेश्वर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात प्रबोधनात्मक परिवर्तनवादी गीते, लोकगीते, पोवाडे आणि भजनांनी झाली. प्रशांत गुजर, जालिंदरनाथ, प्रकाश कांबळे, सुनील ढाले आणि संजय भगत यांनी सादर केलेल्या कलाविष्कारातून सामाजिक विषमता, शेतकरी-कष्टकऱ्यांचे प्रश्न आणि परिवर्तनाचा विचार प्रभावीपणे मांडण्यात आला. 'इडा पीडा टळो, बळीचे राज्य येवो' या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

डॉ. सचिन पावडे यांनी दुष्काळी परिस्थितीत पाण्याचे नियोजन आणि शासनासह समाजाच्या कर्तव्यावर प्रकाश टाकला. हरिश इथापे यांनी सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीची भूमिका स्पष्ट केली. प्रा. नूतन माळवी यांनी बळी महोत्सवाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, महिला आणि बहुजन समाजाची स्थिती यावर भाष्य केले. वैभव लहाने यांनी शेतकऱ्यांच्या कर्जाचे प्रश्न, बँकिंग धोरणे आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी मांडल्या.



यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, किरण ठाकरे, यशवंत झाडे, द्वारका इमडवार आणि महेंद्र मुनेश्वर यांनीही मनोगत व्यक्त केले. केवळ उत्सवापुरता बळीराजाचा गौरव न करता त्याच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचा संदेश या महोत्सवातून देण्यात आला. संचालन गोपाल दुधाने यांनी केले. प्रफुल्ल कुकडे यांनी आभार मानले.

प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव

महोत्सवात प्रगतिशील शेती आणि शेतीपूरक कार्यासाठी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सेवाग्रामचे मिलिंद भानसे, नागठाण्याचे राजू लोखंडे, आजनगावचे कमलेश डगवार आणि मंगला मारोती बोरजे यांचा प्रगतिशील शेतकरी म्हणून गौरव करण्यात आला. ज्ञानेश्वर ढगे यांचा शेती आधारित प्रक्रिया उद्योगासाठी, तर सुरेश लटारे यांचा शेती आधारित जीवनपद्धतीच्या विशेष कार्यासाठी सन्मान करण्यात आला.

महोत्सवात काँग्रेसचे प्रदेश सचिव डॉ. अभ्युदय मेघे, माजी जिल्हाध्यक्ष मनोज चांदुरकर, पत्रकार प्रवीण धोपटे, प्रगतिशील शेतकरी बाळकृष्ण माऊस्कर, धर्मपाल ताकसांडे, नरेंद्र मसराम, बबिता नेगी, अजिम तुरक, सागर सबाने, अनिल शेंडे, राजेश राजूरकर, चंद्रशेखर घोडे, राजू कळसाईत, सुषमा शर्मा, मजीद कुरेशी, गजानन राऊत, दिलीप गुल्हाणे, रामेश्वर मसराम, प्रदीप कुहीते, सुनील घिमे, पांडुरंग राऊत, प्रा. नावेद शेख, संजय काकडे, संदीप किटे, प्रणय कदम, योगेश घोगरे, राजू वाघमारे, प्रदीप वानखेडे, प्रवीण पेठे, कृष्णा बावणे, भास्कर नेवारे, सोनाली ठाकरे, अमोल कुकडे, जगदीश डोळसकर, योगेश राऊत, राजेश्वर नचगिरीवार, नितीन कठाणे, यशवंत ढगे, दिनेश काकडे, ज्योती पासवान, सुनील कोपुलवार, प्रमोद भोमले, निखिल सातपुते, अतुल शेंदरे, गजेंद्र सुरकार आदी उपस्थित होते.


बोर धरणाच्या कालव्याला गळती ; १५ वर्षांपासून दुरुस्तीचा वनवास

पाईपलाईनमध्ये गाळ, २०११ पासून पाठपुरावा करूनही काम रखडले

६५ लाखांचे इस्टिमेट तयार, तरी प्रत्यक्ष कामाची प्रतीक्षा, शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

सेलू / जनमाध्यम :,

धरणात पाणी आहे, कालव्यातून पाणी सोडले जाते; मात्र शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचण्याआधीच हजारो लिटर पाणी गळतीमुळे वाया जात आहे. बोर धरणाच्या कालव्याची दुरवस्था आणि पाईपलाईनमध्ये साचलेल्या गाळामुळे हिवरा परिसरातील शेतकरी सिंचनापासून वंचित राहत आहेत. विशेष म्हणजे, २०११ पासून सातत्याने पाठपुरावा करूनही दुरुस्तीचे काम मार्गी लागलेले नाही. शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांची पिके पाण्याअभावी वाळत असताना प्रशासनाकडून केवळ आश्वासनांचीच खैरात सुरू असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. यंदा काम सुरू न झाल्यास अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. मौजा हिवरा येथील पाणी वापर संस्थेचे अध्यक्ष मुकुंदा खोडे यांनी या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले. संबंधित मंत्री,



अर्थमंत्री, सिंचन विभाग, जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे वारंवार लेखी निवेदने देऊन पाठपुरावा केला आहे. २०११ पासून केलेल्या पाठपुराव्याची कागदपत्रे आपल्याकडे उपलब्ध असल्याचे खोडे यांनी सांगितले. धरण प्रशासनाने यापूर्वी कालव्याची तात्पुरती दुरुस्ती केली होती. मात्र, ही उपाययोजना निष्फळ ठरली. पाईपलाईनमधील गाळ काढण्यात आलेला नाही. त्यामुळे संपूर्ण पाईपलाईन काढून नव्याने काँक्रीटीकरण आणि दोन्ही बाजूंचे लाइनिंग करणे आवश्यक आहे. मागील वर्षी बोर धरणासाठी निधी उपलब्ध झाला असतानाही या कामाला अपेक्षित गती मिळाली नाही, अशी खंत खोडे यांनी व्यक्त केली.दरम्यान, या दुरुस्ती कामासाठी अधिकाऱ्यांनी ६५ लाख रुपयांचे इस्टिमेट तयार करून त्याची रचना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केली आहे. २ ऑक्टोबरला पाणी सोडल्यानंतर १५ ऑक्टोबरला वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. पाणी बंद झाल्यानंतर काम सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्ष कामाला सुरुवात कधी होणार, हा प्रश्न कायम आहे.दुसरीकडे, शेतकरी रवींद्र यांनीही पाणी मिळत नसल्याची व्यथा मांडली. कालव्याला गळती असून गेट व्यवस्थापन आणि कर्मचाऱ्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. धरण आणि कालव्याचे काम अद्याप पूर्ण क्षमतेने झालेले नसल्याने पाण्याचा अपव्यय होत असल्याचे त्यांनी सांगितले.

आश्वासन नको, आता प्रत्यक्ष काम हवे- २०११ पासूनचा पाठपुरावा, वारंवार दिलेली निवेदने, अधिकाऱ्यांची पाहणी आणि ६५ लाखांचे तयार झालेले इस्टिमेट, एवढी प्रक्रिया पूर्ण होऊनही शेतकऱ्यांच्या पदरी प्रतीक्षाच आली आहे. त्यामुळे यंदा दुरुस्तीचे काम प्रत्यक्ष सुरू झाले नाही, तर सर्व शेतकरी संघटित होऊन संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर आंदोलन करतील, असा ठाम इशारा हिवरा परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

Happy Diwali! Heartiest Greetings!
Best Wishes From - Management, Staff & Employees
CDAT
Explosive Industries Pvt. Ltd.
96/5 KM, Nagpur Amravati Road, Talegaon (S.P.), Tal. Ashti, Dist. Wardha - 442204



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

हा देश तुमचा ऋणी आहे

बस्तरमध्ये जवानांना मोदींचा सलाम ; दिल्या दिवाळीच्या शुभेच्छा!

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- दिवाळीच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी छत्तीसगडमधील बस्तर येथे म्हणाले की, आज नक्षलवादी दहशतवाद संपला असून विकासाचा वसंत ऋतू सुरू झाला आहे.ते म्हणाले, 'मी तुमच्यासोबत दिवाळी साजरी करण्यासाठी बस्तरच्या जंगलात आलो आहे.' यावेळी पंतप्रधान मोदींनी सुरक्षा दलांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी बस्तरला भेट दिली. त्यांनी काँग्रेस पक्षावर निशाणाही साधला. पंतप्रधान म्हणाले की, पूर्वीच्या सरकारांनी सुरक्षा दलांची पर्वा केली नाही.पंतप्रधान मोदी म्हणाले, 'आज देशभरात आणि जगभरात कोट्यवधी भारतीय दिव्यांचा पवित्र सण साजरा करत आहेत. लोक दूरदूरवरून आपापल्या घरी पोहोचत आहेत. कुटुंब आणि नातेवाईकांना भेटण्याचा हा एक मोठा सण आहे आणि मी सुद्धा तुमच्यासोबत दिवाळी साजरी करण्यासाठी आलो आहे.'

सैनिकांसोबतची प्रत्येक दिवाळी अविस्मरणीय ठरली -ते म्हणाले, 'जे सीमेवर आणि देशांतर्गत राष्ट्राचे रक्षण करतात, राष्ट्राचे रक्षक, भारतमातेचे शूर सैनिक, तुम्ही सर्व माझे पुत्र आणि कन्या आहात, माझे नातेवाईक आहात, तुम्ही सर्व माझ्या कुटुंबाचा भाग आहात.' हिमालयाच्या कुशीतील कारगिलपासून ते लेपछापर्यंत, समुद्रकिनाऱ्यावरील सर क्रीकपासून ते सागराच्या कुशीतील आयएनएस विक्रांतपर्यंत, शूर सैनिकांसोबतची प्रत्येक दिवाळी माझ्यासाठी अविस्मरणीय ठरली आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, 'ही एक असाधारण कामगिरी आहे. याचे मोठे श्रेय तुम्हाला, तुमच्यासारख्या लाखो शूर सैनिकांना, सैनिकांना आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांना जाते. म्हणूनच आज मी तुमच्यासोबत दिवाळी साजरी करण्यासाठी आणि १.४ अब्ज देशवासियांच्या वतीने तुमच्या त्यागाबद्दल, समर्पणाबद्दल आणि सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी



आलो आहे.'

नक्षलवादाविरुद्धची लढाई जिंकल्यानंतरची पहिली दिवाळी-ते म्हणाले, '२०२६ सालची ही दिवाळी खरोखरच विशेष आहे! ही पहिली दिवाळी आहे जेव्हा देशाने नक्षलवाद आणि माओवादी दहशतवादाविरुद्धची दशकांहून जुनी लढाई जिंकली आहे. ही पहिली दिवाळी आहे जेव्हा देशातील प्रत्येक जिल्हा नक्षलवादापासून मुक्त झाला आहे. ही पहिली दिवाळी आहे जेव्हा कोट्यवधी देशवासियांनी नक्षलवादाच्या भीतीवर विजय मिळवला आहे.'पंतप्रधान म्हणाले, 'माओवादी दहशतवाद आणि नक्षलवादाविरुद्धचा हा लढा सोपा नव्हता. एक काळ असा होता की देशभरातील जवळपास २० राज्यांमधील २३० हून अधिक जिल्हे नक्षलवादाने प्रभावित झाले होते. संध्याकाळनंतर जनजीवन ठप्प व्हायचे. या नक्षलवाद्यांनी लोकांचा मतदानाचा हक्कही हिरावून घेतला होता.'ते म्हणाले, 'बिहार, महाराष्ट्र, ओडिशा, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडसह देशाचा मोठा भाग डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवायांच्या विळख्यात होता. हजारो गावे, लाखो लोक आणि वर्षाला सुमारे २,००० नक्षलवादी हल्ले होत होते. २०१० मध्ये, जवळच्या दंतेवाडा येथे नक्षलवाद्यांशी झालेल्या चकमकीत आपले ७६ सुरक्षा कर्मचारी शहीद झाले होते.' २०१० मध्ये, दंतेवाडा येथेच एका दुसऱ्या घटनेत ४४ निष्पाप नागरिक मारले गेले होते.'पंतप्रधान मोदी म्हणाले, 'ही भूमी आपल्या वीरांच्या रक्ताने शापित झाली होती, पण राजवाड्यात राहणाऱ्या एकाही प्रतिष्ठित व्यक्तीच्या तोंडून हुंदका ऐकू आला नाही, कोणत्याही प्रतिष्ठित व्यक्तीच्या डोळ्यातून एकही अश्रू ढाळला गेला नाही. हे अनेक दशके चालू राहिले. याच काळात, एकट्या छत्तीसगडमध्ये १,००० हून अधिक सैनिक शहीद झाले.' आयईडी स्फोटांमध्ये अनेक सैनिकांनी आपले अवयव गमावले.

हरिद्वारमध्ये उसळला श्रद्धेचा सागर

हरिद्वार : दिवाळीच्या दुस-या दिवशी सोमवती अमावस्येचा विशेष योग जुळून आल्याने धर्मनगरी हरिद्वारमध्ये श्रद्धेचा जनसागर उसळला. सोमवारी ब्रह्ममुहूर्तापासूनच हर की पौडीसह गंगेच्या विविध घाटांवर भाविकांची मोठी गर्दी जमू लागली. सकाळी ८:३० वाजेपर्यंत सर्व प्रमुख घाटांवर मोठ्या संख्येने भाविक गंगास्नान करताना दिसत होते. तोपर्यंत सुमारे ५० हजार भाविकांनी गंगामातेत श्रद्धेची डुबकी घेतली होती. विविध राज्यांतून हरिद्वारला आलेल्या भाविकांनी गंगास्नान करून कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी, जीवनातील कष्टांपासून मुक्तीसाठी आणि मोक्षासाठी प्रार्थना केली. यावेळी मोठ्या संख्येने लोकांनी आपल्या पितरांच्या आत्म्याच्या शांतीसाठी तर्पण, श्राद्ध आणि पूजाअर्चाही केली. धार्मिक मान्यतेनुसार सोमवती अमावस्येला गंगास्नान, दानधर्म आणि पितरांच्या निमित्ताने केलेल्या धार्मिक कार्यांना विशेष महत्त्व आहे. यापूर्वी २०२३ मध्ये सोमवती अमावस्येला हरिद्वारमध्ये सुमारे २.५ लाख भाविकांनी गंगास्नान केले होते. यावेळीही मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता लक्षात घेता पोलिस आणि प्रशासनाने सुरक्षेची व्यापक व्यवस्था केली आहे. हर की पैडी येथील ब्रह्मकुंडात सकाळपासूनच भाविकांची वर्दळ सुरू होती. गंगास्नान केल्यानंतर लोकांनी मंदिरांमध्ये पूजा-अर्चना केली आणि गरजूंना दान दिले.



आदिवासी बांधवांसोबत जलसंपदा मंत्र्यांनी साजरी केली दीपावली

जळगाव दि. ९ : दीपावली हा आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण आहे. हा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या भावनेतून जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी यावल तालुक्यातील बोरमळी येथे आदिवासी बांधवांसोबत सहपरिवार, सहकुटुंब दीपावली साजरी केली. यावेळी आदिवासी पाड्यावरील बंधू-भगिनींना मंत्री श्री महाजन हस्ते दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी त्यांनी सर्वांसोबत स्नेहभोजनाचा आनंद घेतला. दिवाळीच्या निमित्ताने आदिवासी बांधवांच्या भेटीला गेलेल्या मंत्री महाजन यांनी ग्रामस्थांशी मनमोकळा संवाद साधला. फराळ वाटपाच्या माध्यमातून केवळ सणाचा आनंदच नव्हे, तर आपुलकी आणि सामाजिक बांधिलकीचा भावही त्यांनी जपला. यावेळी उपस्थितांच्या चेहऱ्यावरील आनंद, उत्स्फूर्त प्रतिसाद आणि प्रेमळ संवादामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.समाजातील प्रत्येक घटकाला सण-उत्सवांचा आनंद घेता यावा, प्रत्येकाच्या आयुष्यात सुख, समाधान आणि समृद्धी नांदावी, हीच या दीपोत्सवामागील भावना असल्याचे यावेळी दिसून आले. माणुसकीचे नाते जपत समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन सण साजरा करण्याचा त्यांचा हा उपक्रम उपस्थितांसाठी विशेष आनंददायी ठरला. आदिवासी बांधवांसोबतच्या या स्नेहपूर्ण सहवासामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचा व समाधानाचा भाव दिसून आला. यावेळी आमदार अमोल जावळे, जामनेरच्या नगराध्यक्षा साधनाताई महाजन यांच्यासह विविध पदाधिकारी तसेच आदिवासी बांधव आणि भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पत्नीला 'जा मर' म्हणणे आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा नाही

अलाहाबाद/वृत्तसंस्था : पत्नीला जा आणि मर बोलणे म्हणजे नेहमीच आत्महत्येस प्रवृत्त करणे नव्हे, असा महत्वपूर्ण निकाल अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला. केवळ मृत व्यक्तीने आत्महत्या केली म्हणून आरोपीला दोषी धरता येणार नाही असे स्पष्ट करत न्यायालयाने पतीला निर्दोषमुक्त करत ७ वर्षाची शिक्षा रद्द केली.

भांडणादरम्यान रागाच्या भरात बोललेले शब्द आणि कायदेशीररीत्या गुन्ह्यासाठी प्रवृत्त करणे यात फरक आहे. अशा शब्दांचा वापर कोणत्या परिस्थितीत, कोणत्या मानसिकतेत केला गेला, हे तपासणे गरजेचे असल्याचे न्यायालयाने नमूद केले. भारतीय दंड संहितेच्या कलम ३०६ अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यासाठी आरोपीचा गुन्हेगारी हेतू आणि त्याने प्रत्यक्षपणे आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा ठोस पुरावा आवश्यक आहे. केवळ कौटुंबिक छळ किंवा आत्महत्या घडली या तथ्यावरून आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा गुन्हा सिद्ध होत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. मयत महिलेचा २० वर्षांपूर्वी विवाह झाला होता.

कौटुंबिक वादातून महिलेने आत्महत्या केली होती. या प्रकरणी ट्रायल कोर्टाने पतीला दोषी ठरवून ७ वर्षांची कडक कारावासाची शिक्षा सुनावली होती. ही शिक्षा उच्च न्यायालयाने रद्द करत पतीची निर्दोष मुक्तता केली. ट्रायल कोर्टाने केवळ आत्महत्येची घटना आणि सामान्य छळाच्या आरोपांच्या आधारे पतीला दोषी ठरवले असून हे कायद्यानुसार चुकीचे आहे असे



मत न्यायालयाने नोंदवले. न्यायालयाने स्पष्ट केले की, आत्महत्येस प्रवृत्त करण्याच्या गुन्ह्यासाठी आरोपीचा स्पष्ट उद्देश किंवा त्या व्यक्तीला आत्महत्येस भाग पाडण्याची सक्रिय इच्छा असणे आवश्यक आहे. रागाच्या भरात किंवा वादादरम्यान तोंडातून निघालेले शब्द कोणत्याही गुन्हेगारी उद्देशाशिवाय बोलले जातात.

केवळ जा मर असे म्हणणे म्हणजे संबंधित व्यक्तीला आत्महत्या करण्यासाठी कोणतीही थेट चिथावणी किंवा प्रत्यक्ष मदत केल्यासारखे होत नाही. जोपर्यंत आरोपीने जाणीवपूर्वक अशी परिस्थिती निर्माण केली नाही, जिथे पीडित व्यक्तीकडे आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय उरला नसेल, तोपर्यंत हा गुन्हा लागू होत नाही. प्रत्येक व्यक्तीची मानसिक क्षमता आणि संवेदनशीलता वेगळी असते.

शब्दांचा संदर्भ आणि परिस्थिती महत्त्वाची-न्यायमूर्ती जफीर अहमद यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की जा मर हे शब्द कोणत्या परिस्थितीत, कोणत्या प्रसंगी आणि काय विचार करून बोलले गेले हे तपासणे आवश्यक असते. अशा विधानांना प्रत्येक वेळी थेट आत्महत्येची चिथावणी मानता येणार नाही.

गुन्हेगारी हेतू आवश्यक

आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी आरोपीचा स्पष्ट उद्देश किंवा पीडित व्यक्तीला मृत्यूकडे ढकलण्याची जाणीवपूर्वक केलेली कृती असणे आवश्यक आहे. रागाच्या भरात बोलल्या जाणा-या भावनिक शब्दांमध्ये असा कायदेशीर हेतू नसतो.

वैवाहिक वाद म्हणजे गुन्हेगारी छळ नव्हे- वैवाहिक जीवनातील सर्वसामान्य वाद, टोमणे किंवा भांडणे यामुळे जर जोडीदाराने आत्महत्या केली, तर प्रत्येक प्रकरणात त्याला आत्महत्येस प्रवृत्त करणे म्हणता येणार नाही. आत्महत्या ही संबंधित व्यक्तीच्या मानसिक संवेदनशीलतेवरही अवलंबून असते.

अमृता फडणवीसांना ऐपतीनुसार भाऊबीज पाठवणार;जरांगे

मुंबई/प्रतिनिधी-मनोज जरांगे पाटील यांनी अमृता फडणवीस यांना आपल्या ऐपतीनुसार भाऊबीज पाठवणार असल्याचे नुकतेच सांगितले आहे. याबाबत बोलताना जरांगे यांनी आठवण करून दिली की, मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरू असताना अमृता फडणवीस यांनी त्यांना जेवणासाठी आमंत्रित केले होते. त्यावेळी जरांगे पाटील यांनी भाऊबीजेला साडीचोळी घेऊन जेवायला येईन असे म्हटले होते. मात्र, आंदोलनामुळे आणि मैदान सोडता येत नाही या भूमिकेमुळे त्यांना त्यावेळी जाता आले नाही, असे जरांगे यांनी स्पष्ट केले. लढाई जिंकायच्या अगोदर जिंकला असता तर मी माघारी आलो असतो असे त्यांनी नमूद केले. आता ते म्हणतात की, 'आता ठीक आहे. नाही नाही आता बोलावलेलं नाहीये. पण ठीक आहे आता बहिणीकडे पाठवून देऊ, तिन्ही बहिणींकडे पाठवून देऊ. आता ताईकडे पण पाठवून देऊ. अमृता ताईकडे पण पाठवून देऊ, सुप्रिया ताईकडे पण भाऊबीज आपली पाठवून देऊ. आमच्या जे ऐपतीप्रमाणं आहे ते पाठवून देऊ.' जरांगे पाटील यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. मराठा आरक्षणाच्या लढ्यासोबतच जरांगे यांनी हे एक सलोख्याचे आणि प्रतीकात्मक नाते जपण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.



एकनाथ शिंदेंची शेतकऱ्यांसोबत दिवाळी


शेतकऱ्याच्या मुलीच्या शिक्षणासह लग्नाची जबाबदारी स्वीकारली

मुंबई/प्रतिनिधी-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यंदाची दिवाळी जालन्यातील भिलपुरी गावातील शेतकरी अंबादास तांगडे यांच्या कुटुंबासोबत साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. दिवाळीनिमित्त ते भिलपुरी येथे पोहोचले असून, अंबादास तांगडे यांच्या कुटुंबासोबत सलोख्याने संवाद साधणार आहेत. या भेटीदरम्यान, शिंदे यांनी कुटुंबातील एका मुलीच्या शिक्षणाची आणि लग्नाचीही जबाबदारी स्वीकारली. अंबादास तांगडे यांच्या घरात एका मुलीचे वडील वारले असून, ती मुलगी सध्या बारावीत शिकत आहे. तिला पोलीस बनण्याची इच्छा आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्या मुलीच्या संपूर्ण शिक्षणाचा आणि तिच्या लग्नाचा खर्च उचलण्याचे आश्वासन दिले. 'मी करीन बेटा तुझं. साहेबांना सांगितलंय नाला, मी करीन,' असे म्हणत त्यांनी या जबाबदारीला दुजोरा दिला. ही घटना मुख्यमंत्र्यांची समाजाशी असलेली जवळीक आणि सामाजिक बांधिलकी दर्शवते. याशिवाय, शिंदे मौजपुरी गावातील शेतकऱ्यांसोबतही संवाद साधणार आहेत



रोहित पवार १५ नोव्हेंबरला मोठा बॉम्ब फोडणार


मुंबई/प्रतिनिधी - अजितदादांच्या अपघाताबाबत आम्हाला शंका आहे. तपास संथ गतीने सुरू आहे. ज्या पद्धतीने तपास व्हायला हवा होता, तसा होताना दिसत नाही. सत्ताधारी योग्य दिशेने तपास करत नसल्याचा आमचा संशय आहे. महाराष्ट्रातील ९० टक्क्यांहून अधिक लोकांना हा अपघात नसून घातपात असावा, असं वाटतं, असा दावा रोहित पवारांनी केला आहे.या प्रकरणात साधी एफआयआरही दाखल होत नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच, १५ नोव्हेंबरला या प्रकरणासंदर्भात महत्त्वाचं प्रेझेंटेशन करणार असल्याची माहिती दिली. या प्रेझेंटेशनमधून काही महत्त्वाच्या बाबी समोर आणणार आहोत. त्यातून अजितदादांना न्याय मिळवून देण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. दिवाळी होऊ दे, त्यानंतर शेवटचं प्रेझेंटेशन मी घेईन, असंही त्यांनी सांगितलं. रामदास कदम यांनी केलेल्या आरोपांबाबत विचारलं असता ते आरोप आपण ऐकले नसल्याचं रोहित पवार म्हणाले.मात्र, सुनील तटकरे यांचं नाव या प्रकरणाशी जोडण्यात आल्याचं



त्यांनी नमूद केलं. सत्ताधाऱ्यांकडे या प्रकरणाबाबत काही वेगळी माहिती असेल, तर त्यांनी केवळ नावं घेण्याऐवजी पुरावे समोर आणावेत. त्यामुळे सत्य शोधण्यास मदत होईल आणि अजितदादांना न्याय मिळू शकेल, असं आवाहनही त्यांनी केलं. कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळमधील सत्तासंघर्षावरही रोहित पवार यांनी भाष्य केलं.सतेज पाटील यांच्या पॅनेलचे बहुतांश उमेदवार निवडून आले असतानाही भाजप आणि मित्रपक्षांकडून रडीचा डाव खेळला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. गोकुळमध्ये बंटी पाटील यांच्या पॅनेलला लोकांनी कौल दिला. मात्र दुर्दैवाने भाजप आणि मित्रपक्ष रडीचा डाव खेळत आहेत. आज मी गोकुळमधील भाषणं ऐकली. त्यात सगळ्यांनी हसन मुश्रीफ यांना लक्ष्य केलं. मात्र या सगळ्यामागचे मुख्य सूत्रधार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. त्यांच्याबाबत कोणीही बोललं नाही, अशी टीका त्यांनी केली.मुख्यमंत्र्यांच्या पाठिंब्याशिवाय चार जणांना मतदानाचा अधिकार देण्यासारखी गोष्ट शक्य नसल्याचा दावाही त्यांनी केला. महाराष्ट्रात मुख्यमंत्र्यांच्या आशीर्वादाशिवाय काहीही होऊ शकत नाही. त्यामुळे या प्रकरणात ज्यांची भूमिका महत्त्वाची आहे, त्यांनाच लक्ष्य करणं गरजेचं होतं. मात्र आजच्या भाषणांमध्ये ते दिसलं नाही,

राज्यात तंत्रनिकेतनमध्ये एआयचा वापर वाढवा

पुणे /प्रतिनिधी- तंत्रज्ञानातील वेगवान बदलांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्यांनी सज्ज करण्यासाठी राज्यातील सर्व तंत्रनिकेतनांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर वाढविण्याचे आदेश महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने (एमएसबीटीई) दिले आहेत. राज्यातील सरकारी, अनुदानित आणि विनाअनुदानित तंत्रनिकेतनसह सर्व संस्थांमध्ये अध्यापन, अध्ययन, शैक्षणिक व्यवस्थापन आणि प्रशासकीय कामकाजासाठी एआय आधारित साधनांचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात आला आहे.मंडळाचे सचिव डॉ. मारुती गायकवाड यांनी यासंदर्भात परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. पारंपरिक अध्यापन पद्धतींसोबत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यास विद्यार्थ्यांना अधिक परिणामकारक शिक्षण देण्यास मदत होणार आहे; तसेच शिक्षकांचा वेळखाऊ कामांवरील भार कमी होऊन संस्थांच्या प्रशासकीय कामकाजातही सुलभता येऊ शकते, असा



उद्देश आहे. त्यानुसार तंत्रनिकेतनांनी शैक्षणिक कामकाजासाठी गुगल वर्कस्पेसचा वापर करण्याचा विचार करावा; तसेच संस्थात्मक डोमेनवर आधारित ई-मेल आयडींच्या माध्यमातून 'जेमिनी' आणि 'गुगल एआय प्रो' यांसारख्या सुविधांचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या साधनांमुळे शिक्षकांना अध्यापनासाठी शैक्षणिक साहित्य तयार करणे, विषयांचे सुलभ स्पष्टीकरण देणे आणि विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करणे शक्य होणार आहे. विद्यार्थ्यांनाही विषय समजून घेणे, माहितीचे विश्लेषण करणे आणि अध्ययन अधिक प्रभावी बनविण्यासाठी एआयची मदत घेता येणार आहे.

शासन नियुक्त ४ संचालक मतदान करणार

मुंबई/प्रतिनिधी- गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदाची निवडणूक उद्या ठरल्याप्रमाणे होणार आहे. या निवडणुकीत २५ निवडून आलेल्या सदस्यांसह शासनाने नियुक्त केलेल्या चार सदस्यांनाही मतदानाचा अधिकार मिळणार आहे. औरंगाबाद खंडपीठाने या चार सदस्यांची नियुक्ती रोखण्यास नकार दिल्याने त्यांच्या मतदानावरचा कायदेशीर पेच सुटला आहे. या चार शासन नियुक्त सदस्यांनी केलेले मतदान मात्र वेगळे ठेवले जाणार आहे, अशी माहिती समोर आली आहे. संपूर्ण मतदान प्रक्रिया पारदर्शकतेसाठी व्हिडीओग्राफी केली जाईल. या प्रकरणाची पुढील सुनावणी २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. या निर्णयामुळे महायुतीचा अध्यक्ष होण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे बोलले जात आहे. समविचारी आघाडीने या नियुक्त सदस्यांच्या मतदानाच्या अधिकाराला आव्हान दिले होते, मात्र न्यायालयाने त्यांना मतदानात सहभागी होण्याची परवानगी दिली आहे. उद्या सकाळी ११ वाजता गोकुळ शिरगाव येथील प्रधान कार्यालयात ही अध्यक्ष निवड सभा पार पडेल.

एकमेकांच्या हातात हात घालून दुष्काळावर मात करूया-चंद्रकांत पाटील

शेतकऱ्यांच्या घरी भेट देऊन केले फराळ वाटप

सांगली : पावसाने ओढ दिल्याने राज्यात सध्या दुष्काळी स्थिती आहे. त्यामुळे राज्य शासनाने राज्यातील ३०५ तालुके दुष्काळी घोषित केले. त्यात सांगली जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा समावेश आहे. अशा कठीण परिस्थितीत शासनाने शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजना आखल्या आहेत. या अनुषंगाने प्रत्यक्ष शेतकऱ्यांना दिलासा व विश्वास देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी आज जत तालुक्यातील बालगाव येथील गुरुदेव योगाश्रमात शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. दुष्काळी स्थितीच्या अनुषंगाने मंत्र्यांनी प्रत्यक्ष गावात जाऊन शेतकरी बांधवांशी दिवाळी फराळ करावा व या माध्यमातून त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात, अशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे





आणि सुनेत्रा पवार यांच्या सूचनेनुसार हा कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी आमदार धैर्यशील कदम, आमदार गोपीचंद पडळकर, जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, जतचे नगराध्यक्ष डॉ. रवींद्र आरळी, जतचे उपविभागीय अधिकारी अजयकुमार नष्टे, पालकमंत्री महोदय यांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव, बालगाव योगाश्रमाचे अमृतानंद स्वामीजी महाराज आदींसह परिसरातून आलेले शेतकरी उपस्थित होते.दुष्काळावर मात करण्यासाठी राज्य शासन शेतकरी बांधवांसोबत असून, त्यांच्या सुख दुःखात प्रत्यक्ष सहभागी होऊन पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी हा विश्वास दिला. ते म्हणाले, अल निनोमुळे उद्भवलेल्या या गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. पीकपंचनामे पूर्ण झाल्यावर नुकसान भरपाई देण्यात येईल. तोपर्यंत दिवाळी सण साजरा करण्यासाठी राज्य शासनाकडून रक्कम रुपये पाच हजारांची मदत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे. पिण्याचे पाणी व पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्यात येईल. याबरोबरच जतचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार व जिल्हाधिकारी यांनी दोन स्वतंत्र बैठका घ्याव्यात, असे त्यांनी यावेळी सूचित केले. त्याचवेळी पुढील वर्षी ऑगस्टपर्यंत उपलब्ध पाण्याचे व्यवस्थापन करायचे आहे. त्यामुळे पाण्याचा वापर काटकसरीने करावा व त्याबाबत जनजागृतीही करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.जतमधील दुष्काळी स्थितीबद्दल मंत्रीमहोदयांना अवगत करून आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले, म्हैसाळ उपसा सिंचन योजनेचे पाणी जतपर्यंत पूर्ण क्षमतेने पोहोचवण्यासाठी पंपाची क्षमता वाढविण्यास्व मंजुरी मिळाली आहे. तसेच नाबार्डच्या माध्यमातून उपनलिका उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

क्षेपणास्त्रांच्या पल्ल्यावरील २,००० किमीची मर्यादा अमान्य

तेहरान : इराणच्या क्षेपणास्त्र क्षमतेबाबत आंतरराष्ट्रीय चर्चा तीव्र झाली आहे. आयआरजीसीच्या एका प्रवक्त्याने जाहीर केले की इराणने आपल्या क्षेपणास्त्रांच्या पल्ल्याची २,००० किलोमीटरची जुनी मर्यादा हटवली आहे. काही महिन्यांपूर्वी, खुझेस्तानमधील सर्वोच्च नेत्यांचे प्रतिनिधी अब्दुलनबी मुसावीफर्ड यांनी दावा केला होता की, इराण आपल्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा पल्ला १५,००० किलोमीटरपर्यंत वाढवण्याची तयारी करत आहे. त्यामुळे आता ट्रम्प यांची सर्वात मोठी अट धुडकावून लावत इराण अमेरिकेवर मारा करू शकणारी क्षेपणास्त्रे तयार करत असल्याची चर्चा आहे. इराणने आपल्या क्षेपणास्त्रांच्या पल्ल्यावरील २,००० किमीची मर्यादा हटवण्याची घोषणा केली आहे. क्षेपणास्त्रांचा पल्ला १५,००० किमीपर्यंत वाढवला जाईल, असाही दावा केला जात आहे. हा दावा खरा ठरला, तर अमेरिकेचा मुख्य भूभागसुद्धा इराणच्या क्षेपणास्त्रांच्या टप्प्यात येईल. हे विधान केवळ एक तांत्रिक दावा नसून, प्रादेशिक आणि जागतिक सुरक्षा घडामोडींवर परिणाम करणारे मानले जात आहे. इराण ब-याच काळापासून मध्यम पल्ल्याची बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे विकसित करत आहे. त्यांची सध्याची क्षमता मध्य-पूर्व आणि युरोपच्या काही भागांपर्यंत पोहोचू शकते असे मानले जाते. तथापि, १५,००० किलोमीटरच्या पल्ल्याचा अर्थ आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे विकसित करणे असा होतो. आयसीबीएम विकसित करणे ही एक अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. त्यामध्ये प्रगत रॉकेट तंत्रज्ञान, अचूक मार्गदर्शन प्रणाली, पुनर्प्रवेश वाहने आणि विश्वसनीय चाचणी यांचा समावेश असतो. इराणचा अवकाश प्रक्षेपण कार्यक्रम काही संबंधित तंत्रज्ञानासाठी पाया प्रदान करतो, कारण अवकाशात उपग्रह प्रक्षेपित करणाऱ्या रॉकेट आणि लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांमध्ये अनेक तांत्रिक साम्ये आहेत.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

ऊस उत्पादकांना न्याय

ऊस दरासाठी सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनावर दोन्ही बाजूंनी सर्वमान्य तोडगा निघाल्याने ऊस उत्पादकाची यंदाची दिवाळी गोड झाली. ऐन दिवाळीच्या तोंडावर सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील हजारो ऊस उत्पादक शेतकरी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली रस्त्यावर उतरले. यावर्षी उसाला प्रतिटन साडेचार हजार रुपये दर मिळावा, अशी त्यांची मागणी होती. बाजारात साखरेचे दर वाढल्याने उसाला गतसालपेक्षा चांगला दर मिळण्याच्या आशा उंचावल्या होता. शेतकरी आंदोलनाला हा मोठा आधार असल्याने राज्यातील विशेषतः ऊसपट्ट्यातील शेतकरी एकवटले. पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर सांगली- कोल्हापूरदरम्यान ऊस शेतकऱ्यांनी ठिय्या मांडल्याने मोठी कोंडी झाली. या महामार्गावर अहोरात्र हजारोंच्या संख्येने बसेस, मालवाहू वाहने, टेम्पो, खासगी मोटारी धावत असतात. आंदोलनामुळे माल वाहतुकीला मोठा फटका बसला. शेकडो प्रवासी बसेस रद्द कराव्या लागल्या. दोन-तीन दिवस ट्रक्स व बसेसच्या कित्येक किमी. लांब रांगा लागल्या. अखेर आंदोलक शेतकरी व साखर कारखाने यांच्यात वेळीच तोडगा निघाला व शेतकऱ्यांच्या पदरात भरीव लाभ प्राप्त होणार, हे मान्य झाल्यावर आंदोलन स्थगित झाले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी आंदोलन होते. त्यांच्या मागण्या फार मोठ्या किंवा अवाजवी नव्हत्या. साखर कारखानदारांनीही त्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीने विचार केल्याने शेवट गोड झाला आणि शेतकऱ्यांना व त्यांच्या परिवाराला दिवाळीचा आनंद मिळाला. आंदोलन कधी सुरू करायचे व कधी थांबवायचे, याची जाणीव नेत्यांना असेल, तर शेवट गोड होतो. कोल्हापूर जिल्ह्यातील किणी टोल नाका हे आंदोलनाचे केंद्र बनले. शेतकऱ्यांच्या प्रतिटन ४,५०० रुपये मागणीवर साखर कारखानदारांनी सुरुवातीला ३८०० रुपये अधिक २०० अशी देण्याची तयारी दर्शवली होती. चर्चेनंतर प्रतिटन ४,२०० रुपये टप्प्याटप्प्याने देण्याचा तोडगा मान्य झाला. समझोत्यानुसार ३,९०० तातडीने, १०० रुपये गाळप हंगाम संपल्यावर व आणखी २०० रुपये पुढील हंगाम सुरू होण्यापूर्वी शेतकऱ्यांना मिळणार आहेत. आपल्या मागण्यांसाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ६२ तासांचे रास्ता रोको आंदोलन केले. कोल्हापूरप्रमाणेच सातारा व सांगली जिल्ह्यातही उसाचा हाच दर मिळावा, या संबंधीही चर्चा झाली. सहकारी साखर कारखानदारी क्षेत्रात महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहिल्यानगर जिल्ह्यांमध्ये साखर कारखानदारी मोठी आहे. विदर्भ व मराठवाड्याच्या काही भागांत ऊस उत्पादन होते. गेल्या वर्षीच्या तुलनेने महाराष्ट्रातील ऊस लागवड क्षेत्र यंदा जास्त आहे. ऊस उत्पादनही जास्त अपेक्षित आहे. महाराष्ट्रात सहकारी साखर कारखानदारी ही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. ऊस उत्पादन जास्त झाले म्हणजे शेतकऱ्याला जास्त पैसे मिळतात असे सरळ गणित मांडता येत नाही. उसाला मिळणारा दर, उत्पादन खर्च व पैसे कधी हातात येतात ती वेळ महत्त्वाची असते. ऊसतोडणी कामगार, ट्रॅक्टर व ट्रक वाहतूकदार व कर्मचारी, मुकादम व मजूर, कारखान्यातील कायम व हंगामी कर्मचारी, यंत्रसामग्रीची देखभाल व दुरुस्ती करणारे व व्यापारी आदी सर्व मिळून लाखो लोकांचा साखर उद्योगाशी संबंध येतो. गेल्या वर्षीच्या गळीत हंगामात महाराष्ट्रात सहकारी व खासगी मिळून २१० कारखाने नोंदवले गेले. राज्यातील सरासरी साखर उतारा ११.२६ होता. उसाचा उत्पादन खर्च मोठा आहे व त्यात दरवर्षी वाढ होते. जमीन मशागत, खते, पाणी, औषधे, मजुरी, वाहतूक यावर मोठा खर्च होतो. उसाला पाणी भरपूर लागते. पाऊस कमी झाला व पाणी पुरेसे मिळाले नाही, तर ऊस उत्पादनावर परिणाम होतो. शेतकऱ्याला वीज व डिझेलचा वाढता खर्चही सहन करावा लागतो. दरवर्षी ऊसतोडणी कामगार व कारखान्यापर्यंत होणारा वाहतुकीचा खर्च वाढतो आहे. ऊसतोडणी कामगार वेळेवर मिळत नाहीत. उसाचा दर काय मिळणार, याची कल्पना शेतकऱ्यांना अगोदर नसते. तसेच ऊस दराची बिले कधी हातात मिळणार, थकबाकी वसूल कधी होणार, याचीच शेतकऱ्यांना विवंचना असते. केंद्र सरकार दरवर्षी गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी एफआरपी (रास्त व किफायतशीर दर) जाहीर करते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना साखर कारखान्यांनी हा दर द्यायचा असतो. हा किमान कायदेशीर दर असतो. एफआरपी हा काही अंतिम दर नसतो. म्हणूनच शेतकरी संघटना व कारखानदार यांच्या चर्चेतून अंतिम दर निश्चित होत असतो. साखर कारखानदारांसमोरही अडचणींचा डोंगर असतो. साखरेला बाजारात चांगला दर मिळला नाही, तर ऊस उत्पादकांना जास्त दर कुठून देणार? एफआरपीनुसार दर शेतकऱ्याला द्यावाच लागतो. अनेक कारखान्यांवर कर्जाचा बोजा असतो. अपेक्षित उतारा मिळाला नाही की, आर्थिक गणित बिघडते. साखर कारखानदारी निकोप वातावरणात चालावी, यासाठी केंद्र व राज्य सरकार दोघांचीही जबाबदारी आहे. शेतकरी संघटना, साखर कारखानदार आणि सरकार यांच्यात समन्वय नसल्यानेच ऊस उत्पादकांना रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची वेळ येते. यंदाही हा संवादाचा अभाव दिसून आला. बाजारात साखरेचे दर वाढले असताना तुलनेत उसाला योग्य दराची उत्पादकाची मागणी होती. ऊस उत्पादकाला बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी तो देणे आवश्यक होते. शिवाय इथेनॉलनिर्मितीचा भारही साखर कारखान्यांवर आहे. साहजिकच साखरेचा दर केंद्रस्थानी आला आणि शेतकरी रस्त्यावर उतरला. ऐन दिवाळीच्या सणाची या आंदोलनाला किनार होतीच. नाक दाबल्याशिवाय तोंड उघडणार नाही, अशी आग्रही भूमिका घेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आंदोलन तापवत नेले आणि शेतकऱ्याच्या पदरात चार पैसे पाडून घेतले. साखर कारखानदार आणि त्यांच्या नेत्यांनी घेतलेल्या सकारात्मक भूमिकेचीही नोंद घेतली पाहिजे. जास्त म्हणजे तुटेपर्यंत न ताणवता उभयपक्षी मान्य मार्ग काढण्यात या भूमिकेमुळे यश आले. अर्थात, साखर कारखानदारांना साखरेच्या बाजारपेठेशी मेळ घालावा लागणार आहे. साखरेच्या दरावर केवळ ग्राहकाचे नव्हे, तर आंतरराष्ट्रीज बाजारपेठेचेही नियंत्रण असल्याने ही कसरत मोठी असेल. आंदोलन वेळेवर संपवल्याने शेतकऱ्यासह सर्वच घटकांकडून समाधान व्यक्त झाले. यानिमित्ताने या हंगामात बाजारपेठेत उत्साह राहील. शेतकऱ्याचा पैसा खेळेल आणि कृषी अर्थकारणाचा पाया भक्कम राहील. मोठ्या संघर्षानंतर शेतकऱ्याच्या पदरी हे यश मिळाले आहे.

भारतीय जनता पक्षाला अजूनही संधी आहे

भारतात हिंदूंची लोकसंख्या इतर धर्मियांपेक्षा नेहमी जास्त राहावी, अशी बहुसंख्य हिंदूंची सुप्त भावना पूर्वीपासून राहिली आहे. त्या भावनेला साद देऊनच रा.स्व. संघ, जनसंघ व भाजप कार्यरत होते. शिवाय १९६२ च्या युद्धात आपली संरक्षण क्षमता कमी पडत असल्याचाही प्रत्यय जनतेला आला. त्यामुळे हिंदूहित व राष्ट्र संरक्षण हे दोन मुद्दे संघ भाजप साठी जमेचे राहिलेत. इस्लामी कट्टरपंथी आतंकवाद्यांच्या कारवाया मुळे हळू हळू जनमताचा कल भाजपकडे वाढत गेला (१९८४ चा अपवाद वगळता). २००१ साली झालेल्या गुजरातच्या भीषण नरसंहाराकडे सर्वसामान्य हिंदूंनी दुर्लक्ष केले. ब्रँड मोदी घडविण्यात आला. २०१४ साली भाजपला प्रथमच पूर्ण सत्ता मिळाली.

माझ्या लहानपणापासून मी कधीही देशाच्या अर्थव्यवस्थेविषयी संघ, जनसंघाच्या नेत्यांना अथवा कार्यकर्त्यांना बोलताना, लिहिताना पाहिले नाही. पण साधारणतः लायसन्स परमीट राज नको आणि लघु, मध्यम उद्योग व व्यापारी यांचे भले व्हावे असे त्यांचे अर्थविषयक विचार असायचे. एकीकडे युरोप अमेरिकेच्या समृद्धीचे आकर्षण तर दुसरीकडे अतिप्राचीन भारतीय संस्कृतीचा अभिमान त्यांना असायचा. त्यामुळे कदाचित आत्ता इथे अर्थ-राज्य व्यवस्था कशी असावी, यावर ते फारसे मतप्रदर्शन करत नसत.

आपल्याच देशात अल्पसंख्य ठरण्याची भीती हिंदूंच्या मनात निर्माण करून केवळ तेवढ्याच कारणाने निवडणुका जिंकता येत नाहीत, हे भाजपला २०१४ पूर्वी लक्षात आले. त्यामुळे त्यावर्षीच्या निवडणूक प्रचारात मोदींनी हिंदुत्वापेक्षा विकासाच्या मुद्द्यावर फार जास्त भर दिला. प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख जमा करण्याचे आश्वासन दिले. नंतर झालेल्या निवडणुकांमध्ये मात्र पुन्हा मुस्लिमांचे भय हिंदूंना दाखवणे, रेवड्यांचे वाटप करणे, इ.डी. चे भय अथवा सत्तेचे आमिष दाखवून विरोधी पक्षांमध्ये फुट पाडणे, आपल्या मर्जीतील मुख्य निवडणूक आयुक्त नेमता यावा म्हणून कायदा बदलणे इत्यादी 'चाणक्य नीती' चा वापर करून त्यांनी आतापर्यंत सत्ता टिकवली आहे.

परंतु 'Minimum Governnment and Maximum Governance' अशी आरोळी ठोकून २०१४ साली



सत्तेत आल्यानंतर मात्र 'Maximum Government and Minimum Governance' लोकांच्या प्रत्ययास येत आहे.

हिंदूंच्या कौटुंबिक सामाजिक रचनेत शतकानुशतके जे दोष राहिले आहेत (ज्यामुळे डॉ. आंबेडकरांना हजारो अनुयायांसह धर्मांतर करणे भाग पडले), त्या दोषांची प्रकट कबुली संघ परिवाराने दिलेली नाही. स्वतःच्या दोषांची, चुकांची, उणिवांची प्रांजळ कबुली न देणे हा जणू त्यांचा स्वभावच बनलेला आहे. त्यामुळे विरोधकांनी अथवा माध्यमांनी दोष लक्षात आणून दिले तर एकदम नेहरू किंवा काँग्रेसवर घसरणे, विरोधकांना दिमागी नक्षल म्हणणे, जनतेला अराजकाचे भय दाखवणे आणि राहुल गांधींना विशेषतः टार्गेट करून हिणवणे, हेच भाजपाचे धोरण बहुदा त्यांच्या अंगलट येऊ शकते.

१९८४ च्या शीख नरसंहाराबाबत डॉ. मनमोहन सिंग यांनी पंतप्रधानपदी असताना शीख समाजाची माफी मागितली. तशी माफी भागलपूर, मुजफ्फर नगर अथवा गुजरातमध्ये झालेल्या मुस्लिमांच्या नरसंहाराबाबत मोदी मागण्याची शक्यता नाहीच. प्रवीण तोगडिया यांचा एक व्हिडीओ मी ऐकला होता. त्यात त्यांनी 'गंगेत आणि साबरमती नदीत शेकडो प्रेत वाहून गेले, पण त्यातले एकही हिंदूचे नव्हते', अशी दर्पोक्ती केली होती आणि उपस्थित कार्यकर्त्यांनी त्यावर टाळ्यांचा कडकडाट केला होता.

राजीव गांधी यांनी पंजाबमध्ये फोफावत असलेला खलिस्तानी आतंकवाद आटोक्यात आणण्यासाठी शीख समुदायाशी वाटाघाटी, चर्चा करून शांतता प्रस्थापित केली. सोनिया गांधींनी त्यांच्या आत्मवृत्तात १९७५ च्या आणीबाणी विषयी खेद प्रगट केला आहे.

सत्तेच्या संकुचित राजकारणात अडकून पडल्याने अनेक प्रकारच्या अनैतिक तडजोडी तर कराव्या लागतातच, परंतु व्यापक देशहिताकडे दुर्लक्षही होत राहते. येणारा काळ हा अधिक प्रांजळ आणि पारदर्शक राजकारणाचा असू शकेल. कारण सत्य उघडकीस आणणारी शेकडो माध्यमे उपलब्ध राहतील. म्हणून भाजपने आतातरी स्वतःचे दोष अथवा उणीवा जाहीरपणे स्वीकारून पुढील वाटचाल मानवतेच्या, भारतीय जनतेच्या (ज्यात मुस्लीम आणि इतर धर्मियांचाही समावेश होतो, कारण कितीही प्रयत्न केले तरी त्यांना देशाबाहेर काढणे कोणालाही शक्य नाही) व्यापक हिताच्या दिशेने केली तरच भाजपला भविष्य आहे. नाही तरी कबूल न करता अनेक उणीवा अथवा चूका दुरुस्त करणे चालूच आहे. पण बाहेरून दबाव वाढल्यावर नाईलाजाने अशा दुरुस्त्या कराव्या लागणे हे चांगल्या शासनाचे लक्षण नाही.

नोटबंदीच्या निर्णयावर टीका झाली तेव्हा मोदी जाहीरपणे असे बोलले की या निर्णयाचे फायदे पन्नास दिवसात दिसले नाहीत तर मी कोणत्याही चौकात उभा राहून जनता देईल ती शिक्षा भोगायला तयार आहे. प्रत्यक्षात नोटबंदीने छोट्या व्यापाऱ्यांची व लघु, मध्यम उद्योगांची प्रचंड हानी केली. करोडो लोकांना रांगेत उभे राहून नोटा बदलून घ्याव्या लागल्या. काळा पैसा संपला नाही. पुलवामा आणि पहलगाम सारखे आतंकवादी हल्ले झालेत. राहुल गांधींनी त्याच वेळी या नोटबंदीच्या निर्णयावर कठोर टीका केली होती. मोदी चौकात यायला विसरले आणि भाजपची मंडळी नोटबंदीचा हा निर्णयच विसरण्याचा प्रयत्न करू लागली. जीएसटी चुकीच्या पद्धतीने राबविली जात असल्याची टीका राहुल गांधींनी केली. त्यांनतर हळू हळू जीएसटी मध्ये सुधारणा होत गेली. मात्र राहुल बालिश आहे, ही टीका भाजप करतच राहिला. नीट परीक्षांचे घोटाळे राहुल गांधींनी उघड केले. नंतर सीजेपी अवतरली. चुका मान्य न करता परीक्षा पद्धतीत दुरुस्त्या होत गेल्या. तीच कथा निवडणूक आयोगाची. राहुल गांधींनी सर्वप्रथम या आयोगाच्या कार्यप्रणालीवर संशय उपस्थित केला. इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तांमुळे त्यांच्या आरोपांना पुष्टी मिळाली. नंतर हळूहळू निवडणूक आयोगाने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपल्या चुका आणि घोटाळे दुरुस्त करणे सुरु केले. वास्तविक या घोटाळ्यांची सुरुवात २०२३ मध्ये कायद्याच्या तरतुदी बदलून झाली होती. जनतेला असे दिसत आहे की राहुल गांधींनी आवाज उठवला नसता आणि मोठी जनशक्ती संघटीत केली नसती तर सरकार आणि निवडणूक आयोग आपली मनमानी करतच राहिले असते.

'न खाऊंगा, ना खाने दुंगा' अशी राणा भीमदेवी गर्जना मोदींनी केली. पण भ्रष्टाचार सर्वत्र तसाच आहे. लोकांना हे जाणवते.

म्हणून वरील सर्व विषयांमध्ये आपल्या निर्णयात, धोरणात, घोषणांच्या अंमलबजावणीत चुका झाल्या, उणीवा राहिल्या हे भारतीय जनता पक्षाने सर्वप्रथम जाहीररित्या कबुल करावे आणि दिल्लीपासून गल्ली पर्यंत प्रत्येक निवडणुकीत साम दाम दंड भेद वापरून आपणच निवडून आलो पाहिजे, हा अट्टाहास सोडावा.

किशोर देशपांडे

राजकारणातील ध्रुवतारा-लालकृष्ण अडवाणी

लहानपणी एक कोडं नेहमी घालायचो, 'लाल आहे पण रंग नाही, कृष्ण आहे पण देव नाही, आड आहे पण पाणी नाही, वाणी आहे पण कीटक नाही, सांगा कोण?' पहिल्या प्रयत्नात कोणालाच सुचायचे नाही; पडद्यामागे राहून सर्वात महत्त्वाचे काम करणाऱ्या माणसाची खरी ओळख वेगळीच होती.

फाळणीच्या घावांचे ओझे उरी बाळगत बाळगत भारतात आलेला एक तरुण. गाठीशी काहीच नाही, हिंदी नीट जमत नाही, पण समाजासाठी काम करण्याची आवड, निष्ठा, प्रामाणिकपणा यांच्या जोरावर अनंत अडचणींवर मात करत, जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीत एक विरोधी पक्ष घडवून ध्रुव बनलेल्या पक्षाच्या पितृस्थानी जातो. पक्षाचं Content ज्याला म्हणतात ते देण्यासाठी अहर्निश झटतो, Narrative सेट करण्यात मोलाची भूमिका पार पाडतो. फक्त शून्यातून विश्व निर्माण करत नाही, तर शून्यातून विश्व निर्माण करतील असे कार्यकर्ते घडवतो.

भारतीय राजकारणामध्ये जात, धर्म, भाषा अशा विविधतांचा वापर आपापल्या फायद्यांसाठी अनेक जण करून घेतात. गावागावामध्ये फाळणीनंतर आपले सर्वस्व सोडून आलेली एक कम्युनिटी आहे, सिंधी जमात. किती लोकसंख्या आहे या सिंधी जमातीची, आणि त्या लोकसंख्येच्या बळावर करता येणारे राजकारण किती महत्त्वाचे असते? अशा परिस्थितीतही अडवाणीजी पुढे आले.

भाजप आणि संघ यांतील कार्यकर्त्यांबद्दल इतरच माणसं, म्हणजे कसे असतील संबंध, वगैरे वगैरे बोलतात. त्यांना ते कळणे अवघड जाते, बऱ्याचदा अशक्य होऊन बसते.

स्व. प्रा. राम शेवाळकर एका ठिकाणी व्याख्यानास गेले होते. 'रामायण' विषय होता. आधीच्या वक्त्यांनी रामाबद्दल काहीतरी बिखारी भाषा वापरून या रामचरित्राचा अभ्यास करणे कसे वायफळ आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. शेवाळकर बोलण्यास उभे राहिले, वातावरण तंग होतं आणि ते म्हणाले, 'रामास मानणाऱ्यांपेक्षा न मानणाऱ्यांनीच त्याचा सखोल अभ्यास केला, ही रामचरित्राची ताकद आहे.' टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला आणि पुढे आपल्या तर्कांनी शेवाळकरांनी ती सभा जिंकली. बऱ्याचदा अडवाणी यांना खुजे दाखवण्याचा प्रयत्न काही लोक करतात. आयुष्याचा सर्वाधिक काळ सत्तेविना घालवून इतका मोठा पक्ष उभा करणाऱ्या व्यक्तीवरचा तो अन्याय असतो, मजेशीर आहे हे.

अहो, निवडणूक जिंकणे सोडा, साधी नोकरी लागते वा १ प्लॅट, २ प्लॅट घरे बनतात, चार चाकी दारी येते, तर लोक अभिमानाने वागायला लागतात. अशा प्रसंगातही श्री. लालकृष्ण अडवाणी या दीपस्तंभाचे महत्त्व अजून ठसठशीत होते, वंदनीय ठरते.

२००४ मध्ये पक्ष हरल्यानंतरच्या त्यांच्या अध्यक्षीय भाषणात लालकृष्ण अडवाणी म्हणाले होते, 'We have no fear of the future because we have nurtured the future from the ranks. This is what distinguishes us.' हे सदासर्वदा लक्षात ठेवण्यासारखे वाक्य आहे.

अडवाणींच्या भाषणातही तत्कालीन अनेक संदर्भ असायचे. थॉमस फ्रीडमन लिखित द वर्ल्ड इज फ्लॅट या पुस्तकातील जागतिकीकरणाच्या बदलत्या संदर्भाबद्दल मी पहिल्यांदा ऐकले, ते त्यांच्या तोंडूनच. भारतीय लोकशाहीच्या सद्गुणांबद्दल बोलताना ते महर्षी चार्वाकांचेही उदाहरण द्यायचे: 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत', म्हणजे 'कर्ज लो, घी पियो'. आज अनेक आठवणी डोळ्यांसमोर उभ्या राहतात.

२००४ ते २००६ या काळात मी प्रत्यक्षपणे अडवाणीजींची काही भाषणे ऐकली. एकदा त्यांचा आशीर्वाद घेण्याचाही संबंध आला. त्यांना शेवटचे पाहिले, त्यालाही आज २० वर्षे होऊन गेली. दोन वर्षांपूर्वी त्यांना भारताचा सर्वश्रेष्ठ नागरिक पुरस्कार, भारतरत्न, मिळाला.

मा. लालकृष्ण अडवाणींचे डोळे चटकन पाणावतात. रामरथाचे सारथ्य केलेल्या लालजींनी अयोध्या जन्मभूमीचा प्रश्न मार्गी लागलेला पाहिले तेथे भव्य दिव्य राममंदिर उभे राहिले, त्यांनी ३७० कलम हलवण्याचा निर्णय ऐकला आहे. आजही जुने जाणते भेटल्यावर त्यांचे डोळे चटकन पाणावतीलच. पण चटकन पाणावणाऱ्या लालजींच्या डोळ्यांतील अश्रूंना आणि या आयुष्याला विधात्याने कृतकृत्यतेची किनार दिली आहे, हे कोण नाकारेल?

आज लालजींचा ९९ वा वाढदिवस. असे भारतरत्न लालकृष्ण अडवाणी आज वयाची ९९ वर्षं पूर्ण करून १००व्या वर्षात पदार्पण करत आहे. त्यांना उत्तम, निकोप, निरामय आयुष्य लाभावे, हीच प्रार्थना आहे.

हे राम रथ के सारथी,
हे सदी के सर्वोत्कृष्ट संघटक,
हे जन्मभूमि से दूर होकर भी राष्ट्र को समर्पित प्रचारक,
आपका हार्दिक अभीष्टचिंतन और शत शत प्रणाम...


शंतनु शरद पांढरकर
आदर्श प्रचारक स्वयंसेवक

मुत्सद्दी राजकारणी

मुत्सद्दी या शब्दाला इंग्लिश पर्याय 'स्टेट्समन' हा आहे.. हाच शब्द मला श्री लालकृष्ण अडवाणी यांना सटीक बसतो असे नेहमी वाटत आले.

जागतिक राजकारणात दूरगामी परिणाम तसेंच आपल्या व्यक्तिमत्वाची अमिट छाप सोडणारे लोकं स्टेट्समन म्हटल्या गेलेत, आडवानी त्याच श्रेणीतील राजकारणी आहेत.

भारतातील गेल्या ७० वर्षात सवंग लोकप्रियतेला वाहिलेल्या डाव्या पत्रिकारितेच्या प्रभावात



लालकृष्ण अडवाणींना कधीच योग्य न्याय मिळाला नाही. या माणसाने फाळणीच्या व्यथा झेलल्या, देशोधडीला लागलेला परिवार पुन्हा उभा झाला. हा माणूस उत्तम वाचक, लेखक, पत्रकार, संपादक राहिला. अनेकोत्तम ग्रंथाचे व्यासंग या माणसाने आयुष्यात जोपासले. राजकारण म्हणाल तर आज देशात जातपात विसरून जो हिंदू समाज एकत्र येतांना दिसतो त्याची राजकीय मोट बांधण्याचे श्रेय संपूर्णतः लालकृष्ण अडवाणी यांनाच द्यावे लागेल.

रा. स्व. संघाने दोन-दोन पिढ्या या समाजाला बांधण्यात खर्च केल्यात पण राजकीय परिणाम येत नव्हता, ज्या वेळेस सारा हिंदू समाज मंडलच्या आगीत भस्मसात होतों का असे वातावरण उभे झाले, अगदी त्याच काळात, श्रीराम रथयात्रा काढून संपूर्ण देशाला एका झेंड्याखाली आणून 'मंडल से कामंडल तक' चा सांस्कृतिक बदल देशात घडवून आणला त्या शक्तीला मत पेटीत आणून दाखवण्याची किमया या माणसाने केली.

हा पक्ष या देशात स्वबळावर सत्ता मिळवू शकतो आणि सरकार चालवू शकतो हा आत्मविश्वास प्रत्येक नागरिक आणि कार्यकर्त्याला आवश्यक असतो तो या माणसाने मिळवून दिला. स्वतः पक्ष अध्यक्ष असून प्रधानमंत्री पदासाठी वाजपेयी यांचे नाव स्वतः घोषित करणारा हा व्यक्ती खरा मुत्सद्दी राजकारणी होता.

९०-२००० च्या दशकातील अस्वस्थ राजकीय परिस्थितीत युतीच्या राजकारणाची आवश्यकता अधोरेखित करून एक आदर्श राजकीय परंपरा उभी करत देशात दोन वेळा स्थिर सरकार देण्याचे श्रेय निसंशय आडवानी यांनाच द्यावे लागेल. बहुपक्षीय आणि भिन्न विचाराच्या पक्षांना सोबत आणून सुद्धा अनेक जनकल्याणकारी, देशहिताचे निर्णय होऊ शकतात ही किमया करणारे अडवाणीच होते. भिन्न पक्षांसोबत असतांनाही आपली मुळ विचारपारंपरा, तत्व यांचेशी जराही फारकत होऊ न देण्याचे अजब कौशल्य या माणसात होते. त्यांची त्या त्या प्रसंगात संसदेत आणि इतरत्र झालेली भाषणे, लेख याचे प्रतीक आहेत.

त्यामुळेच तर हार्ड लाईनर म्हणून ते सदैव टार्गेट असायचे. हवाला डायरीमध्ये नुसता LK असा उल्लेख असल्यावरून त्यांच्यावर आरोप झाला, तर सरळ आपल्या खासदारकी चा राजीनामा दिला आणि सार्वजनिक रित्या घोषित केले की निर्दोष सिद्ध केल्याशिवाय सर्वजनिक जीवनात परत येणार नाही.

निर्दोष असल्याचा आत्मविश्वास असल्या खेरीज राजकारणात असली जोखीम कोणी घेतच नाही, हा वेगळेपणा आडवानींचे मोठेपण सिद्ध करायला पुरेसा आहे.

त्या पेटलेल्या काळात सरदार खुशवंत सिंग सारख्या प्रखर विरोधी पत्रकाराला सुद्धा हा अन्याय आणि व्यक्तिगत विरोध पाहुन लिहावे लागले की, 'लालकृष्ण अडवाणी कसे ही असतील पण ते व्याभिचारी आणि भ्रष्टाचारी असूच शकत नाही', आपल्या विरोधकालाही आपल्या बाजूने बोलायला भाग पाडेल असे स्वच्छ चारित्र्य आणि चरित्र या माणसाने जगले आहे. आज अपवाद वागळता असे चारित्र्य आणि चरित्र राजकारणात दुरापास्त होत आहे आणि अशी पत्रकारिता आणि पत्रकार सुद्धा नाहित.

आज देशाच्या राजकारणात आपले कौशल्य ज्यांना दाखवण्याची संधी मिळाली ती या व्यक्तीने जे हिंदुत्वाचे राजकारण देशात का आवश्यक आहे हे ठणकावून सांगितले. म्हणून तो राजमार्ग खुला करून देणारे, आणि देशाच्या राजकारणाची दशा आणि दिशा बदलवून टाकणारे अडवाणी म्हणून स्टेट्समन ठरतात.

त्यांच्या ऐन उमेदीत तर नुसता संघर्षच वाटेला आला, तरी हा माणूस पाय रोवून उभा राहिला म्हणून आज हे दिवस आलेत. आज शताब्दी निमित्त त्यांच्या उत्तुंग कर्तृत्वाची मनापासून जाणीव झाली.

आ. लालजींना विनम्र अभिवादन!

आनंद गणोरकर

मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

पंकजच्या मृत्यूने अंबा नगरीत काळी दिवाळी

एपीजे अब्दुल कलाम अभ्यासिकेसमोर नागरिकांचा निषेध..! प्रशासना विरोधात संताप,दोषींवर कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ विवेक वानखडे

यवतमाळ, दि. ९ : दिवाळी म्हणजे आनंदाचा, प्रकाशाचा आणि उत्साहाचा सण! मात्र यंदा अंबानगरीतील एका कुटुंबासाठी दिवाळीचा प्रकाशच हरपला. यवतमाळ येथील डॉ. एपीजे अब्दुल कलाम अभ्यासिकेवरून खाली पडून पंकज तुपसोंडरे या युवकाचा २ नोव्हेंबर रोजी मृत्यू झाला. दिवाळीच्या काही दिवसांपूर्वी घडलेल्या या दुर्दैवी घटनेने संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.



या आघातातून सावरता न आल्याने अंबानगरीत दिवाळीचा उत्साहही मावळला. कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांनी दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेत प्रशासनाच्या निष्काळजीपणाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. दिवाळीच्या दिवशीच नागरिकांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम अभ्यासिकेजवळ एकत्र येत मेणबत्त्या पेटवून जाहीर निषेध नोंदविला. मोठ्या संख्येने नागरिकांनी या निषेधात सहभाग घेत पंकजला न्याय मिळावा, मृत्यूच्या घटनेची सखोल चौकशी व्हावी आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली. दिव्यांच्या सणात मेणबत्त्यांच्या प्रकाशातून व्यक्त झालेला हा संताप प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरला. या घटनेने अभ्यासिकेतील व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विद्यार्थ्यांसाठी उभारलेल्या या वास्तूमध्ये ग्रंथपाल, चौकीदार आणि सुरक्षारक्षक नियमित उपस्थित असतात का? विद्यार्थ्यांनीच सकाळी अभ्यासिकेचे दार उघडणे आणि सायंकाळी बंद करणे, अशी परिस्थिती असल्याची चर्चा आहे. मग अभ्यासिकेची सुरक्षा आणि व्यवस्थापन नेमके कोणाच्या जबाबदारीत आहे, हा प्रश्न अनुत्तरित आहे. यापूर्वीही 'जनमाध्यम'ने अभ्यासिकेतील अस्वच्छता, दुकरांचा मुक्त संचार, वायफायचा अभाव आणि ग्रंथपालांच्या अनुपस्थितीबाबत वृत्त प्रसिद्ध केले होते. त्यानंतर स्वच्छता करण्यात आली मात्र नव्याने अमरावती येथील लक्ष अकॅडमीकडे व्यवस्थापनाची जबाबदारी दिल्यानंतरही सुविधांबाबत समाधानकारक सुधारणा झाल्याची खात्री होत नाही. दोन ग्रंथपालांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात किती कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांच्या उपस्थितीची तपासणी कोण करते आणि शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीचा विनियोग कसा होतो, याची चौकशी होणे गरजेचे आहे. या अभ्यासिकेचे अध्यक्ष जिल्हाधिकारी विकास मीना आहेत. त्यामुळे त्यांनी केवळ अहवाल मागविण्यापेक्षा प्रत्यक्ष आकस्मिक भेट देऊन सुरक्षा व्यवस्था, कर्मचारी उपस्थिती, सीसीटीव्ही, प्रवेश-निर्गमन नोंदी आणि संपूर्ण व्यवस्थापनाची तपासणी करावी. जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्यांनीही नियमित देखरेख करावी. पंकजच्या मृत्यूची दुर्घटना नेमकी कशी घडली, त्यावेळी सुरक्षेची काय व्यवस्था होती आणि संभाव्य निष्काळजीपणाला कोण जबाबदार आहे, याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. एसडीपीओ कोळी यांच्या आश्वासनानंतर आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले आहे. मात्र ही माघार नसून प्रशासनाला दिलेली संधी असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. न्याय मिळेपर्यंत आणि दोषींवर कायदेशीर कारवाई होईपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असा इशाराही देण्यात आला.

मतदारसंघाच्या सीमा मोठ्या की माणुसकी?

पंकज तुपसोंदरे यांच्या मृत्यूनंतर कुटुंबीयांची विचारपूस करण्यासाठी संपर्क साधला असता, भाजपचे नगरसेवक तथा गटनेते नितीन गिरी यांनी 'हे प्रकरण माझ्या मतदारसंघात येत नाही, ते दुसऱ्या नगरसेवकाच्या हद्दीत येते,अशी भूमिका घेतल्याचा आरोप चंदन हातागळे यांनी केला. या कथित वक्तव्याचा त्यांनी तीव्र निषेध नोंदविला. एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असताना लोकप्रतिनिधींनी मतदारसंघाच्या सीमा पुढे करून जबाबदारी झटकावी का? माणुसकीला प्रभागाच्या सीमा असतात का? असा सवाल हातागळे यांनी उपस्थित केला. लोकप्रतिनिधींची जबाबदारी केवळ निवडणुकी पुरती आणि प्रभाग पुरती मर्यादित नसते, असे सांगत त्यांनी लोकप्रतिनिधींनी संवेदनशीलता जपण्याचे आवाहन केले.

थोडक्यात

वेणी धरणातील शेतकऱ्यांच्या मोटरपंप केबल चोरीचा पर्दाफाश

महागाव : वेणी धरण परिसरातील शेतकऱ्यांच्या मोटरपंपाला



जोडलेल्या केबल चोरी करून दुचाकीवरून घेऊन जाणाऱ्या तीन तरुणांना ग्रामस्थांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. या घटनेत सुमारे २४ हजार रुपये किमतीच्या ४८० फूट केबलचा मुद्देमाल मिळून आला आहे. याप्रकरणी पोफाळी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस तक्रारीनुसार, डोंगरगाव येथील शेतकरी श्रीनिवास बाबाराव देशमुख यांच्या शेतासह परिसरातील इतर शेतकऱ्यांनी वेणी धरणावरून पिकांना पाणी देण्यासाठी मोटरपंप बसविले आहेत. ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास काही इसम मोटरपंपाच्या केबल तोडून दुचाकीवरून घेऊन जात असल्याची माहिती ग्रामस्थांना मिळाली. यानंतर गावातील नागरिकांनी डोंगरगाव बसनिवाऱ्याजवळ दुचाकीसह तीन तरुणांना पकडले. त्यांच्या ताब्यातील नायलॉनच्या पोत्याची तपासणी केली असता त्यामध्ये तोडलेल्या मोटरपंपाच्या केबल आढळल्या. पोलिसांना माहिती देऊन तिन्ही संशयितांसह मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. या प्रकरणात दुर्गेश राम भंडारी (वय २१), पवन रमेश वाठोरे (वय १८) आणि तन्मय मांगीलाल जाधव (वय १८), तिघेही रा. तुकाराम बापू वॉर्ड, पुसद यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, शेतकऱ्यांच्या मोटरपंपाला जोडलेल्या विविध लांबीच्या केबल चोरीस गेल्याचे समोर आले असून, त्यामध्ये श्रीनिवास देशमुख यांची ६५ फूट तसेच अन्य सात शेतकऱ्यांची केबल मिळून एकूण ४८० फूट, अंदाजे २४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल असल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोफाळी पोलिस ठाण्याचे ठाणेदार निलेश शेंबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोफाळी पोलीस करत आहे



प्रसिद्धीसाठी पत्रकार हवे,जाहिरातीच्या वेळी मात्र फोनही नको..!

वर्षभर बातम्यांसाठी पुढे-पुढे करणाऱ्यांची दिवाळी जाहिरातीच्या वेळी पाठ पुसद : वर्षभर स्वतःच्या कामाची प्रसिद्धी व्हावी, कार्यक्रमांना बातम्यांमध्ये स्थान मिळावे, वाढदिवस, सत्कार, आंदोलन आणि सामाजिक उपक्रमांची दखल घेतली जावी, यासाठी पत्रकारांच्या मागे-पुढे करणारे राजकीय नेते, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्ते दिवाळीच्या जाहिरातींची वेळ आली की मात्र अचानक गायब होत असल्याचे चित्र पुसद परिसरात दिसून येत आहे. प्रसिद्धी हवी, पण त्यासाठी काम करणाऱ्या स्थानिक वृत्तपत्रांना आर्थिक सहकार्य नको, ही मानसिकता स्थानिक पत्रकारितेसाठी चिंतेची बाब ठरत आहे. 'आमची बातमी लावा', 'कार्यक्रमाला आवर्जून या', 'पत्रकार परिषदेला उपस्थित राहा', अशा विनंत्या वर्षभर केल्या जातात. पत्रकारही लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून कोणताही भेदभाव न करता बातम्यांना प्रसिद्धी देतात. मात्र दिवाळीच्या शुभेच्छा जाहिरातीसाठी संपर्क साधताच 'वाढदिवसाला देऊ', 'नवीन वर्षात नक्की', 'पुढच्या वेळी पाहू' अशा आश्वासनांची सरबत्ती सुरू होते. काहींकडून फोन उचलणेही टाळले जाते. मग वर्षभर पत्रकारांची आठवण ठेवणाऱ्यांना दिवाळीत त्याच पत्रकारांची गरज का भासत नाही? मोठ्या माध्यम समूहांकडे जाहिरातींचा ओघ असताना तालुका आणि ग्रामीण भागातील छोट्या वृत्तपत्रांना मात्र दुय्यम वागणूक मिळत असल्याची खंत स्थानिक पत्रकार व्यक्त करीत आहेत. प्रत्यक्षात ही वृत्तपत्रे मर्यादित साधनसामग्रीतून स्थानिक प्रश्न, शेतकऱ्यांच्या व्यथा, पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि भ्रष्टाचाराचे मुद्दे सातत्याने मांडत असतात. अर्थात, जाहिरात देणे हा प्रत्येकाचा स्वेच्छेचा निर्णय आहे. मात्र प्रसिद्धीची अपेक्षा ठेवताना माध्यमांच्या आर्थिक अडचणींकडेही संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. जाहिरात म्हणजे उपकार नव्हे; स्थानिक माध्यमांच्या अस्तित्वाला मिळणारे पाठबळ आहे.
प्रश्न एवढाच आहे, प्रसिद्धीच्या वेळी पत्रकार आपले आणि सहकार्याच्या वेळी परके का? आश्वासनांनी वृत्तपत्रे चालत नाहीत. पत्रकारांची लेखणी हवी असेल, तर स्थानिक पत्रकारितेच्या अस्तित्वाचीही जाणीव ठेवावी लागेल. कारण पत्रकारिता टिकली तरच लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक सक्षम राहील.

नेर मध्ये गांजाची खुलेआम विक्री, एलसीबीची धडक कारवाई!

मुस्लिम कब्रस्तान परिसरातून १४६ ग्रॅम गांजा जप्त, ७,३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

नेर, दि. ९ : यवतमाळ जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या अवैध विक्रीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, नेर शहरातील मुस्लिम कब्रस्तान परिसरात गांजाची विक्री होत असल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली. या कारवाईत १४६ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून, शेख जफर शेख जब्बार (वय ३६, रा. चमन नगर, नेर) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

दिनांक ७ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय बातमीदाराकडून नेर ते दारव्हा मार्गावरील मुस्लिम कब्रस्तानाजवळ गांजाची अवैध विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली. या माहितीची वरिष्ठ अधिकाऱ्यांना कल्पना देऊन पोलिसांनी पंच, राजपत्रित अधिकारी आणि फोटोग्राफर यांच्या उपस्थितीत नियमानुसार



कारवाई केली. संशयिताची झडती घेतली असता हिरव्या रंगाची पाने, बिया व फुले असलेला गांजासदृश पदार्थ आढळून आला. पॅकिंगसह १६२ ग्रॅम वजन असलेल्या या पदार्थातून १४६ ग्रॅम निव्वळ गांजा मिळाला. त्याची अंदाजे किंमत ७ हजार ३०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी आरोपीविरुद्ध नेर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायदा १९८५ च्या कलम ८(क), २०(ब)(ii)(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास नेर पोलीस करीत आहेत.

अंमली पदार्थांचा विळखा रोखणार कोण?

नेरमध्ये गांजाची विक्री होत असल्याची माहिती समोर आल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली असली, तरी जिल्ह्यात अंमली पदार्थांची अवैध विक्री रोखण्यासाठी सातत्याने देखरेख आणि पुरवठ्याच्या मूळ सोतापर्यंत तपास पोहोचणे आवश्यक आहे. केवळ विक्रेत्यांवरील कारवाईपुरते प्रयत्न मर्यादित न राहता या अवैध व्यवसायाच्या संपूर्ण साखळीचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

पुसदला मृद व जलसंधारणाचे स्वतंत्र कार्यालय होणार; इंद्रनील नाईकांचा पाठपुरावा.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. ९ : पुसद तालुक्यातील मृद व जलसंधारणाच्या कामांना अधिक गती मिळावी, यासाठी स्वतंत्र उपविभागीय कार्यालय सुरू करण्याच्या मागणीला अखेर यश आले आहे. मृद व जलसंधारण विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पुसद येथे मृद व जलसंधारण विभागाचे नवीन उपविभागीय कार्यालय सुरू करण्यास महायुती सरकारने मंजुरी दिली आहे. याबाबतचा शासन आदेश ५ नोव्हेंबर २०२६ रोजी निर्गमित करण्यात आला.

पुसद तालुक्यात मृद व जलसंधारणाशी संबंधित विविध कामांचे वाढते प्रमाण लक्षात घेता स्वतंत्र कार्यालयाची आवश्यकता होती. या निर्णयामुळे जलसंधारण, मृदसंवर्धन, सिंचन तसेच शेतीशी



संबंधित विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी स्थानिक पातळीवर अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. सध्या तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर या कार्यालयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जलसाठ्यांचे संवर्धन, पाण्याचे नियोजन आणि मृदसंवर्धनाच्या कामांना स्थानिक स्तरावर गती मिळण्यास मदत होणार असून, शेतकरी व नागरिकांची प्रशासकीय कामांसाठी होणारी धावपळही कमी होणार आहे. पुसद तालुक्याच्या दीर्घकालीन जलसुरक्षेच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय मानला जात असून, स्वतंत्र कार्यालयामुळे मृद व जलसंधारणाच्या कामांना अधिक बळ मिळून दुष्काळावर मात करण्याच्या प्रयत्नांना गती मिळेल, अशी अपेक्षा शेतकरी व नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

उमेद अभियानाच्या माध्यमातून शेतकरी महिलांची दिवाळी झाली गोड!

पूर्णामाई महिला शेतकरी उत्पादक कंपनी कडून कमी दरात धान्य व वस्तूंचे वितरण

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी जामणी, दि. ९ : दिवाळीचा सण प्रत्येकाच्या आयुष्यात आनंद, उत्साह आणि समृद्धी घेऊन येतो. याच सणाचे औचित्य साधत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत एकात्मिक शेती प्रभाग विकास प्रकल्पाच्या (IFC) माध्यमातून पूर्णामाई महिला शेतकरी उत्पादक कंपनी, झरी जामणी यांच्या वतीने शेतकरी महिलांसाठी स्तुत्य व समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत शेतकरी महिलांना बाजारभावापेक्षा कमी दरात जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये १०० पेक्षा अधिक तेलाचे कॅन, ९० पेक्षा अधिक तांदळाचे कट्टे तसेच २० क्विंटलपेक्षा अधिक साखरेचे वितरण करण्यात आले. सणासुदीच्या काळात



परवडणाऱ्या दरात आवश्यक वस्तू उपलब्ध झाल्याने महिला शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. या उपक्रमाबद्दल महिलांनी समाधान व्यक्त करत कंपनीच्या पुढाकाराचे कौतुक केले. या प्रसंगी तालुका अभियान व्यवस्थापक प्रदीप राठोड, पूर्णामाई महिला शेतकरी उत्पादक कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) शुभम तुडमवार, कंपनीच्या संचालक मंडळातील (BOD) सर्व महिला संचालिका तसेच शेतकरी महिला उत्पादक समूहातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिला शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांना रास्त दरात जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देणे आणि महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून ग्रामीण भागात आर्थिक स्वावलंबनाला चालना देणे, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासोबतच त्यांच्या सणासुदीचा आनंद द्विगुणित करणारा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद ठरला आहे. महिला सक्षम तर कुटुंब समृद्ध! शेतकरी महिला स्वावलंबी तर ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम! उमेद अभियानाच्या मार्गदर्शनातून आणि पूर्णामाई महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या पुढाकारातून शेतकरी महिलांची यंदाची दिवाळी खऱ्या अर्थाने गोड झाली.

दुष्काळात शेतकऱ्यांना पाच हजारांची मदत, अधिकाऱ्यांसाठी मात्र लक्झरी वाहनांची खरेदी!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ९ : जिल्ह्यात दुष्काळाचे सावट दिवसेंदिवस गडद होत असताना शेतकऱ्यांची पिके करपली, हाती आलेले उत्पन्न कवडीमोल भावाने विकण्याची वेळ आली आणि शेतमालाला हमीभावही मिळत नसल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून पाच हजार रुपयांची अग्रिम मदत देऊन शेतकऱ्यांप्रती संवेदनशीलतेचा आव आणला जात असताना, दुसरीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी अत्याधुनिक सुविधांनी युक्त लक्झरी वाहनांची खरेदी होत असल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे प्रशासनाच्या प्राधान्यक्रमावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांमध्ये निधीअभावी विकासकामे रखडल्याची ओरड सुरू आहे.

डीपीटीसीचा निधी उपलब्ध होत नसल्याने अनेक प्रस्ताव आणि फाईली



कार्यालयातील रॅकमध्ये धूळ खात पडल्या आहेत. अनेक विकासकामे अपूर्ण असून, शंभर टक्के कामे करूनही ठेकेदारांची देयके प्रलंबित असल्याच्या तक्रारी आहेत. बिलांच्या भुगतानासाठी दहा टक्क्यांच्या सूत्राची चर्चा ठेकेदारांमध्ये सुरू आहे. मात्र, या आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर बांधकाम विभागाकडून अधिकाऱ्यांच्या सुविधांसाठी नवीन वाहनांना प्राधान्य दिले जात असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, यवतमाळ शहरासह ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य असून, वाहनधारकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. अपघातांचा धोका आणि नागरिकांचा त्रास कायम असताना रस्ते दुरुस्तीपेक्षा अधिकाऱ्यांच्या प्रवासासाठी लक्झरी वाहनांची व्यवस्था महत्त्वाची ठरत असल्याचे चित्र आहे. अधिकाऱ्यांचा प्रवास शॉकप्रूफ; जनतेचा प्रवास खड्ड्यांतूनच! हा विरोधाभास प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवणारा आहे. अधिकाऱ्यांसाठी नवीन वाहनांची खरेदी करण्यापूर्वी उपलब्ध शासकीय वाहनांचा वापर आणि त्यांची आवश्यकता तपासली का? वाहन खरेदीचा खर्च किती? रस्ते दुरुस्ती आणि खडलेल्या कामांसाठी निधी कधी उपलब्ध होणार? दुष्काळात शेतकऱ्यांच्या अडचणींपेक्षा अधिकाऱ्यांच्या सुविधांना प्राधान्य का? या प्रश्नांची उत्तरे सार्वजनिक बांधकाम विभागाने द्यावीत, अशी मागणी होत आहे.

गणेशवाडी येथे आदिवासी बांधव सोबत आदिवासी विकास मंत्र्यांची दिवाळी साजरी..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ९ : जिल्ह्यात दुष्काळाचे संकट गडद होत असताना कळंब तालुक्यातील गणेशवाडी येथील कोलाम पोडावर आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ. अशोक उईके यांनी आदिवासी बांधव सोबत दिवाळी साजरी केली. शनिवारी (दि. ७) झालेल्या या भेटीमुळे पोडावरील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, सणाच्या निमित्ताने झालेल्या या आपुलकीच्या भेटीतून आदिम कोलाम बांधवांच्या मूलभूत प्रश्नांच्या सोडवणुकीची अपेक्षाही व्यक्त होत आहे. दुष्काळामुळे ग्रामीण भागातील शेतकरी आणि शेतमजूर आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यातच दुर्गम भागातील



आदिम कोलाम समाजाच्या अडचणी अधिक गंभीर आहेत. अशा परिस्थितीत मंत्री उईके यांनी गणेशवाडीच्या कोलाम पोडाला भेट देत ग्रामस्थांशी संवाद साधला. त्यांच्या सुख-दुःखाची विचारपूस केली तसेच स्थानिक समस्या जाणून घेत त्या सोडविण्याचे आश्वासन दिले. राज्याच्या मंत्र्यांनी थेट आपल्या पोडावर येऊन दिवाळी साजरी केल्याने कोलाम बांधवांनी समाधान व्यक्त केले. यावेळी ग्रामस्थांनी पारंपरिक पद्धतीने पाहुणचार केला. सरपंच दिलीप मलांडे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ व आदिवासी बांधव उपस्थित होते. दरम्यान, केवळ सणासुदीच्या भेटी पुरते आदिवासी भागाचे प्रश्न मर्यादित न राहता पाणी, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि मूलभूत सुविधांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणे गरजेचे आहे. मंत्र्यांच्या या भेटीतून निर्माण झालेली आशा प्रत्यक्ष कृतीत उतरते का, याकडे आता कोलाम बांधवांचे लक्ष लागले आहे.


एकलासपूर परिसर भूकंपाच्या धक्क्याने हादरला!

कळंब तालुक्यात ३.० रिश्टर स्केल तीव्रतेची नोंद,सुदैवाने जीवित व वित्तहानी नाही.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ९ : यवतमाळ जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील मौजा एकलासपूर परिसरात ३.० रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. भूकंपाची तीव्रता तुलनेने कमी असली तरी या घटनेमुळे नागरिकांमध्ये संभाव्य धोक्याबाबत चिंता व्यक्त होत आहे. प्राप्त माहितीनुसार, एकलासपूर येथे भूकंपाची नोंद झाल्यानंतर जिल्हा प्रशासन आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने परिस्थितीवर लक्ष केंद्रित केले आहे.

संबंधित महसूल विभाग तसेच स्थानिक प्रशासनाकडून परिसरातील स्थितीची माहिती



घेण्यात आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, या भूकंपामुळे जिल्ह्यात कुठेही जीवित अथवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही. मात्र, भूकंपाची नोंद झाल्यानंतर संभाव्य धोक्याचा अंदाज घेणे आणि नागरिकांना वेळेवर माहिती देणे महत्त्वाचे ठरते. प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवण्याबरोबरच नागरिकांमध्ये घबराट पसरू नये, यासाठी अधिकृत माहिती देणे आवश्यक आहे. भूकंपाची तीव्रता कमी असली तरी अशा घटनांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. परिसरातील नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. सुदैवाने कोणतीही हानी झाली नसली तरी आपत्ती व्यवस्थापनाची सज्जता कायम ठेवणे गरजेचे आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त

संतोष आठरे अमरावतीचे नवे तहसीलदार

अमरावती- अमरावतीच्या तहसीलदारपदी संतोष राधाकिसन आठरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या महसूल विभागाने यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत. विजय लोखंडे यांच्या निलंबनामुळे रिक्त झालेल्या या जागी विभागीय आयुक्त कार्यालयातील सामान्य प्रशासन विभागात कार्यरत असलेले तहसीलदार संतोष आठरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.शासनाचे उपसचिव महेश वरूडकर यांच्या डिजिटल स्वाक्षरीने हा आदेश निर्गमित करण्यात आला आहे. त्यामुळे अमरावतीच्या तहसीलदारपदाची जबाबदारी आता संतोष आठरे यांच्याकडे येणार आहे.

आज गाडगेबाबा गोरक्षण स्थळी गाय गोंदन पूजा

दर्यापूर- गोसेवेच्या कार्यात सक्रिय असणाऱ्या दर्यापूर तालुक्यातील माहुली (धांडे) परिसरातील गाडगेबाबा गोरक्षण स्थळी आज



१० नोव्हेंबर रोजी दिपावली सणातील पारंपारिक गाय गोंदन पूजा संपन्न होणार आहे.संस्थेच्या विश्वस्त मंडळासह तालुक्यातील संस्थेशी जुळलेल्या मान्यवरांना तथा वर्षभर सेवा कार्याच्या पूर्ततेसाठी गोरक्षण संस्थेस जनावरांचा चारा व देणगी प्रदान करणाऱ्या सर्वांना या कार्यातील गोपूजन तथा प्रसाद भोजन याकरीता आमंत्रित करण्यात आलेले आहे. गोपूजना दरम्यान तालुक्यातील बेलोरा या गावातील हरिपाठ भजन मंडळाचा सायंकाळ हरिपाठ तथा नरदोडा येथील श्री बालकदास भजन मंडळ यांचे पेटी - तबला भजन गाय - गोंदन पूजन सोहळा व प्रसाद भोजन कार्यक्रमात रंग भरतील.गोरक्षण संस्थेशी संस्था स्थापनेपासून जुळलेल्या व देणगी सातत्य कायम ठेवणाऱ्या देणगीदारांच्याच साह्याने कार्यक्रमाचे आयोजन असल्याने या निमित्याने गोरक्षण स्थळी असणाऱ्या एकूण तिनशे वीस गाय-वासरांना विशेष अलप देऊन सेवा देण्यात येणार आहे . दिपावली सणामधील गाय-गोदन हा महत्वपूर्ण दिवस असल्याने दरवर्षी गोरक्षण स्थळावरील या सोहळ्याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष केंद्रीत झाल्याचे गोरक्षण संस्थेचे व्यवस्थापक बाळासाहेब नामदेवराव भारसाकळे यांनी कळविले आहे.

श्री शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये दिवाळी

अमरावती- स्थानिक रेल्वेस्टेशन स्थित श्री शिवाजी मराठा हायस्कूल स्टेशन ब्रांच अमरावती येथे दिवाळीच्या पूर्वसंध्येला लक्ष्मीपूजन व मैदानांची पूजा करून दिवाळी उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी दिवाळीची पूजा करत असताना समाजाच्या हिताकरिता मैदानांचे संवर्धन आणि पाण्याचे संवर्धन करणे, हे मानव प्रजातीच्या जीवन जगण्यासाठी अत्यंत आवश्यक असून त्याचे तंतोतंत पालन आपण सर्वांनी करावे, हा संदेश या दिवाळीनिमित्त श्री शिवाजी मराठा हायस्कूल स्टेशन ब्रांच अमरावतीच्या सर्व सहकारी कर्मचारी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी दिला. दिवाळी साजरी करत असताना फटाकेमुक्त दिवाळी साजरी करावी व पाण्याचा जपून वापर करावा, असे कळकळीचे आवाहन विद्यालयातर्फे करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक संदीप इंगोले यांनी केले.



सोलापुर परिषदेत अमरावती बालरोगतज्ञांचे उल्लेखनीय यश

अमरावती- सोलापुर येथे झालेल्या बालरोगतज्ञांच्या परिषदेत अमरावतीच्या बालरोगतज्ञांनी उल्लेखनीय यश मिळवले. शहरातील वरिष्ठ बालरोगतज्ञ डॉ सतीश अग्रवाल द्वारे मेडिकोलीगल विषयावर संचालित परिचर्चेत डॉ सतीश तिवारी व डॉ संदीप दानखडे यांनी भाग घेतला. एका अन्य सत्रात डॉ सतीश अग्रवाल द्वारे लिखित व निर्देशित कोर्टरूमच्या नाट्य रूपांतर 'मूट कोर्ट' मध्ये डॉ सतीश अग्रवाल, डॉ सतीश तिवारी व डॉ श्रीपाद जहागीरदार यांनी उत्कृष्ट भूमिका साकार केल्या. इतर सत्रांत डॉ श्रीपाद जहागीरदार, डॉ नरेश तायडे, डॉ सोनाली शिरभाते, डॉ आदित्य टांक, इ नी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. या परिषदेत आयएपी अमरावती शाखेला तीन पुरस्कार मिळाले. त्यांच्या या यशस्वीतेबद्दल आयएमए अमरावतीचे अध्यक्ष डॉ दिनेश वागडे, सचिव डॉ विक्रम वानखडे, आयएपी अमरावती शाखेचे अध्यक्ष डॉ प्रतिभा काळे, सचिव डॉ आदित्य टांक, कोषाध्यक्ष डॉ सूरज बनसोड, डॉ बिपीन राठोड, डॉ राम ठाकरे यांच्यासह सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले. या कॉंफ्रेंसच्या सफलतार्थ सोलापुरचे डॉ अतुल कुलकर्णी, डॉ कुंदन चोपडे, डॉ संदीप कुलकर्णी, डॉ प्रतिभा पाटील, डॉ समीर खान, डॉ विक्रम दाभाडे, डॉ केयूर शिर्शी, डॉ सुदर्शन चक्र, डॉ आशुतोष यजुर्वेदी इ नी श्रम केले.

विहिरीच्या मोटारपंपाच्या वादातून शेतकऱ्याची निर्घृण हत्या!

मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या दीपक मुरकुटे यांचा तिसऱ्या दिवशी मृत्यू

लागवडधारक अमोल शंकर गुजर यांच्यावर कलम १०३ अन्वये गुन्हा दाखल

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

शेतातील विहिरीवरील मोटारपंप बंद पडल्याच्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान रक्तरंजित घटनेत झाले. लागवडीने शेती करणाऱ्या अमोल शंकर गुजर याने शेतमालक दीपक मुरकुटे यांना लाथाबुक्क्यांनी व काठीने केलेल्या अमानुष मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या शेतकरी दीपक किसनराव मुरकुटे यांचा उपचारादरम्यान तिसऱ्या दिवशी मृत्यू झाला. या घटनेने अंजनगाव सुर्जी परिसरात मोठी खळबळ उडाली असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, अंजनगाव सुर्जी शहरातील रहिवासी दीपक किसनराव मुरकुटे यांची अल्लीपूर शेतशिवारात सुमारे तीन एकर शेती आहे. या शेतात पानपिंपरी या पिकाची लागवड करण्यासाठी त्यांनी अमोल शंकर गुजर याला शेती लागवडीने दिली होती. गेल्या काही दिवसांपासून दोघांमध्ये शेतीच्या कामावरून समन्वय सुरू होता.दरम्यान, शेतातील विहिरीवरील मोटारपंप अचानक बंद पडला. तो दुरुस्त करण्यासाठी कारागीर बोलावण्यात आला होता. दुरुस्तीच्या पैशांवरून दीपक मुरकुटे आणि अमोल शंकर गुजर यांच्यात वाद निर्माण झाला. सुरुवातीला झालेल्या शाब्दिक बाचाबाचीचे रूपांतर काही क्षणातच गंभीर मारहाणीत झाले. संतापाच्या भरात



दीपक मुरकुटे अमोल गुजर

अमोल गुजर याने दीपक मुरकुटे यांना लाथाबुक्क्यांनी तसेच काठीने बेदम मारहाण केली. या मारहाणीत त्यांच्या डोक्याला व नाकाला गंभीर दुखापत झाली. रक्तबंबाळ अवस्थेत त्यांना तातडीने उपचारासाठी प्राथमिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डोक्याला झालेली दुखापत गंभीर असल्याने त्यांची प्रकृती खालावत गेली. अखेर उपचार सुरू असतानाच घटनेच्या तिसऱ्या दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली.दीपक मुरकुटे यांच्या मृत्यूमुळे या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. सुरुवातीला मारहाणीचा गुन्हा दाखल असला तरी मृत्यूनंतर अंजनगाव सुर्जी पोलिसांनी अमोल गुजर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (हत्या) अन्वये, म्हणजेच पूर्वीच्या भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास अंजनगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार सूरज बोडे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय भास्कर हे करीत आहेत. आरोपीला अटक करण्याची प्रक्रिया पोलिसांकडून सुरू असल्याची माहिती मिळत आहे.शेतीतील केवळ काहीशे रुपयांच्या किरकोळ आर्थिक वादातून एका शेतकऱ्याला आपला जीव गमवावा लागल्याने परिसरात संताप आणि शोककळा पसरली आहे. क्षुल्लक कारणावरून वाढत चाललेली हिंसक प्रवृत्ती समाजासाठी धोकादायक ठरत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

मतदार यादी 'अपडेशन' गतिमान

अमरावती- जिल्ह्यात मतदार यादी अद्ययावतीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला असून, ३१ ऑगस्ट ते ५ नोव्हेंबर या कालावधीत नमुना ६, ७ आणि ८ अंतर्गत एकूण ५६,६०९ अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये नवीन मतदार नोंदणीसाठी नमुना ६ चे ३२,२०८, मतदार यादीतील नाव वगळण्यासाठी नमुना ७ चे २,७४५, तर नाव, पत्ता व इतर तपशिलांमधील दुरुस्ती तसेच स्थलांतरासाठी नमुना ८ चे २१,६५६ अर्ज प्राप्त झाले आहेत. विशेष म्हणजे, प्राप्त अर्जापैकी ५०,०६४



ऑनलाइन, तर ६,५४५ अर्ज ऑफलाइन पद्धतीने दाखल झाले आहेत. जिल्ह्यात ३१ ऑगस्ट ते ५ नोव्हेंबर या कालावधीत विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. या कालावधीत नवीन नाव नोंदणी, वगळणे आणि दुरुस्तीसाठी हजारो अर्ज प्राप्त झाले असून, जिल्हा निवडणूक प्रशासनाकडून अर्जांची छाननी व डिजिटायझेशनचे काम गतीने सुरू आहे. प्राप्त आकडेवारीनुसार, संपूर्ण जिल्ह्यात नवीन मतदार नोंदणीसाठी (फॉर्म ६) सर्वाधिक ३२ हजार २०८ प्राप्त झाले.

शेकडो दिव्यांच्या प्रकाशात उजळले शकुंतला रेल्वे स्टेशन



अचलपूर/वार्ताहर

दिपावलीच्या शुभ मुहूर्तावर पुन्हा शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीचे एका सामाजिक उपक्रम मधुन राज्य व केंद्र शासन,रेल्वेबोर्ड दिल्ली यांचे लक्ष वेधण्यासाठी शकुंतला रेल्वे स्टेशन अचलपूर येथे एक आगळे वेगळे प्रतिकात्मक, अहिंसात्मक जनआंदोलन ८ व्या वर्षी ४२ व्या टप्यात पोहचले आहे. या सामाजिक उपक्रम तथा जनआंदोलनच्या प्रारंभी अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने ,वनक्षेत्रपाल सुशांत काळे, वनपरिक्षेत्र अधिकारी पवन बवणेर, प्राचार्य दिनेश मोहोड, शकुंतला रेल बचाव समितीचे मुख्य संघटक योगेश खानझोडे,राजा धर्माधिकारी, दीपा तायडे, शारदा उईके, विजय गोंडचवर, दयाराम चांदेले, राजेश पांडे,सुरेश प्रजापती, प्यारेलाल प्रजापती,रामदास मसने, यास्मिन बानो यांच्या हस्ते शेकडो नागरिक यांना दिवाळी फराळ वाटप करण्यात आले.

चिमकुले बालगोपाल यांना फटाके वाटप करण्यात आले.त्यानंतर माहेर फौंडेशन व जमात ए इस्लामिक हिंद महिला शक्ती कडून एकतेचा संदेश देत रेल रूळावर शेकडो दिवे लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला. पूर्णत्वास नेण्याचा निर्णय घेण्याची मागणी केली. यावेळी विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.यामध्ये माहेर फाऊंडेशन, क्रांती ज्योति संघटना, मराठा सेवा संघ, आदिवासी पर्यावरण संघटन, जमात ए इस्लामीक महिला मध्ये यास्मिन बानो, सायरा बानो, नाझीया खान,मेहरा बानो, नाहिरा खान,संविधान चौक येथील बेबी वजाळे, गंगा दाभाडे, प्रज्ञा नेतनराव, निकिता ताई,सीमा वडगावकर, चंद्रकला खंडारे, आशा गवई, मीना ठोसर, भारती पावडे, आचाल सरदार, अंजु पाटील, निकिता पाटील, सुवर्णा खंडारे,मनोज पांडे, श्याम ठोसर, आयुष् गायकवाड, आदिरा काळे, निर्भय खानझोडे,सौम्या वडस्कर, रोहित नेतनराव, कैलाश ठोसर, भाविक खानजोडे सह शेकडो नागरिक व बालगोपाल उपस्थित होते.

महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन साफसफाई व्यवस्था तातडीने सुधारावी

सर्व प्रभागांमधील कचरा पालकमंत्र्यांच्या संपर्क कार्यालयात टाकणार

माजी कॉंग्रेस नगरसेवक मुन्ना राठोड यांचा इशारा

अमरावती/का.प्र.

महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन साफसफाई व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली असून, शहरातील स्वच्छतेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने तातडीने साफसफाई व्यवस्था सुधारावी, अन्यथा शहरातील सर्व प्रभागांमधील कचरा पालकमंत्र्यांच्या संपर्क कार्यालयात टाकण्यात येईल, असा इशारा माजी कॉंग्रेस नगरसेवक मुन्ना राठोड यांनी दिला आहे.

दिवाळीच्या दिवशी अमरावती महानगरपालिकेचे आयुक्त गोंदावले यांच्या बंगल्यावर कचरा टाकून प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध



करण्यात आला.आयुक्तांच्या भ्रष्टाचारामुळे दिवाळीसारख्या सणाच्या दिवशी संपूर्ण शहरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून, डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कोणार्क कंपनीला अंदाजे ३५० कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आले असून, संबंधित कंपनीने महानगरपालिकेसोबत केलेल्या करारनाम्याचा भंग केला असतानाही मनपा आयुक्तांकडून कोणार्क कंपनीला कोट्यवधी रुपयांची बोगस बिले अदा केली जात आहेत, असा आरोप मुन्ना राठोड यांनी केला.

प्रभाग क्रमांक १८ (राजापेठ) सह संपूर्ण शहरातील नागरिकांच्या घरांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला आहे. महानगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच नागरिकांना अशा प्रकारच्या काळ्या दिवाळीला सामोरे जावे लागत आहे.

त्यामुळे आयुक्तांच्या कारभाराचा निषेध म्हणून मी माझ्या घरातील कचरा आयुक्तांच्या बंगल्यावर टाकत आहे, असे मुन्ना राठोड यांनी स्पष्ट केले.जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष घालावे. अन्यथा अमरावती शहरातील आठ लाख नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता, शहरातील सर्व प्रभागांमधील कचरा पालकमंत्र्यांच्या संपर्क कार्यालयात टाकण्याची वेळ येईल, असा इशाराही माजी नगरसेवक मुन्ना राठोड यांनी दिला आहे.

परतवाड्यात हटणार नाही ईदगाह, कब्रस्तानची कंपाऊंड वॉल

कोर्टाने स्थगितीचा अर्ज फेटाळला, अचलपूर पालिकेविरुद्ध स्थगनादेश पारित

अमरावती/का.प्र.

अचलपूर नगर परिषदेकडून परतवाडा येथील ईदगाह, कब्रस्तानची अधिकृतरीत्या कंपाऊंड वॉल बनवून नियमन करण्याच्या हालचालीला न्यायालयाने चाप लावला आहे. न्यायालयाने ईदगाह कमिटीच्या स्थगितीच्या अर्जाला मंजुरी देत अचलपूर नगर पालिके विरुद्ध स्थगनादेश पारित केला आहे.

त्यामुळे आता पालिका ईदगाह व कब्रस्तानची कंपाऊंड वॉल हटवू शकणार नाही. ईदगाह कमिटी कडून ॲड. नासिर शाह यांनी यशस्वी युक्तिवाद केला. माहिती नुसार, अचलपूर नगर परिषदेने परतवाडा येथील ईदगाह, कब्रस्तानची अधिकृतरीत्या कंपाऊंड वॉल बांधण्याची व नियमन करण्याची प्रक्रिया सुरू केली होती. पालिकेच्या या कारवाई विरोधात ईदगाह कमिटीने न्यायालयात धाव घेतली होती.

ईदगाह कमिटीने न्यायालयात अर्ज दाखल करून पालिकेच्या कारवाईला स्थगिती देण्याची मागणी केली होती. या अर्जावर सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने ईदगाह कमिटीच्या बाजूने निकाल दिला. जिल्हा व सत्र न्यायालयातील न्यायाधीश केंद्रीय स्तर अनंतनागपूर यांनी हा महत्त्वपूर्ण आदेश दिला.

न्यायालयाने अचलपूर नगर परिषदेच्या विरोधात स्थगनादेश पारित करताना स्पष्ट केले की, जोपर्यंत या प्रकरणाचा अंतिम निकाल लागत नाही, तोपर्यंत पालिका ईदगाह व कब्रस्तानच्या कंपाऊंड वॉलला हात लावू शकणार नाही.

तसेच कोणत्याही प्रकारचे बांधकाम किंवा पाडकाम करता येणार नाही.ईदगाह कमिटीतर्फे न्यायालयात मांडण्यात आले की, ईदगाह हे १८० वर्षांपासूनचे अधिकृत धार्मिक स्थळ आहे. या ठिकाणी अनेक वर्षांपासून नमाज अदा केला जातो आणि कब्रस्तान मध्ये दफनविधी होतो.पालिकेने नियमनाच्या नावाखाली कंपाऊंड वॉल हटवण्याचा किंवा त्यात बदल करण्याचा प्रयत्न केल्यास धार्मिक भावना दुखावल्या जातील, असा युक्तिवाद कमिटी तर्फे करण्यात आला.

तसेच ईदगाह व कब्रस्तानच्या जमिनीवर पालिकेचा कोणता ही हक्क नसल्याचेही कमिटीने न्यायालयाला सांगितले. या युक्तिवादा नंतर न्यायालयाने ईदगाह कमिटीच्या स्थगितीच्या अर्जाला मंजुरी दिली. दुसरीकडे, अचलपूर नगर पालिकेनेही ईदगाह कमिटीच्या अर्जाला विरोध केला होता.

मात्र, न्यायालयाने पालिकेचा युक्तिवाद मान्य केला नाही. न्यायालयाने पालिकेचा स्थगिती हटवण्याचा अर्ज फेटाळून लावला.

यामुळे आता पुढील सुनावणी होईपर्यंत ईदगाह आणि कब्रस्तानची कंपाऊंड वॉल जैसे थे राहणार आहे. या निकालानंतर परतवाडा परिसरातील मुस्लिम समाजात समाधानाचे वातावरण आहे. ईदगाह कमिटीने न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. तर दुसरीकडे, पालिकेच्या कारवाईला तात्पुरता ब्रेक लागल्याने परिसरातील तणावही निवळला आहे.

तत्कालीन अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश-२ अचलपूर यांनी यापूर्वीही या प्रकरणात आदेश दिले होते. ६ नोव्हेंबर २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत कोर्टाने पुन्हा एकदा पालिकेविरुद्ध स्थगनादेश कायम ठेवला.

पुढील सुनावणीत या प्रकरणावर अंतिम निर्णय होण्याची शक्यता असून, सर्वांचे लक्ष आता न्यायालयाच्या पुढील आदेशाकडे लागले आहे. ॲड नासिर. आर. शाह यांनी यशस्वी युक्तिवाद केला त्यांना ॲड. मो. अमिन मेमन यांनी सहकार्य केले.

किबिथू ते कोटेश्वर मराठमोळ्या युवकाची पूर्वेकडून पश्चिमेकडे सायकलवारी

१७ वर्षीय सृजल कोहळेचा ३७५० किमी सायकलिंगचा विक्रम!

अमरावती/का.प्र.

खडतर घाट, भूस्खलनामुळे विस्कळीत झालेले रस्ते आणि वादळी पावसाचे तीव्र आव्हान पेलत अमरावतीच्या अवघ्या १७ वर्षीय सृजल प्रवीण कोहळे याने सायकलिंग विश्वात आणखी एक नवा अध्याय लिहिला आहे. देशाचे पूर्वेकडील टोक असलेल्या अरुणाचल प्रदेशातील 'किबिथू' येथून सुरू झालेली त्याची मोहीम थेट पश्चिमेकडील गुजरातच्या कोटेश्वर येथे यशस्वीरीत्या पूर्ण झाली. तब्बल ३,७५० किलोमीटरचे हे अंतर सृजनले केवळ ११ दिवस, २३ तास आणि १० मिनिटांत पार करत ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे.

सूर्यकिरणांचे देशात सर्वप्रथम स्वागत करणाऱ्या 'किबिथू' गावापासून सृजलने आपल्या प्रवासाला सुरूवात केली. प्रवासादरम्यान अरुणाचल प्रदेशात



ठिकठिकाणी झालेल्या भूस्खलनामुळे रस्त्यांवर दरडी कोसळल्या होत्या. मात्र, या प्रतिकूल स्थितीवर मात करत त्याने अरुणाचल प्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश आणि गुजरात अशा सात राज्यांतून सायकल चालवली.

दररोज केवळ चार ते साडेचार तासांची विश्रांती आणि जेवणाचा वेळ वगळता सृजल दररोज सलग १५ ते १६ तास पॅडलिंग करत होता. इतक्या कमी वयात पूर्वेकडून पश्चिमेकडे अशी मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण करणारा तो देशातील एकमेव सायकलपटू ठरला आहे. या संपूर्ण प्रवासात वडील प्रवीण कोहळे, मामा लोकेश जवने यांच्यासह आशिष बोरकर, पीयूष हमन आणि प्रशांत अहोर यांनी 'ऑफिशियलेट' चमू म्हणून त्याची पाठराखण केली.

सृजलचा हा सलग दुसरा विश्वविक्रम ठरला आहे. यापूर्वी वयाच्या सोळाव्या वर्षी त्याने कन्याकुमारी ते काश्मिर हे ३,६०६ किलोमीटरचे अंतर १२ दिवस, १२ तास आणि ३० मिनिटांत पार करून 'गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये आपले नाव नोंदवले होते. प्रवाहाच्या विरूद्ध दिशेने केलेल्या त्या विक्रमावर 'वर्ल्ड अल्ट्रा सायकलिंग असोसिएशन'नेही अधिकृत मोहोर उमटवली होती.

ही सायकल मोहीम केवळ आकड्यांचा विक्रम रचण्यासाठी नव्हती, तर त्यामागे एक सामाजिक उद्देशही होता. सध्याच्या काळात तरूणाईमध्ये वाढणारा मानसिक ताण आणि छोट्या अपयशांमुळे खचून जाण्याची प्रवृत्ती लक्षात घेता, तरूणांचे मनोबल वाढवण्यासाठी सृजलने 'मिशन स्ट्राँग माइंड' ही संकल्पना समोर ठेवून हा प्रवास केला. पाय गळून यायचे, वारा-चढ, वाहतूक, अडचणीच अडचणी, पण खंबीर मन व सहकाऱ्यांची साथ यामुळे हे आव्हान त्याने पूर्ण केले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय



बाईच्या डोक्यावर दुष्काळाचे ओझे

शेतीवरील दुष्काळाचा धोका किती वाढत आहे, कोण अधिक असुरक्षित होत आहे आणि कोणाच्या उपजीविकेचा आधार कोसळत आहे. तसेच हे संकट उभे राहण्यापूर्वी त्यांना सावरण्यासाठी काय करता येईल? हे प्रश्न दुष्काळ धोरणाच्या केंद्रस्थानी असावेत.

महिला आणि शेतीचा घनिष्ठ संबंध आहे. शेतीवरील निम्म्याहून अधिक भार महिला वाहत असतात. त्यामुळे शेती वरील अरिष्टाचेही महिलांच्या आयुष्यावर अनेक परिणाम होतात. दुष्काळी परिस्थितीत तर हे परिणाम अधिक गडद होतात. ज्यांचे हातावर पोट अशा महिलांच्या आयुष्यात दुष्काळ केवळ जाहीर करण्यापुरता किंवा सरकारच्या मदतीसारखा तुटपुंजा येत नाही, भरमसाठ येतो. या संकटात स्वतः तगून राहायचं सोबतच संपूर्ण कुटुंबाचा आधार बनून कोरड्या मातीत घट्ट रुतून राहायचं हे कसब महिलांना आत्मसात करावं लागतं. पण या कोरड्या मातीत घट्ट तगून राहत असताना महिलांना ज्या संकटांचा सामना करावा लागतो, तो तितका दृश्यमान होत नाही. सरकारी मदतही त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. अशा वेळी उपजीविका, कामाचा वाढीव ताण, स्थलांतर, अन्नधान्याची टंचाई, कर्जबारीपणा, हिंसा आणि असमानतेच्या वागणुकीत भर अशा सर्व संकटांना महिलांना सामोरे जावे लागते.

ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला दुष्काळ परिस्थिती जाणून घेण्यासाठी आम्ही मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील एका गावात भेट दिली, त्यानंतर दुष्काळ जाहीर झाल्यावर वेगवेगळ्या जिल्ह्यात महिला शेतकऱ्यांच्या बैठका पार पडल्या.या बैठकांमधूनही महिलांनी दुष्काळातील आपली परिस्थिती सांगितली. बीडमधील बैठकीत 'तुमच्या मते दुष्काळ म्हणजे काय?' असा प्रश्न आम्ही महिलांना केला होता. त्यावर महिलांनी सांगितले, 'ज्या वर्षी बाजरी उगवणार नाही, ते वर्ष आमच्यासाठी दुष्काळाचे वष.' बाजरी हे एकमेव धान्य त्या गायरान जमिनीत घेतात. या वर्षी बऱ्याच महिलांनी कर्ज काढून गावातील बड्या शेतकऱ्यांकडून बाजरी खरेदी केली आहे.

मराठवाडा आणि विदर्भात वेगवेगळ्या तीव्रतेने दुष्काळ येत राहतो. यंदाच्या दुष्काळाच्या निमित्ताने १९७२ च्या दुष्काळाचीही बरीच चर्चा होऊ लागली आहे. १९७२ आणि यंदाच्या दुष्काळात काय बदलले आहे, हा प्रश्न यानिमित्ताने समोर येतो. पावसाचे प्रमाण आणि त्याचे स्वरूप अनिश्चित झाले असले, तरी शेतीपद्धती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेतही मोठे बदल झाले आहेत. पूर्वी शेतकरी ज्वारी, बाजरी, तूर, मूग आणि इतर कडधान्ये तसेच विविध मिश्र पिके घेत असत, असे जुन्या शेतकरी महिला सांगतात. या पिकांचा घरातील अन्नव्यवस्था आणि पशुधनाशी जवळचा संबंध होता. पावसाची अनिश्चितता असतानाही विविध पिके घेतल्यामुळे शेतीतील जोखीम विभागली जात असे.

आज मात्र या प्रदेशात कापूस आणि सोयाबीन ही प्रमुख पिके बनली आहेत. शेतीचे बाजारपेठेवरील, बाजारातून खरेदी कराव्या लागणाऱ्या निविष्ठांवरील आणि बाजारभावावरील अवलंबित्व वाढले आहे. त्याच वेळी पावसाची अनिश्चितताही वाढली आहे. केवळ पाऊस कमी पडल्यामुळेच पिकांचे नुकसान होते असे नाही. पाऊस चुकीच्या वेळी पडला किंवा कमी कालावधीत मोठ्या प्रमाणात पडला, तरी पिकांचे नुकसान होते. दुष्काळ हे केवळ नैसर्गिक संकट नाही. पाण्याचे असमान वाटप, भूजलाचा अनियंत्रित वापर, शेतीविषयक धोरणांच्या मर्यादा, जमिनीच्या मालकीतील विषमता आणि सामाजिक उतरंड यांचाही दुष्काळाच्या परिणामांवर प्रभाव असतो. त्यामुळे दुष्काळाचा अनुभव सर्व महिलांना सारखा येत नाही. अल्पभूधारक महिला, भूमिहीन शेतमजूर, दलित आणि आदिवासी महिला, एकल महिला आणि स्थलांतरित महिला यांच्यासमोरील प्रश्न वेगवेगळे आणि अधिक गुंतागुंतीचे असतात.

कुटुंबाच्या पोषणाची जबाबदारी : निकृष्ट रेशन धान्य

यावर्षी कमी पाऊस पडल्याने शेतातील पिकांचे नुकसान झाले. एक-दोन महिने पुरेल इतकंही शेतात धान्य झालं नाही. मुख्यत्वे कोरडवाहू शेतकऱ्यांच्या हाताला काहीच आलं नाही. महिला सांगतात, आम्ही शेतात राबतो, काही ना काही वर्षाकाठी पुरेल एवढं धान्य मिळेल ही आशा होती, परंतु सगळं गेलं. घरात काहीच उरलं नाही. शेतात केलेली गुंतवणूक ही भरून निघाली नाही. घरातील पुरुष जर कामासाठी स्थलांतरित झाले असतील तर मागे राहिलेल्या कुटुंबासाठी वर्षभराच्या धान्याची सोय कशी करायची, हा प्रश्न महिलांसमोर उभा राहतो.रेशनमधून मिळणारे धान्य नियमानुसार आणि नियमित मिळत नाही. तसेच अतिशय निकृष्ट पद्धतीचे मिळते, हे धान्य स्वच्छ करण्यासाठी अर्धा दिवस लागतो. ज्या भागांत मक्याचा दैनंदिन आहारात समावेश नसतो, अशा भागांतही रेशनमधून मका दिला जातो. तो दळून आणण्यासाठी गिरणीवर अधिकचे पैसे द्यावे लागतात. मिळालेले गहू, तांदूळ इतर धान्यात मिसळून खाल्ले जात आहे. त्यात शेतकरी म्हणून शिक्का असलेल्या काही कुटुंबाचे रेशन बंद झाले आहे. ना त्याचे पैसे मिळत ना धान्य.

पाण्यासाठी पायपीट, मानसिक त्रास

दुष्काळाच्या परिस्थितीत कामांचे स्वरूप अधिक कठीण होते. पिण्यासाठी लागणारे पाणी तसेच वापरासाठी लागणारे पाणी भरण्याची जबाबदारी महिलांवर असते. सध्या जवळ असणारे पाण्याचे स्रोत आटले आहेत. त्यामुळे घरापासून दूर तीन-तीन किलोमीटर अंतरावर जाऊन मिळेल त्या ठिकाणाहून डोक्यावर पाणी महिला वाहून घेऊन येत आहेत. बऱ्याचदा आपला जीव धोक्यात घालून महिला खोल विहिरीत उतरून पाणी ओढून आणतात. महिलांच्या दैनंदिन कामात पाणी वाहून आणण्याची कामे आणखी वाढली आहेत.स्वतःचे, मालकीचे पाण्याचे स्रोत नसल्या कारणाने जिथे पाणी उपलब्ध आहे, अशा ठिकाणाहून पाणी आणले जाते. काही वेळा दिवसभर पाणी वाहून आणण्यात आणि शोधण्यात जात असल्याचा महिलांचा अनुभव आहे.

त्यामुळे रोजगारासोबतच पाण्याची सोय करणे जिकिरीचे बनत आहे. अशा वेळी पाण्यासाठी अडचण तयार करणे, पाणी नाकारणे किंवा वाईट बोलणे असे प्रकार घडतात. त्यामुळे शारीरिक कष्टासोबतच मानसिक त्रासालाही महिलांना सामोरे जावे लागण्याची परिस्थिती महिलांनी सांगितली.

मजुरीचा अभाव, स्थलांतर

ग्रामीण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर लोक शेती आधारित रोजगारावर अवलंबून आहेत. मात्र या वर्षी खरीप हंगाम पूर्ण कोरडाच गेला. त्यामुळे गावात रोजगार उपलब्ध नाही. अशातच थोडेफार काम कुठे मिळालेच तर गरज बघून खूप अल्प मजुरी दिली जाते आहे. यवतमाळ, परभणी आणि अकोला जिल्ह्यांत महिला शेतमजुरांची मजुरी यंदा निम्म्यावर आली आहे. कापूस वेचणीचा दर प्रति किलो दहा रुपयांवरून पाच रुपये झाला आहे. दुष्काळामुळे कापसाच्या झाडांची वाढ झाली नाही, त्यामुळे वेचणीही कठीण झाली आहे. पूर्वी दिवसभरात ८० ते १०० किलो कापूस वेचणाऱ्या महिलांना आता केवळ ३० ते ४० किलो वेचता येतो. त्यामुळे दिवसाला मिळणारी मजुरी ८०० ते १००० वरून १५० ते २०० रुपयांवर आली आहे. रोजगार आणि उत्पन्न घटले तरी घरकाम व मुलांची काळजी घेण्याचे महिलांचे विनामोबदला श्रम कायम आहेत.

बीड जिल्ह्यातील अनेक कुटुंबांना रोजगारासाठी जून-जुलैपासूनच तमिळनाडूमध्ये ऊस तोडणीसाठी जावे लागले. यामध्ये वंचित समूहातील कुटुंबांचा वाटा अधिक आहे. पाण्याअभावी बांधकामासह स्थानिक रोजगारही बंद आहेत. तमिळनाडूमध्ये उष्णता अधिक आहे, त्यामुळे कामगारांना त्रास होतो. यंदा हंगाम पण लवकर संपण्याची शक्यता यामुळे तेथील उत्पन्नातून उचल फिटेल याची ही खात्री नाही. ऊस तोडणी कारखान्यावर स्थलांतरित झालेल्या कुटुंबांना कारखाने सुरू नसल्यामुळे तिथेच थांबून राहावे लागत आहे. त्यामुळे जवळचे रेशन संपून जात आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबे रोजगाराच्या शोधात गुजरात, मध्य प्रदेश राज्यांतही स्थलांतर झाले आहे. सक्तीच्या स्थलांतरामुळे कुटुंबाची काळजी, मुलांचे शिक्षण, आरोग्य व अन्नसुरक्षेचे प्रश्न आणि मागे राहणाऱ्या कर्ज व घरखर्चाचा भारही महिलांना सोसावा लागतो.

कर्जाचे वलय

बीड जिल्ह्यातील ज्या २५ महिलांसोबत आम्ही चर्चा केली, त्यातील प्रत्येक महिलेने कोणत्या ना कोणत्या कारणास्तव कर्जे घेतलेली होती. त्यात फायनान्स कंपन्यांची तसेच सावकारी कर्जे होती. काही महिलांनी आरोग्याच्या कारणास्तव, दैनंदिन घरातील खर्च, धान्य खरेदी करण्यासाठी, मुलांचे शिक्षण तसेच एक कर्ज फेडण्यासाठी दुसरे कर्ज घेतले होते. महिलांच्या नावावर, बचत गटांच्या नावावर सहज-सोप्या पद्धतीने फायनान्स कंपन्यांकडून कर्जे उपलब्ध होतात. त्यामुळे बहुतेकदा कर्जाच्या परतफेडीसाठी चक्रात महिला गुंतल्या जातात.

बीडमधील सुमनताईंच्या तेरा जणांच्या कुटुंबाला दरमहा कर्जाचे सात ते आठ हजार रुपये हप्ते भरावे लागतात. शेतीत उत्पन्न नाही, गावात काम नाही आणि घरातील धान्यही संपले आहे. ऑगस्टमध्ये त्यांनी एक शेळी आणि दोन बकरे १८ हजार रुपयांना विकली.

त्यातून दोन महिन्यांचे हप्ते आणि घरखर्च भागवला. महिलांसाठी शेळ्या ही गरजेच्या वेळी उपयोगी पडणारी बचत असते. ती विकल्याने भविष्यातील उत्पन्नाचा आधारही गेला होता.

कर्ज फेडण्यासाठी बीडमधील कुटुंबांनी ऊस तोडणीची उचलही घेतली आहे. दुष्काळात उत्पन्न थांबले तरी कर्जाचे हप्ते थांबत नाहीत. वाढता आर्थिक ताण, कर्जवसुली आणि स्थलांतर यांचा परिणाम महिलांच्या सुरक्षिततेवर होतो. मुलींचे शिक्षण थांबवून कमी वयात लग्न लावून देण्याच्या प्रमाणात वाढ होते.

प्रकाश रणसिंग, स्वाती सातपुते
लेखक सोपेकॉम संस्थेत कार्यरत आहेत आणि 'मकाम नेटवर्क'चे सदस्य आहेत

शाश्वत आणि पूर्वतयारीचे धोरण हवे

भारताची दुष्काळ व्यवस्थापन व्यवस्था अधिक शास्त्रीय झाली आहे. पावसाची आकडेवारी, उपग्रहांद्वारे मिळणारी माहिती आणि जमिनीतील ओलाव्याचे निर्देशांक वापरले जातात. प्रत्यक्ष नुकसानीचे मूल्यांकन होऊन मदत मिळेपर्यंत शेतकऱ्यांचे पीक, बचत आणि आर्थिक स्थैर्य संपलेले असते. जमीन मालकी व पीक नुकसानीवर आधारित मूल्यांकनात दलित, आदिवासी, भटके, भूमिहीन शेतमजूर, भाडेपट्टीने शेती करणारे आणि महिला शेतकरी यांच्या नुकसानीची पुरेशी दखल घेतली जात नाही. भूजलाची घटती पातळी, जमिनीचा ऱ्हास आणि वाढता उष्णतेचा ताण यांमुळे दुष्काळाचा धोका वाढत आहे. वेळेवर आर्थिक मदत, सुलभ पीकविमा, पीकविविधता, पाणलोट विकास, जल व मृदसंधारण, नैसर्गिक साधनसंपत्तीचे समन्यायी वाटप आणि शेतमजूर व असुरक्षित कुटुंबांच्या उपजीविकेचे संरक्षण यांत दीर्घकालीन गुंतवणूक करणे गरजेचे आहे.या दृष्टिकोनातून बीडमधील द्वारकाताई आणि अनिताताईंचा अनुभव महत्त्वाचा आहे. पीक विविधता व सेंद्रिय खतांचा वापर करून अन्नधान्याची बचत केली. यंदाच्या दुष्काळात मागील हंगामातील धान्यसाठा त्यांच्या कुटुंबासाठी आधार ठरला आहे. शेतीतील विविधता, स्थानिक बियाणे, जमिनीची सुपीकता आणि घरासाठी धान्य साठवण्याची क्षमता संकटात आधार देऊ शकते, हे यातून दिसते. अशा पर्यावरणपूरक शेतीपद्धतींमध्ये राज्याने सातत्यपूर्ण गुंतवणूक करावी. दुष्काळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे.'शेतीवरील दुष्काळाचा धोका किती वाढत आहे, कोण अधिक असुरक्षित होत आहे आणि कोणाच्या उपजीविकेचा आधार कोसळत आहे आणि हे संकट उभे राहण्यापूर्वी त्यांना सावरण्यासाठी काय करता येईल,' हे प्रश्न दुष्काळ धोरणाच्या केंद्रस्थानी असले पाहिजेत. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर मदत देण्यापुरते नव्हे, तर संकट येण्यापूर्वी उपजीविका सुरक्षित करणारे, महिलांच्या गरजा आणि श्रमांची दखल घेणारे आणि दीर्घकालीन दुष्काळमुक्तीसाठी गुंतवणूक करणारे धोरणच खऱ्या अर्थाने दुष्काळाचा सामना करू शकेल.

बलिप्रतिपदा, दिवाळी पाडव्याचे महत्त्व!

आश्विन महिन्याच्या शेवटी दिवाळीतील वसुबारस, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन हे पवित्र दिवस साजरे केल्यानंतर उजाडतो तो कार्तिक महिना आणि पहिल्याच दिवशी कार्तिक शुद्ध प्रतिपदेला बलिप्रतिपदा, दिवाळी पाडवा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभ दिवस साजरा केला जातो. धार्मिक मान्यतेनुसार वामन अवतारात भगवान विष्णूंसमोर आपले सर्वस्व, अगदी स्वतःचे मस्तकही समर्पित करणाऱ्या बळीराजाच्या औदार्याची या दिवशी पूजा केली जाते. आजच्या भौतिकवादी युगात आपल्यातील दातृत्व जागे ठेवून गरजूंच्या आयुष्यात आनंदाचा दिवा लावणे, हाच खरा बलिप्रतिपदेचा संदेश आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या या पवित्र दिनी लामणदिव्यांच्या उजळलेल्या प्रकाशात पत्नीने पतीला ओवाळताना डोळ्यांत दाटून येणारी कृतज्ञता आणि ज्येष्ठांचे आशिर्वाद आपल्या भारतीय संस्कृतीची वीण अधिक घट्ट करतात. अंधाराकडून प्रकाशाकडे नेणाऱ्या या दीपोत्सवात आपल्या जगण्याला एक अलौकिक चैतन्य देणाऱ्या तसेच आपल्याला अंतःकरणात बळीराजासारखे निस्वार्थ दातृत्व जपण्याचा, कुटुंबातील स्नेहाचा सुवास दरवळत ठेवण्याचा संदेश देणारी ही बलिप्रतिपदा.

प्रदीप मोरे

चुका तर कोणाच्याही होऊ शकतात, व्यक्तीच्या, नेत्याच्या, अगदी समाजाच्या. चूक करण्यात काहीही चूक नाही. परिपक्वता / मॅच्युरिटी यात असते की येस, चूक झाली आहे हे लवकरात लवकर लक्षात येणे, चूक झाली आहे हे मान्य करण्याचा प्रामाणिकपणा असणे आणि ती चूक दुरुस्त करण्यासाठी लवकरात लवकर कृती करणे

बरोबर दोन वर्षांपूर्वी नोव्हेंबर २०२४ मध्ये अमेरिकेतील मतदार नागरिकांनी भरघोस मतदान करत डोनाल्ड ट्रम्प

अमेरिकन नागरिकांनी आपली चूक सुधारली!

राष्ट्राध्यक्ष बनवले होते. राष्ट्राध्यक्षच नाही तर काँग्रेस आणि सेनेट देखील त्यांच्या पक्षाच्या हातात दिली होती. डोनाल्ड ट्रम्प म्हटले तर श्वेतवर्णियांचे मेरुमणी. असे असून देखील मी महागाई कमी करीन, अमेरिकेत उद्योगधंदे परत आणेन, कोणतेही युद्ध छेडणार नाही, मी अमेरिकेला पुन्हा ग्रेट करेन, छप्पा त्यांच्या आश्वासनांवर विश्वास ठेवत लॅटिनो आणि कृष्णवर्णीय



मतदार नागरिकांनी देखील ट्रम्प यांना २०२४ मध्ये मतदान केले होते. पण मागच्या २१ महिन्यातच डोनाल्ड ट्रम्प यांनी फक्त आश्वासनांची परिपूर्ती केली नाही असे नाही तर अमेरिकेत महागाई वाढवली, युद्धामुळे खर्च वाढवले, स्थलांतरितांना शोधण्याच्या नावाखाली अमेरिकन नागरिकांनाच अटका केल्या, आणि जगात अमेरिकेच्या नावाला काळीमा फासला. अमेरिकन मतदारांना आपली चूक उमगली. नो किंग्ज मोर्चे गेले वर्षभर निघत होते. ते योग्य औपचारिक, घटनात्मक संधीची वाट बघत होती. ती त्यांनी परवा मध्यावधी निवडणुकांमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाला भरभरून मते देऊन साधली. एलोन मस्क पासून अनेक धनदांडग्यांनी रिपब्लिकन उमेदवाराच्या प्रचारासाठी अक्षरशः शेकडो मिलियन डॉलरच्या देणग्या दिल्या. पण मतदार नागरिक पैशाच्या माजावर केलेल्या धडाकेबाज जाहिरातींना भुलले नाहीत.अमेरिकन नागरिकांची परिपक्वता अजून एका बाबतीत दिसून येते. रिपब्लिकन पक्षाला पुन्हा मतदान केले तर प्रत्येक नागरिकाला पाच हजार डॉलर्स (आपली लाडकी बहीण!) देईन अशी घोषणा ट्रम्प यांनी केली होती. मतदार नागरिक या घोषणेवर थुंकले.कोणत्याही देशातील लोकशाहीची परिपक्वता/मॅच्युरिटी त्या देशातील मतदार नागरिकांच्या परिपक्वतेवर पूर्णपणे अवलंबून असते.एकाने विचारले आहे तुम्ही अमेरिकेबद्दल एवढे विश्लेषण का करता? मी त्याला म्हणालो की तुम्हीच करा विचार. काही उपयुक्तता नाही वाटली तर सोडून द्या. त्यात काय एवढे.

संजीव चांदोरकर

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर रोजी 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून साजरा केला जात आहे. तसेच भगवान बिरसा मुंडा गौरव दिवस सेवा सप्ताहानिमित्त ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर विविध जनकल्याणकारी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर क्रांतिकारी लढवय्या भगवान बिरसा मुंडा यांचे जीवनकार्य आणि त्यांच्या इतिहासातील कार्याविषयीची ही माहिती....

बिरसा मुंडा : क्रांतिकारी योध्दा

देशभरातील जनतेमध्ये आणि आदिवासींमध्ये भगवान म्हणून बिरसा मुंडा यांची पूजा केली जाते. आदिवासी विकास आणि आदिवासींच्या हक्कांसाठी लढणारे लढवय्ये म्हणून त्यांना आपण सर्वजण ओळखतो. त्यांनी अल्प कालावधीत केलेल्या देशसेवा आणि अत्यंत उल्लेखनीय योगदानाबद्दल ते देशवासियांच्या कायम स्मरणात आहेत.बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंड राज्यातील तत्कालीन रांची आणि आजच्या खुंटी जिल्ह्यातील उलिहातू गावात आदिवासी कुटुंबात झाला. बिरसांच्या वडिलांचे नाव सुगना मुंडा आणि आईचे नाव कर्मी मुंडा होते. बिरसा मुंडा यांचे प्राथमिक शिक्षण मिशनरी शाळेत झाले. त्या काळात इंग्रजांकडून भारतीयांवर अत्याचार करण्यात येत होते. हे पाहून त्यांनी शालेय जीवनापासून इंग्रज सरकार विरोधात लढा उभारण्याचा निश्चय केला.

हक्कासाठी क्रांतिकारक लढा

वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी, सध्याच्या झारखंडमधील उलिहातू गावातील बिरसा, हा तरूण मुलगा वसाहतवादी शोषणाविरुद्ध मोठ्या प्रमाणात प्रतिकार करणारा नायक बनला. जेव्हा ब्रिटीश अधिकारी आणि स्थानिक जमीनदार शोषण करीत होते, त्यांच्या जमिनी बळकावत होते आणि आदिवासी समुदायांवर अत्याचार करीत होते, तेव्हा भगवान बिरसा यांनी या सामाजिक आणि आर्थिक अन्यायाविरुद्ध आवाज उठविला आणि लोकांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी प्रेरित केले. 'धरती आबा' म्हणून आदरणीय असलेल्या भगवान बिरसा यांनी १८९० च्या दशकाच्या उत्तरार्धात ब्रिटीश दडपशाहीविरुद्ध 'उलगुलान' किंवा मुंडा बंडाचे नेतृत्व केले. इंग्रजांचा जनतेवरील अन्याय सहन न झाल्याने त्यांनी आयुष्यभर इंग्रजांविरोधात संघर्ष केला.

उलगुलान हा निःसंशयपणे बंडखोरीपेक्षा अधिक तीव्र होता.ही लढाई न्याय आणि सांस्कृतिक ओळख या दोन्हींसाठी होती. बिरसा मुंडा यांच्या पुढाकारामुळे एकीकडे आदिवासींना कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय त्यांच्या जमिनीवर मालकी मिळवण्याचा आणि शेती करण्याचा अधिकार मिळाला आणि दुसरीकडे आदिवासी चालीरीती आणि सामाजिक मूल्यांचे महत्व देखील एकत्र आणले.

आजारी लोकांची सेवा करणे हे बिरसा यांचे ध्येय होते. त्यांनी औषधोपचार करण्याचे प्रशिक्षण घेतले होते. यशस्वी उपचाराच्या अनेक घटनांनी लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला होता. ते गावोगावी जाऊन आजारी लोकांना भेटत असत आणि आपल्या कौशल्याने आणि आपल्या उपचाराने असंख्य लोकांना बरे करीत असत. दुष्काळ आणि महामारी आल्यानंतर जनतेचे प्रचंड हाल झाले. अशा काळात बिरसा मुंडा यांनी जनतेची खूप सेवा केली.

दोन वर्षे तुरुंगवास

एकीकडे जनतेचे हाल होत होते, दुसरीकडे इंग्रजांचा जुलूम अशा स्थितीत बिरसा यांनी जनतेवरील कर माफीसाठी इंग्रजांविरुद्ध थेट आंदोलन सुरू केले. बिरसांची वाढती लोकप्रियता इंग्रजाच्या डोळ्यात खुपत होती. त्यांनी दडपशाहीचा वापर करून १८९५ मध्ये बिरसा मुंडा यांना अटक करून हजारीबाग तुरुंगात पाठवले. बिरसा मुंडा येथील तुरुंगात सुमारे दोन वर्षे बंदिस्त राहिले. पुढे १८९७ ते १९०० या काळात ब्रिटिश आणि मुंडा यांच्यात अनेक वेळा युद्धे झाली.बिरसा मुंडा आणि इंग्रज



यांच्यात खुंटी येथे ऑगस्ट १८९७ मध्ये युद्ध झाले, बिरसा मुंडा आणि त्यांच्या सुमारे ४०० सहकाऱ्यांनी अत्यंत धैर्य दाखवित धनुष्यबाणांसह खुंटी पोलीस स्टेशनवर हल्ला केला. १८९८ मध्ये टांगा नदीच्या काठावर मुंडांसह त्यांचे सहकारी आणि इंग्रज यांच्यात प्रचंड संघर्ष झाला. या लढाईत इंग्रज सैन्याचा मानहानीकारक पराभव झाला. परंतु इंग्रजांनी वचपा काढण्याकरिता अनेक आदिवासी नेत्यांना अटक करीत कारवाई करण्यास सुरुवात केली. यानंतर १९०० साली डोंबाडी टेकडीवर दुसरे युद्ध झाले. या लढ्यात अनेक महिलांसह निष्पाप अशा लहान मुलांचा मृत्यू झाला.

रांचीमध्ये घेतला अखेरचा श्वास

बिरसा मुंडा यांनी युद्ध करून इंग्रजांना जेरीस आणले होते. त्यामुळे फेब्रुवारी १९०० मध्ये इंग्रजांनी बिरसा मुंडा यांना चक्रधरपूर येथून अटक करून रांची तुरुंगात डांबले. येथेच ९ जून १९०० रोजी बिरसा मुंडा यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांचा मृत्यू कॉलरामुळे झाल्याचे इंग्रज सरकारने सांगितले. मात्र, त्यावेळी कॉलराची कोणतीही लक्षणे दिसली नसल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. वयाच्या २५ व्या वर्षी मुंडा यांचा मृत्यू झाला.

भगवान बिरसा मुंडा यांनी दाखवलेल्या मार्गावर चालणाऱ्याला 'बिरसाईच' म्हणतात. आजही त्यांचे अनुयायी त्यांनी सांगितलेल्या विचारधारेप्रमाणे चालतात. बिरसा मुंडा यांनी संपूर्ण जीवन आदिवासी समाजाच्या विकासाकरीता वाहून घेतले होते. अत्याचाराविरोधात आक्रमकपणे लढा देताना त्यांनी इंग्रजांच्या अत्याचाराविरुद्ध बिगुल फुंकले. बिरसा मुंडा हे पुरोगामी विचारवंत आणि सुधारणावादी नेते होते. त्यांनी आदिवासी समाजाला अंधश्रद्धा आणि अंमली पदार्थांच्या व्यसनाच्या विरोधात जागरूक केले. प्राण्यांना मारणे योग्य नाही, त्यांचा बळी देणे चुकीचे आहे, असे त्यांचे मत होते. पशू-पक्षी यांच्याबाबत सहानुभूती असली पाहिजे, असे सांगून त्यांनी आदिवासींना दारू पिण्यास विरोध केला. बिरसा मुंडा यांनी समस्त आदिवासींचे संघटन करण्यावर भर दिला.झारखंड व्यतिरिक्त बिहार, ओडिशा, छत्तीसगड आणि पश्चिम बंगालच्या आदिवासी भागातही बिरसा मुंडा यांची पूजा केली जाते. रांची येथील कोकर येथे बिरसा मुंडा यांची समाधी आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने 'बिरसाईच' लोक, अनुयायी त्यांना आदरांजली वाहण्यासाठी तिथे जातात.

गौरव दिवस होणार साजरा

भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या जल, जंगल, जमीन आणि पारंपरिक हक्कांच्या संरक्षणासाठी केलेल्या संघर्षाचे स्मरण करण्यासाठी केंद्र शासनाने १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिन' म्हणून घोषित केला आहे. आदिवासी स्वातंत्र्यवीरांचे योगदान, संस्कृती, परंपरा, इतिहास, भाषा आणि अस्मिता यांचे जतन व संवर्धन करून हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

राज्यभर विशेष कार्यक्रम

भगवान बिरसा मुंडा गौरव दिवस सेवा सप्ताहानिमित्त ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर विविध जनकल्याणकारी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सप्ताहाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे, विविध शासकीय सेवांचा लाभ सुलभ करणे तसेच त्यांचे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि आरोग्यविषयक सक्षमीकरण करण्यावर तसेच पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ, सेवा वितरणावर विशेष भर देण्यात येणार आहे.

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर २०२६ रोजी महाराष्ट्रातील गडचिरोली येथे देशस्तरावरील मुख्य शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमास राज्यपाल, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यानिमित्त राज्यातील सर्व जिल्हा आणि अनुसूचित जमातीबहुल तालुका मुख्यालयांमध्ये भगवान बिरसा मुंडा तसेच अन्य आदिवासी महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात येणार आहे. पद्म पुरस्कारप्राप्त आदिवासी व्यक्ती, सामाजिक नायक, समाजसेवक, बुद्धिजीवी, आदिवासी संत-महंत तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व समूहांचा सन्मान करण्यात येणार आहे. आदिवासी महापुरुषांच्या नावाने उद्याने, चौक आणि रस्त्यांचे नामकरण तसेच ऐतिहासिक वारशाच्या जतनाचे उपक्रमही राबविण्यात येतील.

अनिल आलुरकर
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,

■ मंगळवार, १० नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

अकोला
जिल्हा विशेष

दिवाळीच्या गर्दीत मोबाइल चोरणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद

झारखंडमधील आरोपीला अटक; १.५० लाखांचे सात मोबाइल हस्तगत

■ प्रतिनिधी | अकोला ■

दिवाळी सणानिमित्त बाजारपेठेत झालेल्या गर्दीचा फायदा घेत नागरिकांचे मोबाइल चोरणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा सिटी कोतवाली पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात झारखंडमधील एका २५ वर्षीय आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून चोरीचे सात मोबाइल जप्त करण्यात आले आहेत. हस्तगत केलेल्या मोबाइलची एकूण किंमत १ लाख ५० हजार रुपये आहे.

शहरातील गांधी रोडवरील शनी मंदिरासमोर ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते १०.३० वाजताच्या दरम्यान संतोष रामदास जवादे (वय ५२, रा. भवानीनगर, अकोला) हे दिवाळीच्या खरेदीसाठी गेले होते. यावेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातील १५ हजार रुपये किमतीचा विवो कंपनीचा मोबाइल लंपास केला.



या प्रकरणी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास करताना सिटी कोतवालीच्या डी.बी. पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे करणकुमार टमाटर नोनीया (वय २५, रा. बाबुपुर, तीन पहाड, तिनहर आर.एस., साहेबगंज, झारखंड) याला निष्पन्न केले. त्याच्याकडून फिर्यादीचा चोरी गेलेला विवो मोबाइल तसेच विवो, ओप्पो, रियलमी आणि मोटोरोलाचे अन्य सहा मोबाइल जप्त करण्यात आले. अशा एकूण सात मोबाइलची किंमत १ लाख ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईमुळे मोबाइल चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक निलेश पांडे आणि शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सिटी कोतवालीचे पोलीस निरीक्षक संजय गवई यांच्या नेतृत्वात डी.बी. पथकातील पोलीस हवालदार अजय भटकर, ख्वाजा शेख, किशोर येउल तसेच पोलीस कर्मचारी शैलेश घुगे, आकाश जामोदे आणि गणेश डुमपल्लु यांनी ही कामगिरी केली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार किशोर येउल करीत आहेत.

'एक दिवा माणुसकीचा' उपक्रमातून गरजूंना दिवाळीचा गोडवा!

रस्त्यावरील निराधार बांधवांना पारंपरिक महाराष्ट्रीयन स्नेहभोजन; तरुणांचा सामाजिक उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

दिवाळीचा आनंद केवळ आपल्या कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू, निराधार आणि वंचित बांधवांच्या जीवनातही आनंदाचा प्रकाश पसरावा, या उद्देशाने 'एक दिवा माणुसकीचा' हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून रस्त्याच्या कडेला आणि उघड्यावर राहणाऱ्या गरजू नागरिकांना पारंपरिक महाराष्ट्रीयन स्नेहभोजन देऊन त्यांच्यासोबत दिवाळीचा आनंद साजरा करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत पुरणपोळी, चिंचोणी, कुरळी, पापड, भजी, वळे, आलू-मटर भाजी, सार भाजी, चपाती आणि भात अशा विविध पारंपरिक खाद्यपदार्थांचा समावेश असलेले भोजन गरजू बांधवांना वितरित करण्यात आले. सणासुदीच्या काळात समाजातील उपेक्षित घटकांनाही आपलेपणाची जाणीव व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता. दिवाळी म्हणजे केवळ घरांची रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी आणि मिठाईची देवाणघेवाण नव्हे, तर दुसऱ्याच्या आयुष्यात आनंदाचा दिवा प्रज्वलित करणे, हाच या सणाचा खरा संदेश आहे.



याच भावनेतून तरुणांनी पुढाकार घेत माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय दिला. या उपक्रमासाठी आकाश गवई, मयूर इंगळे, चेतन इंगळे, अमोल खळे, सुबोध वानखडे, गणेश गेबड पाटील, भरत सावरकर, अनिकेत इंगळे, नंदू बागडे, प्रसाद माळी, कुंदन बागडे, संतोष वाघमारे, रोशन इंगळे आणि प्रथमेश इंगळे यांनी पुढाकार घेतला. 'एक दिवा माणुसकीचा, एक घास आपुलकीचा' या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाने दिवाळीच्या उत्सवाला सामाजिक संवेदनशीलतेची जोड दिली. गरजूंच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य हेच या उपक्रमाचे खरे फलित ठरले.

पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केली शेतकऱ्यांसमवेत दिवाळी साजरी

महिलाभगिनींचा साडी, फराळ देऊन सन्मान

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्याचे कामगार मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी लक्ष्मीपूजनाच्या आजच्या दिवशी तेल्हारा तालुक्यातील गोर्धा या गावी जाऊन तेथील शेतकऱ्यांसमवेत दिवाळी साजरी केली व शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांना दिलासा दिला. यावेळी दिवाळी, पाडवा व भाऊबीजनिमित्त गावातील शेतकरी, शेतमजूर महिलाभगिनींचा पालकमंत्र्यांच्या हस्ते फराळ व साडी देऊन सन्मानही करण्यात आला.

आमदार प्रकाश भारसाकळे, हिवरखेडच्या नगराध्यक्ष सुलभाताई दुतोंडे, तेल्हारा येथील नगराध्यक्ष वैशालीताई पालीवाल, संतोष शिवरकर, सरपंच भारती



थोरात, ज्येष्ठ नागरिक विनायकराव देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर, महिलाभगिनी व नागरिक उपस्थित होते.

राज्यात दुष्काळाचे संकट उद्भवले आहे. मात्र या काळात शेतकरी बांधवांनी डगमगून जाऊ नये. राज्य शासन खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. दुष्काळ लक्षात घेऊन शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ नये म्हणून राज्य शासनाने केंद्र शासनाच्या मदतीची वाट न पाहता तत्काळ अग्रीम मदत जाहीर केली व वेगाने वाटप होत आहे. यानंतर दुष्काळाबाधितांसाठी सर्व ती आवश्यक मदत टप्प्याटप्प्याने देण्यात येईल. राज्य शासन शेतकरी बांधवाला कधीही वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्र्यांनी यावेळी दिली.

दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे विपुल साठवण क्षमता असलेल्या पूर्व विदर्भातील गोसी खुर्द प्रकल्पाचे पाणी अकोला, बुलडाणा जिल्ह्यापर्यंत पोहोचून सर्व विदर्भातील कोरडवाहू प्रदेश कायमचा दुष्काळमुक्त होईल. शेतकरी, महिला भगिनी अशा सर्व घटकांसाठी शासनाकडून सर्वांसाठी घरे– विविध आवास योजना, लाडकी बहिण योजना, उज्ज्वला योजना अशा अनेक योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी पालकमंत्री ॲड. फुंडकर यांनी शेतकरी गजानन परनाटे यांच्या घरी जाऊन संवाद साधला व त्यांचे कुटुंबीय व शेतकऱ्यांसोबत फराळ केला. गावातील श्री हनुमान मंदिर येथे सभागृहात त्यांनी शेतकरी बांधव, महिला भगिनींशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व त्यांना दिलासा दिला.

मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

वहदत ए इस्लामी, अकोला शाखेच्या खिदमत-ए-खल्क विभागाच्या वतीने मानवतेच्या कल्याणासाठी आणि समाजसेवेच्या भावनेतून विविध उपक्रम राबवले जातात. याच दृष्टीने जुल्फिकार नगर, भगतवाडी येथील के.जी.एन. स्कूलमध्ये महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला महिलांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.या शिबिरात त्वचारोग तज्ज्ञ डॉ. फरहाना अंसारी (एम.डी.), स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. इशरत खान(डी.जी.ओ.), दंतवैद्य डॉ. सैमा तबस्सुम(बी.डी.एस.), सर्वसामान्य चिकित्सक डॉ. राहेमीन अख्तर, डॉ. रोझी आफरीन तसेच डॉ. नबीला एहसानत यांनी रुग्णांची तपासणी करून आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. शिबिरात रुग्णांना मोफत औषधे वितरित करण्यात आली.शिबिराच्या सुरुवातीला संस्थेच्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. वहदत ए इस्लामी आणि वहदत फाउंडेशन, अकोला यांच्या सहकार्याने सामान्य वैद्यकीय शिबिर, डोळे तपासणी शिबिर, गरजूंमध्ये अन्न वाटप आणि शैक्षणिक उपक्रम अशा अनेक समाज कल्याण कारी उपक्रमांचेही आयोजन केले जाते.दाता मायनॉरिटी एज्युकेशन सोसायटीचे सचिव फारूक यांनी वहदत ए इस्लामीच्या या मौलिक उपक्रमाचे कौतुक केले.


रुईखेड - वस्तापूर रस्त्यावरील पूल मधोमध खचला!

अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे पुलाची दुरवस्था; ग्रामस्थांकडून तातडीने दुरुस्तीची मागणी

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील रुईखेड ते वस्तापूर-मानकरी ग्रामा क्र. २८ वरील महागाव गढी गावाजवळील पूल मधोमध खचल्याने या मार्गावरील वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सातपुड्यातील आदिवासी गावांना जोडणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गावरील पूल धोकादायक स्थितीत पोहोचल्याने मोठ्या अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.

आदिवासी उपयोजना अंतर्गत गतवर्षीच या पुलाचे बांधकाम करण्यात आले होते. मात्र, अल्पावधीतच पूल मधोमध खचल्याने बांधकामाच्या दर्जाबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. रुधाडी-पोपटखेड परिसरातील खदानींमधून गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांची या मार्गावर सातत्याने वर्दळ असते. याच जड वाहतुकीमुळे पुलावर अतिरिक्त भार येऊन तो खचल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. रुईखेड ते मानकरी हा परिसरातील अनेक आदिवासी गावांसाठी दळणवळणाचा प्रमुख मार्ग आहे. त्यामुळे पुलाची सद्यस्थिती लक्षात घेता या मार्गावरून होणारी अवजड वाहतूक आणि प्रवाशांची सुरक्षितता हा गंभीर विषय बनला आहे. पुलाची वेळीच दुरुस्ती न झाल्यास एखादी मोठी दुर्घटना घडण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, वस्तापूर ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच सुनीताताई कासदे यांनी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अकोट येथील उपअभियंत्यांना निवेदन सादर केले आहे.



आशिष मोकळकर यांची आयआयटी मंडीत राष्ट्रीय स्तरावर झेप

■ प्रतिनिधी | अकोला ■

बुद्धिमत्ता, जिद्द आणि संशोधनवृत्तीच्या जोरावर अकोल्याच्या सुपुत्राने राष्ट्रीय स्तरावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी), मंडी येथे आयोजित बहुआयामी कृत्रिम बुद्धिमत्ता स्पर्धा २०२६ मध्ये आशिष मोकळकर याने देशभरातील आठ हजारांहून अधिक स्पर्धकांमधून सातवा क्रमांक पटकाविला. विशेष म्हणजे, राष्ट्रीय स्तरावर यशाची मोहोर उमटविल्यानंतर आशिष सध्या लंडनमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेतील अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पुढील संशोधन आणि प्रगतीसाठी प्रयत्नशील आहेत.

आशिष हा अकोला पंचायत समितीचे विस्तार अधिकारी डॉ. उल्हास मोकळकर आणि महान जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जिल्हा परिषद मागासवर्गीय पतसंस्थेच्या उपाध्यक्षा संगीता मोकळकर यांचा चिरंजीव आहे.

देशातील जायले आडनावाचा कौटुंबिक स्नेह मिलन सोहळा

अकोट : सरसेनापती कडताजी जायले ,संत भास्कर महाराज, गुरुवर्य वासुदेव महाराज यांचा संपन्न वारसा लाभलेल्या देश-विदेशातील जायले परिवाराचा कौटुंबिक स्नेह मिलन सोहळा अकोली जहागीर येथे आयोजित करण्यात आला आहे.ष

संत गजानन महाराजांनी सजल केलेली विहीर अकोली जहागीर येथे दि १२ नोव्हेंबर रोजी सकाळी१० वाजता आयोजित या कार्यक्रमाला विद्यावाचस्पती हभप प्रशांत महाराज ताकोते,हभप अशोक महाराज जायले, ॲड. जगदीश जायले ,प्राचार्य डॉ गजानन चोपडे, पंकज जायले,अनंत गावंडे यांची उपस्थिती राहणार आहे.

सरसेनापती कडताजी जायले ,संत भास्कर महाराज, गुरुवर्य वासुदेव महाराज यांचा संपन्न वारसा, नौकरी व्यवसाय निमित्त देश-विदेशात वास्तव्यास असलेल्या जायले परिवाराच्या पुढील पिढीला ज्ञात व्हावा यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. आणि म्हणूनच मुलगा,मुलगी, सुन, जावई यांना उपस्थित राहण्याचे आग्रही विनंती केली आहे.सकाळी ९ वाजता नावनोंदणी होऊन स १० वाजता संत वासुदेव महाराज यांच्या गुरुवंदनेने कार्यक्रमला सुरुवात होणार आहे.कडताजी जायले यांच्या पराक्रमाची गाथा तसेच संत भास्कर महाराज, संत वासुदेव महाराज यांचे पवित्र चरीत्र याची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.

जाहीर नोटीस

वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) मूर्तिजापूर, जि. अकोला यांचे न्यायालय (श्री सबनीस साहेब)

आर.एम.जे.सी. क्रमांक २२६/२०२६ प्रो. नं. ५०५९/२०२६
चौ. ता. १०/१२/२०२६ दि. ०६/११/२०२६

अर्जदार : १) मोहन सुवालाल टिलावत, वय ६७ वर्षे, रा. विरहित, पो. घोटा, ता. मूर्तिजापूर, जि. अकोला. २) हरीश उर्फ हरिनारायण सुवालाल टिलावत (शर्मा), वय ६१ वर्षे, रा. नरेंद्र जिनिंग फॅक्टरी, लक्ष्मी नगर, कारंजा, ता. कारंजा, जि. वाशिम. ३) पुरुषोत्तम सुवालाल शर्मा (टिलावत), वय ५७ वर्षे, रा. शिवाजी नगर जवळ, संतोषी माता कॉलनी, कारंजा, ता. कारंजा, जि. वाशिम. ४) तुळशीराम सुवालाल टिलावत, वय ५० वर्षे, रा. रामजीवन इंदोरे, दुर्गा माता मंदिर जवळ, शास्त्री वार्ड, पांढरकवडा, ता. पांढरकवडा, जि. यवतमाळ. ५) राजश्री सुरेश शर्मा (टिलावत), वय ५८ वर्षे. ६) अक्षय सुरेश शर्मा (टिलावत), वय ३१ वर्षे. ५ व ६ रा. रायतालाई, खाकनार, जि. बुरहानपूर. ७) शितल विशाल शर्मा, वय ४६ वर्षे, रा. गणेशगंज मार्ग, खंडवा, ता. जि. खंडवा, मध्यप्रदेश, पिनकोड ४५०००१. ८) मोनाली रामकिशोर शर्मा, वय ३७ वर्षे, रा. कॉलेज रोड, शिवनेरी चौक, शेगाव, ता. शेगाव, जि. बुलढाणा.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हे मयत सुवालाल घनश्याम टिलावत, योगेश्वर सुवालाल टिलावत, व्दारा मोहन सुवालाल टिलावत, रा. विरहित, पो. घोटा, ता. मूर्तिजापूर, जि. अकोला यांचे वारस आहेत. उपरोक्त नमूद अर्जदार हे त्यांचे मिळकतीचे कायदेशीर वारसदार आहेत. या व्यतिरिक्त कोणीही वारसदार नाहीत. करिता वरील अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याकरिता चौकशी तारीख दि. १०/१२/२०२६ ही ठेवण्यात आलेली आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीस द्वारे आपणांस कळविण्यात येते की, सदर प्रकरणात कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत/आक्षेप घ्यावयाचा असेल तरी त्यांनी स्वतः अगर निर्देशित केलेल्या वकिलामार्फत चौकशी तारीख दिनांक १०/१२/२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी विद्यमान न्यायालयात हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत/आक्षेप नाही असे समजून सदर प्रकरण निकाली काढण्यात येईल. करिता ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे. आज दिनांक ०६/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

मूर्तिजापूर.

शिक्का

सही
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मूर्तिजापूर

जाहीर नोटीस

वि.०९ वे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१६७८/२०२६ प्रोसेस नं.१४००८/२०२६
चौ.ता. १६/११/२०२६ दिनांक : ३१/१०/२०२६

अर्जदार : १. डॉ. दिपक लक्ष्मणराव मानकर, वय अं. ६१ वर्षे, धंदा- मेडीकल प्रॅक्टीशनर, रा. तोष्णीवाल लेआउट, राम कृष्ण हॉस्पीटल, रतनलाल प्लॉट, अकोला, ता. जि. अकोला. २. मुकुंद लक्ष्मणराव मानकर, वय अं. ५१ वर्षे, धंदा- नोकरी, रा. लॉरेल ३०४, पापलीयन पार्क, संघर्ष नगर, बस स्टॉप, चांदीवली अंधेरी ईस्ट, जि. मुंबई.

विरुध्द

गैरअर्जदार : सौ. सुचेता विनय धोटे, वय अं. ५० वर्षे, धंदा- घरकाम, रा. विठ्ठल वाडी, कांडली, परतवाडा, ता. अचलपूर, जि. अमरावती.

मयताचा पत्ता :- मयत : लक्ष्मणराव बळीराम मानकर

पत्ता :- रा.तोष्णीवाल लेआउट, राम कृष्ण हॉस्पीटल, रतनलाल प्लॉट, अकोला, ता. जि. अकोला.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मणराव बळीराम मानकर यांचे दि.११/०४/२०२१ रोजी निधन झाले. अर्जामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, सदरहू मयत लक्ष्मणराव बळीराम मानकर यांचे नावे बचत खाते व फिक्स्ड डिपॉझीट मध्ये विविध रक्कम जमा आहे ज्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

(१) अकोला डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लि., अकोला, शाखा वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला येथे जमा खाते क्र.२०१२४२ मध्ये रू.२,४८,९४९/-. **(२)** स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, अकोला येथे बचत खाते क्र.३०३६९३९५७४५ मध्ये रू. १९,६०,४८१/-. **(३)** अकोला डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लि., अकोला, शाखा वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला येथे फिक्स्ट डिपॉझीट रिसिप्ट क्र.०५०५११३०३/३००३/३ मध्ये रू.१,८६,८५७/-. **(४)** अकोला डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लि., अकोला, शाखा वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला येथे फिक्स्ड डिपॉझीट रिसिप्ट क्र.०५३०५/३०८/२०५८/३ मध्ये रू.१,२५,०००/-. **(५)** दि. अकोला वाशिम डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लि., अकोला येथे दि.१५/०१/२०२६ पर्यंतचे स्टेटमेंट नुसार रु.५,६०,८०६/- एवढी रक्कम जमा असून. **(६)** अकोला डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लि., अकोला, शाखा वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला येथे फिक्स्ड डिपॉझीट रिसिप्ट क्र. ३३८/५०१ / १ मध्ये रु.१, १४, ३१४/-. **(७)** अकोला डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लि., अकोला, शाखा वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला येथे फिक्स्ड डिपॉझीट रिसिप्ट क्र. ३३६ / ६०७/१ मध्ये रू. १,१४,३१४/-. **(८)** दि. अकोला अर्बन को-ऑप बँक लि. अकोला, शाखा वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला येथे फिक्स्ड डिपॉझीट रिसिप्ट क.१०१२१०३१३०७४२ मध्ये रू.१,१०,१४८/-. **(९)** दि. अकोला अर्बन को-ऑप बँक लि. अकोला, शाखा वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला येथे फिक्स्ड डिपॉझीट रिसिप्ट क्र.१०१२१०३१३२५०४ मध्ये रू.५,३९,३८८/-. **(१०)** दि. अकोला अर्बन को-ऑप बँक लि. अकोला, शाखा वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला येथे फिक्स्ड डिपॉझीट रिसिप्ट क्र. १०१२१०३१३२५०५ मध्ये रू.५,४४,०६१/-. **(११)** दि. अकोला अर्बन को-ऑप बँक लि. अकोला, शाखा वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला येथे फिक्स्ड डिपॉझीट रिसिप्ट क्र.१०१२१०३१३२५०६ मध्ये रू.१,५७,४०७/-. **(१२)** दि. अकोला अर्बन को-ऑप बँक लि. अकोला, शाखा वाडेगाव, येथे बचत खाते क्र.१०१२००५००२७०४ मध्ये रु.१,१४,७१३/- व बचत खाते क्र.१०२७००५००१५३६ मध्ये रु.१,३१,६७१/- एवढी रक्कम जमा आहे. **(१३)** दि. अकोला वाशिम डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लि., अकोला येथे बचत खात्या मध्ये दि. ०९/०४/२०२५ रोजीचे माहीती नुसार रु. २,४५, ८४५/- एवढी रक्कम जमा असून.

अशा एकुण वरील नमूद रकमेचा लाभ अर्जदार व गैरअर्जदार यांना मिळण्याकरीता उपरोक्त अर्जदाराने उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेसाठी उपरलिखित अर्ज केला आहे. अर्जामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, वरील अर्जदार यांच्या शिवाय मयतास कोणीही उत्तराधिकारी नाही. सबब, उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे. करीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

पोलिसांना न दिसणाऱ्या दारूसाठ्याचा महिलांनी केला पर्दाफाश



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तेल्हारा शहरातील विठ्ठल नगरात कथित अवैध दारूविक्रीविरोधात संतप्त महिलांनी आक्रमक पवित्रा घेत दारू अड्ड्यावर धडक दिली. यावेळी एका घरातून दारूच्या हजारो बाटल्या बाहेर काढून रस्त्यावर फेकण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली.

नथसिंग मनीरामसिंग सूर्यवंशी यांच्या घरात अवैध दारूविक्री होत असल्याचा आरोप महिलांनी केला आहे. यासंदर्भात यापूर्वी ठाणेदार आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदने देऊनही कारवाई होत नसल्याने महिलांनी स्वतःच पुढाकार घेतल्याचे सांगितले.विशेष म्हणजे, यापूर्वी पोलिसांनी संबंधित ठिकाणी कारवाई केली असताना दारूसाठा आढळला नसल्याचा दावा केला जात आहे. मात्र, आता महिलांनी हजारो बाटल्या बाहेर काढल्याने पोलिसांच्या पूर्वीच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. वारंवार तक्रारी करूनही कारवाई का झाली नाही, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. दरम्यान,विठ्ठल नगरच नव्हे, तर संपूर्ण तेल्हारा शहरातील अवैध दारूविक्रीच्या ठिकाणांची तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. आक्रमक भूमिकेनंतर तरी पोलीस प्रशासन दारूविक्रीविरोधात ठोस पावले उचलणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

युवा विचारपीठच्या 'अकोला आयडॉलचा ग्रँड फिनाले उत्साहात संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

नवोदित गायकांच्या स्वप्नांना स्वर देणारे, सुप्त कलागुणांना भव्य व्यासपीठ उपलब्ध करून देणारे आणि संगीत क्षेत्रातील नव्या प्रतिभेचा शोध घेणारे युवा विचारपीठ प्रतिष्ठानचा 'अकोला आयडॉल पर्व ५ – २०२६' या राज्यस्तरीय महागायन स्पर्धेचा भव्य ग्रँड फिनाले श्री शिवाजी महाविद्यायात संपन्न झाला.यात राज्याच्या विविध जिल्ह्यांमधून तसेच इतर राज्यातून ३५० पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग घेत आपल्या स्वरप्रतिभेची झलक सादर केली. तब्बल तीन आठवडे चाललेल्या या संगीत महोत्सवाने अकोल्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात एक नवे आणि अविस्मरणीय सुरेल पर्व निर्माण केले.या सोहळ्याचा प्रारंभ उद्योजक संजय रुहाटिया यांच्या हस्ते व माजी आ अमोल मिटकरी,प्रा. प्रकाश डवले,डॉ. प्रा. संतोष हुशे, माजी प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे, डॉ. हर्षवर्धन मानकर, डॉ. निरज लांडे, डॉ. सागर थोटे, प्रा. सचिन सावदे,रितेश मिरजामले, निलेश धाडीकर,डॉ. प्रवीण अग्रवाल,समीर थोडगे, समीर शिरवाडकर, शाम कोल्हाळे, डॉ.संजय तिडके, निलेश देशमुख, मंगेश कराळे, महादेवराव ढाकरे, राजूभाऊ दहापुते, शिवाजी म्हैसने, ॲड. संतोष भोरे, सुदेश काळपांडे, ऋषिकेश चोरे, सौ. ज्योती शीतल वातिले व सौ. अर्चना शर्मा यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

कुंभारीत आरओ प्लांटचे उद्घाटन; नागरिकांना मिळणार शुद्ध पाणी!

■ प्रतिनिधी | अकोला ■

कुंभारी गावातील नागरिकांना शुद्ध व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने अकोला पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कुंभारी ग्रामपंचायतीच्या वतीने कैलास नगर येथे आरओ (ंध) प्लांटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या आरओ प्लांटचे उद्घाटन ८ नोव्हेंबर २०२६ रोजी कुंभारी गावचे माजी सरपंच तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपतालुकाप्रमुख बाळासाहेब अतकरे यांच्या हस्ते करण्यात आले.



या उद्घाटन सोहळ्याला कुंभारी ग्रामपंचायतीचे सदस्य संतोष काकपुरे, गजानन बोरकर तसेच महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त शिक्षक श्रीकृष्ण बिडकर गुरुजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मनोगत व्यक्त करताना बाळासाहेब अतकरे यांनी उपस्थित ग्रामस्थांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच ग्रामपंचायतीच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेल्या आरओ प्लांटचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले. नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होणे ही आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची बाब असून, अशा सुविधांचा योग्य वापर व जतन करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. या उपक्रमामुळे कैलास नगर परिसरातील नागरिकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध होणार असून, ग्रामपंचायतीच्या या लोकाभिमुख उपक्रमाचे ग्रामस्थांकडून स्वागत होत आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३२६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

प्रदूषणमुक्त नव्हे, प्रदूषणाचीच दिवाळी

न्यायालयाच्या सूचनांना नागरिकांची तिलांजली

वर्धेत कोट्यवधींच्या फटाक्यांची आतषबाजी, आकाश धुराने व्यापले पर्यावरणाच्या गप्पा हवेतच विरल्या

वर्धा/रवींद्र लाखे

दिव्यांचा सण, आनंदाचा उत्सव आणि प्रकाशाचा सोहळा म्हणून दिवाळी साजरी केली जाते. मात्र, यंदा वर्धा शहरात दिवाळीच्या नावाखाली पर्यावरणाच्या चिंधड्या उडविण्यात आल्याचे चित्र पाहायला मिळाले. न्यायालयापासून प्रशासनापर्यंत प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याचे वारंवार आवाहन करण्यात आले.जनजागृतीचे संदेश दिले गेले. ध्वनिप्रदूषण आणि वायुप्रदूषण टाळण्याचे सल्ले देण्यात आले. मात्र, या सर्व आवाहनांना केराची टोपली दाखवत वर्धेकरांनी प्रदूषणमुक्त नव्हे, तर प्रदूषणाचीच दिवाळी साजरी केल्याचे वास्तव समोर आले आहे.

दिवाळीच्या रात्री वर्धा शहरातील अनेक भागांत फटाक्यांची प्रचंड आतषबाजी करण्यात आली. कोट्यवधी रुपयांचे फटाके हवेत उडविण्यात आल्याचा अंदाज आहे. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या आतषबाजीमुळे शहरातील आकाश फटाक्यांच्या प्रकाशाने उजळले खरे; मात्र त्याचवेळी धुराचे दाट लोट वातावरणात पसरले. क्षणभराच्या



आनंदासाठी कित्येक तास प्रदूषणाचा विळखा शहरावर पडला.

विशेष म्हणजे, जमिनीवर फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांचे प्रमाण काहीसे कमी झाल्याचे दिसले असले तरी आकाशात उडविल्या जाणाऱ्या फटाक्यांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढल्याचे चित्र होते. आकाशात रंगीबेरंगी रोषणाई करणाऱ्या फटाक्यांच्या आवाजाने शहरातील शांतता भंग झाली.

धूर, आवाज आणि रासायनिक कणांचा मारा मात्र नागरिकांच्या श्वसनावर आणि पर्यावरणावर काय परिणाम करतो, याचा विचार करण्याची तसदी कुणी घेतल्याचे दिसले नाही.

प्रशासनाचे आवाहन केवळ कागदावरच

प्रदूषण नियंत्रणासाठी नियम आहेत, न्यायालयाच्या सूचना आहेत, प्रशासनाची आवाहने आहेत. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत झाली, हा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. फटाक्यांच्या विक्रीवर आणि वापरावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांनी केवळ जनजागृतीवर समाधान मानायचे की नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईही करायची, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आनंदाच्या नावाखाली पुढच्या पिढीचा श्वास हिरावू नका

दिवाळीचा आनंद साजरा करण्यास कुणाचाही विरोध नाही. मात्र, आपल्या आनंदाची किंमत लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि पर्यावरणाने का मोजावी प्रदूषणाचा धूर काही तासांत विरून जाईल, पण त्याचे दुष्परिणाम दीर्घकाळ जाणवू शकतात. दिवाळी प्रकाशाची असावी, धुराची नव्हे, फटाक्यांच्या आवाजात पर्यावरणाचा आक्रोश दडपला जाणार असेल, तर प्रदूषणमुक्त दिवाळीच्या आवाहनांना अर्थ तरी काय? यंदाच्या दिवाळीने वर्धेकरांसमोर हाच गंभीर प्रश्न उभा केला आहे.

दुष्काळाच्या बोंबा हवेतच विरल्या

वर्धा जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर झाला. पावसाने दगा दिल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. पिकांचे नुकसान झाले, कर्जाचा डोंगर कायम आहे आणि आर्थिक संकटाने शेतकरी हवालदिल आहे. दुष्काळाच्या नावाने अनेकांनी बोंबाबोंब केली, मदतीच्या घोषणा केल्या. मात्र, रविवारी दिवाळीच्या फटाक्यांच्या आतषबाजीत झालेली उधळण पाहता या दुष्काळाच्या बोंबा केवळ हवेतच होत्या का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. यंदा पावसाने दगा दिला, मात्र प्रदूषणाचा जोर वाढला. शेतकऱ्यांच्या रिकाम्या खिशाची चिंता करणारा समाज फटाक्यांच्या धुरात पैशांची उधळण करताना दिसला. दुष्काळ केवळ सरकारी कागदावरचा विषय नाही, तर तो शेतकऱ्यांच्या जगण्याचा प्रश्न आहे. ही जाणीव फटाक्यांच्या आवाजात हरवू नये.

गावभेटीत तहसीलदारांनी जाणून घेतल्या समस्या

भारसवाडा येथे ऐश्वर्या गिरी यांचा ग्रामस्थांशी संवाद
पाणीटंचाई, रस्ते, वीज प्रश्नांचा घेतला आढावा

आष्टी शहीद /जनमाध्यम

गावातील मूलभूत सुविधांशी संबंधित समस्या जाणून घेऊन त्यांचे स्थानिक स्तरावर तातडीने निराकरण करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या गावभेट अभियानांतर्गत तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांनी ५ नोव्हेंबर रोजी भारसवाडा ग्रामपंचायतीला भेट दिली. यावेळी त्यांनी ग्रामस्थांशी थेट संवाद साधत गावातील पाणी, वीज, रस्ते यांसह विविध समस्यांचा आढावा घेतला. तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक उपाययोजना तातडीने करण्याच्या सूचना दिल्या.



जिल्हाधिकारी वर्धा यांच्या निर्देशानुसार नागरिकांच्या दैनंदिन अडचणी, पायाभूत सुविधांमधील त्रुटी आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. या भेटीदरम्यान तहसीलदार गिरी यांनी भारसवाडा येथील प्राथमिक शाळा आणि अंगणवाडी केंद्राला भेट देऊन तेथील सुविधा व कामकाजाची पाहणी केली.

गावातील पाणीटंचाईचा प्रश्न लक्षात घेता भारसवाडा व इतर सहा गावांसाठी असलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची पाहणी करण्यात आली. यासोबतच स्थानिक पर्यायी जलस्रोतांचीही तपासणी करून पाणीपुरवठ्याच्या उपलब्धतेचा आढावा घेण्यात आला.

दरम्यान, अजितपूर येथे सुरू असलेल्या कापूस वेचणीच्या कामालाही तहसीलदारांनी भेट दिली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधत रब्बी ज्वारी मिनी किट योजना तसेच व्ही. जी. रामजी अंतर्गत चारा लागवड अनुदान योजनेची माहिती दिली. शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, यासाठी जनजागृतीही करण्यात आली. या गावभेटीदरम्यान ग्राम महसूल अधिकारी सुधीर आठवले, ग्रामपंचायत अधिकारी पी. बी. ताठे, कृषी सहाय्यक प्रणव मोरे, महसूल सेवक शाहरुख खान पठाण यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.त्यामुळे मूलभूत सुविधांच्या समस्यांच्या निराकरणासाठी या अभियानाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत आहे.

शेताच्या वादातून दोघांना मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा

अल्लीपूर - शेतात पाण्याचे पाइप बदलण्याचे काम सुरू असताना शेताच्या वादातून तिघांनी दोघांना मारहाण केल्याची घटना टाकळी शिवारात ७ नोव्हेंबर रोजी दुपारी घडली. याप्रकरणी अल्लीपूर पोलिसांत तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हरीभाऊ गुलाबराव नाले (५८) हे अनिल पवार यांच्यासोबत शेतात पाइप बदलण्यासाठी गेले होते. यावेळी रमेश कवडे, सतीष कवडे व जिजाबाई कवडे तेथे आले. शेतात काम का करता, असा जाब विचारत वाद घातला. रमेशने काठीने हरीभाऊ व अनिल यांच्या डाव्या हातावर प्रहार केला. तर इतर दोघांनी हरीभाऊ यांच्या तोंडावर हाताबुक्क्यांनी मारहाण केली.

डिव्हायडर कटवर कार आडवी आल्याने दुचाकीची धडक; तरुणाचा मृत्यू

तळेगाव-आर्वी मार्गावरील अपघातात मित्र गंभीर जखमी

तळेगाव (शा.पं.)/जनमाध्यम

तळेगाव-आर्वी मार्गावरील गुरुद्वारासमोरील डिव्हायडर कटजवळ कारचालकाच्या कथित निष्काळजीपणामुळे झालेल्या अपघातात दुचाकीवरील २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला, तर त्याचा मित्र जखमी झाला. मिलिंद मनोहर भांगे असे मृत तरुणाचे नाव असून निशिकांत संजय चोपडे (वय २१) असे जखमी मित्राचे नाव आहे. या प्रकरणी तब्बल २१ दिवसांनंतर तळेगाव पोलिसांनी पांढऱ्या रंगाच्या टाटा नेक्सॉन ईव्ही कारच्या अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास मिलिंद भांगे आणि त्याचा मित्र निशिकांत चोपडे हे नवरात्र घटपूजेसाठी लागणारे साहित्य व भाजीपाला खरेदी करण्यासाठी निशिकांतच्या होंडा ड्रीम युगा दुचाकीने आर्वी येथे गेले होते. खरेदी आटोपून दोघेही तळेगावकडे परत येत असताना सकाळी ११.४५ वाजताच्या सुमारास गुरुद्वारासमोरील डिव्हायडर कटजवळ अपघात झाला.

अपघातानंतर दोन्ही जखमींना उपजिल्हा रुग्णालय, आर्वी येथे नेण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी त्यांना अमरावती येथील रेडियंट हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. उपचार सुरू असताना १८ ऑक्टोबर रोजी रात्री ११.१० वाजता मिलिंदचा मृत्यू झाला. तर निशिकांतच्या कपाळावर, उजव्या हाताच्या बोटाला आणि डाव्या हाताला दुखापत झाली होती. उपचारानंतर १९ ऑक्टोबर रोजी त्याला रुग्णालयातून सुटी देण्यात आली. अपघातानंतर नातेवाइकांनी पोलिसांत तक्रार देण्यासाठी संपर्क साधला असता अमरावती येथून आवश्यक कागदपत्रे प्राप्त झालेली नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. ५ नोव्हेंबर रोजी कागदपत्रे प्राप्त झाल्याची माहिती मिळाली. मात्र, मृताच्या कुटुंबातील आजारपणामुळे तक्रारदाराला तत्काळ पोलीस ठाण्यात जाता आले नाही. अखेर ७ नोव्हेंबर रोजी तक्रार दाखल करण्यात आली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

कारंजा (घा.) - घरात खुर्चीवर बसलेले असताना अचानक छातीत दुखू लागल्याने खाली कोसळलेल्या व्यक्तीचा मृत्यू झाला. शंकर संतोष बारंगे (वय ५७, रा. सावळी खुर्द, ता. कारंजा घाडगे) असे मृताचे नाव आहे. हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास शंकर बारंगे हे घरी खुर्चीवर बसले होते. यावेळी अचानक त्यांच्या छातीत दुखू लागले. त्यांनी छाती पकडली आणि खुर्चीवरून खाली कोसळले. कुटुंबीयांनी तातडीने गावातील नातेवाइकांच्या वाहनाने त्यांना ग्रामीण रुग्णालय, कारंजा येथे नेले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.मृत शंकर बारंगे यांचा मुलगा सावळी खुर्द फाट्यावर झुणका-भाकरचे दुकान चालवितो. या घटनेने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृत्यूबाबत कुटुंबीयांनी कोणताही संशय व्यक्त केलेला नाही. कारंजा पोलिसांनी मर्ग दाखल करून पुढील चौकशी सुरू केली आहे.

शेतातील पाण्यावरून संघर्ष

अल्लीपूर- शेतात नदीचे पाणी घेण्यासाठी विद्युत पुरवठा का करू देत नाही, या कारणावरून झालेल्या वादात एकाच कुटुंबातील तिघांना मारहाण करण्यात आली. रमेश नारायण कवडे (६५) हे पत्नी जिजाबाई यांच्यासोबत शेतात काम करीत होते. दुपारी हरीभाऊ नाले, अनिल पवार, राम नाले व कार्तिक नाले हे चौघे त्यांच्या शेतात आले.

कर्जमाफी दोन लाखांची, खात्यात मात्र ५० हजार

शेतकरी संभ्रमात; बँकांकडूनही समाधानकारक उत्तरे नाहीत

साहूर/जनमाध्यम

दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची घोषणा, मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहेत अवघे ५० ते ७० हजार रुपये! शासनाच्या घोषणेतील आणि प्रत्यक्ष लाभातील या तफावतीमुळे साहूर व परिसरातील शेतकरी संभ्रमात पडले असून त्यांचा संताप वाढत आहे. कर्जमाफीची रक्कम नेमकी कोणत्या निकषांवर निश्चित करण्यात आली,उर्वरित रक्कम का मिळाली नाही, याची स्पष्ट माहिती बँकांकडूनही मिळत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची घोषणा करण्यात आली. मात्र साहूर परिसरातील अनेक अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक कर्ज असतानाही त्यांच्या खात्यात केवळ ५० ते ५५ हजारांपासून ७० हजार रुपयांपर्यंतच रक्कम जमा झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे दोन लाखांच्या कर्जमाफीचे नेमके गणित काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कर्जमाफीची रक्कम कमी का मिळाली, कर्जाच्या कोणत्या रकमेचा विचार करण्यात आला आणि त्यासाठी कोणते निकष लावण्यात आले, याबाबत बँकांनी स्पष्ट खुलासा करावा, अशी मागणी शेतकरी करीत आहेत. दुसरीकडे सप्टेंबर २०२५ मध्ये पीककर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ मिळेल, अशी घोषणा करण्यात आली होती. मात्र जाहीर झालेल्या यादीत अनेक शेतकऱ्यांची नावे नसल्याने या घोषणेची अंमलबजावणी नेमकी कशी झाली, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे ज्या शेतकऱ्यांची कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, त्यांनाही अद्याप नवीन पीककर्ज मिळालेले नाही. खरीप हंगामासाठी घेतलेल्या कर्जाच्या नूतनीकरणाचा प्रश्न कायम असताना नवीन कर्जवाटप कधी सुरू होणार, असा सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत. शेतीचा वाढता खर्च, बियाणे, खते आणि मशागतीसाठी लागणारा पैसा यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

खात्यात अपेक्षेपेक्षा कमी रक्कम जमा झालेल्या शेतकऱ्यांच्या प्रकरणांची तपासणी करून बँकांनी लेखी खुलासा द्यावा. कर्जमाफीच्या यादीतून वगळलेल्या शेतकऱ्यांना अपात्रतेची कारणे कळवावीत. पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळण्यासाठी तक्रार निवारण प्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणी होत आहे.

दोन लाख रुपयांपर्यंत सरसकट कर्जमाफीचे आश्वासन देऊन प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या पदरी अत्यल्प रक्कम पडत असेल, तर या योजनेचा उपयोग काय, असा संतप्त सवाल शेतकरी करीत आहेत. शासनाने घोषणेप्रमाणे पात्र शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देऊन तातडीने नवीन पीककर्ज वाटप सुरू करावे. अन्यथा आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये शासनाला याची किंमत मोजावी लागेल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.







जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३४२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

बालप्रतिभेच्या सुरेल आविष्काराने रंगली दिवाळी पहाट

गायन, वादन आणि नृत्याच्या त्रिवेणी संगमाने रसिक मंत्रमुग्ध



नागपूर/प्रतिनिधी:- दिवाळीचा आनंद, पहाटेची प्रसन्नता आणि संगीताचा सुरेल आविष्कार यांचा सुंदर संगम नागपूरकरांना अनुभवायला मिळाला. बाल रंगभूमी परिषद, नागपूर शाखा, यशवंतराव चव्हाण जिल्हा केंद्र आणि विष्णूजी की रसोई यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळीनिमित्त पंधरा वर्षांखालील बालकलावंतांसाठी एका विशेष 'दिवाळी पहाट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

बजाज नगर येथील विष्णूजी की रसोई येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात बालकलाकारांनी आपल्या गायन, वादन आणि नृत्यकलेतून उपस्थित रसिकांची मने जिंकली.

या विशेष दिवाळी पहाटेचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण कार्यक्रमाची धुरा बालकलावंतांनी समर्थपणे सांभाळली. सायली राऊत, ध्रुवी रायटर, ईतिशा पाठे, श्रावणी पिसे, वरा सदाचार, श्रीराम सदाचार, धनश्री खापरे, लावण्या शंभरकर, आरोह सरोदे, अपूर्वा नामदेव, ईश्वरी पांडे, केशरी लांडे आणि सौख्या गडेकर या बालगायकांनी विविध संगीत प्रकारांची सुरेल मेजवानी सादर केली. अभंग, गौळण, लोकगीते, भावगीते, भजने, समरगीते तसेच लोकप्रिय चित्रपट गीतांच्या सादरीकरणातून या बालकलाकारांनी आपल्या गायन कौशल्याची प्रभावी झलक दाखवली. प्रत्येक सादरीकरणाला रसिकांकडून उत्स्फूर्त दाद मिळत होती.

या कार्यक्रमात जीविका येंडे हिने सादर केलेल्या अप्रतिम गोंधळ नृत्याने विशेष रंगत आणली. पारंपरिक लोककलेचा आविष्कार, आकर्षक नृत्यशैली आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण यामुळे तिने उपस्थितांची वाहवा मिळवली.

कौमुदी साल्पेकर हिने आपल्या गोड आवाजात आणि ओघवत्या भाषाशैलीत कार्यक्रमाचे सुरेख व श्रवणीय सूत्रसंचालन केले. तिच्या प्रभावी निवेदनामुळे कार्यक्रमातील प्रत्येक सादरीकरणाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली. बालकलाकारांच्या सादरीकरणाला समर्थ संगीतसाथ लाभली. श्रीकांत पिसे (कीबोर्ड), प्रमोद बावणे (तबला), अक्षत जाधव (हार्मोनियम) आणि पंकज डांगरे (ऑक्टोपॅड) यांनी उत्कृष्ट साथसंगत करून कार्यक्रमात रंगत निर्माण केली. संपूर्ण कार्यक्रमाचे संगीत संयोजन श्रीकांत पिसे यांनी केले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवर महेश बंग, रवींद्र देशमुख, अनिल इंदाने, निलेश खांडेकर, शशिकांत मोहिते, शाम आस्करकर आणि नरेश गडेकर यांच्या हस्ते नटराज पूजन करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांच्या छायाचित्राला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सहभागी सर्व बालकलावंतांना पुरस्कार आणि मिठाई देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी नागपूरची शान ठरलेल्या प्रथमेश राऊत आणि चिन्मयी मोरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. बालकलाकारांच्या या दिवाळी पहाटला नागपूरकर रसिकांचा मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे मुख्य संयोजन सुशील सरोदे यांनी केले. वैदेही चवरे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अभिषेक बेलारवार, अमोल निंबार्ते, अर्चना श्रावणे, रोशन नंदवंशी, रूपाली कोंडेवार, कल्याणी देव, किशोर डाऊ, डॉ. रवींद्र भुसारी, नितीन पात्रीकर, मिथुन हटवार आदींनी विशेष परिश्रम घेतले.

बालप्रतिभेला व्यासपीठ, कलेला प्रोत्साहन आणि दिवाळीच्या मंगलमय वातावरणात संगीताचा आनंद देणारी ही दिवाळी पहाट नागपूरकर रसिकांसाठी एक अविस्मरणीय सांस्कृतिक पर्वणी ठरली.

गोकुळ दूध संघातील लोकशाही कौल डावलण्याचा प्रयत्न रोखा!

अचलपूर तहसीलदारांना काँग्रेसचे निवेदन



अचलपूर/प्रतिनिधी:- कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या निवडणुकीत काँग्रेस नेते आमदार सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने २५ पैकी १३ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळविले. मात्र, शासननियुक्त सदस्यांना मतदानाचा अधिकार देऊन निवडून आलेल्या संचालक मंडळाचे सत्तासमीकरण बदलण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करीत अचलपूर तालुका काँग्रेसच्या वतीने तहसीलदा सुदर्शन शहारे यांना निवेदन देण्यात आले.

दूध उत्पादक मतदारांनी दिलेला लोकशाही कौल डावलून शासनाच्या माध्यमातून सत्तेचे गणित बदलणे हा निवडणूक प्रक्रियेचा अवमान असल्याची भूमिका काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी मांडली. शासननियुक्त पाच सदस्यांपैकी चार सदस्यांना मतदानाचा अधिकार देण्याचा निर्णय सहकार क्षेत्रातील लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचविणारा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गोकुळ दूध संघ हा साडेपाच लाख दूध उत्पादक शेतकरी आणि हजारो दूध उत्पादक संस्थांच्या आर्थिक हिताशी निगडित आहे. त्यामुळे संघाचे नेतृत्व ठरविण्याचा अधिकार निवडून आलेल्या संचालक मंडळालाच असावा. शासनाने राजकीय हस्तक्षेप करून लोकशाही कौल बदलण्याचा प्रयत्न करू नये, अशी मागणी करण्यात आली.शासननियुक्त सदस्यांचा मतदानाचा अधिकार रद्द करावा, निवडून आलेल्या संचालकांच्या माध्यमातून अध्यक्षपदाची निवडणूक पारदर्शक पद्धतीने पार पाडावी आणि सहकार क्षेत्रातील स्वायत्तता अबाधित ठेवावी, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

यावेळी नामदेवराव तनपुरे, अध्यक्ष तालुका काँग्रेस कमिटी,अचलपूर अध्यक्ष श्रीकांत झोडपे,राहुल गवई, अध्यक्ष परतवाडा शहर काँग्रेस, सचिदानंद बेलसरे, अध्यक्ष सेवादल काँग्रेस, राहुल गाठे, अध्यक्ष अनुसूचित जाती विभाग अचलपूर आणि विशाल खानझोडे, अध्यक्ष सोशल मीडिया विभाग,युवक काँग्रेस अध्यक्ष प्रशांत गोरले,नगरसेवक गुड्डूभाई, प्रवीण हूड, भास्करराव चौधरी, गजानन टापरे, शकुंतला वजाळे, गौरव जाधव उपस्थित होते.

शहानूर मध्यम प्रकल्प परिसरात रब्बी हंगामासाठी पाणी सोडणे अशक्य

- धरणातील उपयुक्त पाणीसाठा घटला

अमरावती/प्रतिनिधी:- शहानूर मध्यम प्रकल्पामध्ये यंदाच्या रब्बी हंगामासाठी पाणी सोडणे अशक्य असल्याचे जलसंपदा विभागाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. यावर्षी पडलेला अपुरा पाऊस आणि अल-निनो तसेच आयओडी (इंडियन ओशीयन डायपोल) च्या प्रभावामुळे धरणातील उपयुक्त पाणीसाठा घटला आहे. शहानूर धरण क्षेत्रात पाणीसाठा शिल्लक नसल्यामुळे यंदा रब्बी हंगाम २०२६-२७ राबविणे शक्य होणार नसून उपलब्ध पाणी केवळ पिण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आल्याचे अचलपूर मध्यम व लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. गु. उमप यांनी कळविले आहे.



अचलपूर मध्यम व लघुपाटबंधारे विभागाने जाहीर प्रकटनानुसार शहानूर धरणाची सद्यस्थिती आणि पाणी नियोजनाची माहिती कळविली आहे. त्यानुसार ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत धरणात एकूण ३४.०९ दश लक्ष घनमिटर (दलघमी) म्हणजेच ७४.०५ टक्के उपयुक्त पाणीसाठा असून वार्षिक सरासरी बाष्पीभवनाप्रमाणे यातील ५.५० दलघमी पाणीसाठा कमी होणार आहे.

धरण परीक्षेत्रातील नगरपरिषदा, ग्रामपंचायती आणि शासनाच्या अन्य पाणीपुरवठा योजनांसाठी २३.२८ दलघमी पिण्याचे पाणी आरक्षित करण्यात आले आहे. तर शासकीय निर्णयाच्या अधीन राहून ३.५० दलघमी म्हणजेच १० टक्के पाणी हे आकस्मीक राखीव साठा म्हणून ठेवण्यात आले आहे. गुरे-जनावरांसाठी १.७५ म्हणजेच ५ टक्के पाण्याचा राखीव साठा ठेवण्यात आला असल्याने शेतीच्या रब्बी हंगामासाठी धरणात पाणी शिल्लक नसल्याचे अचलपूर मध्यम व लघुपाटबंधारे विभागाद्वारे कळविण्यात आले आहे.

शासकीय आदेशानुसार, भविष्यात प्रत्यक्षात पाऊस पडून धरणात उपलब्ध होणाऱ्या पाणी साठयातून प्रथम पिण्यासाठी, वीज निर्मितीसाठी व औद्योगिक वापरासाठी पाणी आरक्षित करण्यात येणार आहे.

त्यानंतर उपलब्धता लक्षात घेऊन सिंचनासाठी पाणी सोडण्यात येईल.जलसंपदा विभागाने पाणी वापर संस्था, लाभधारक आणि नागरिकांना पाणी सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत.

पाणी ही राष्ट्रीय संपत्ती समजून प्रत्येकाने त्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा, धरणातून किंवा कालव्यातून पाण्याचा अनधिकृत वापर केल्यास 'महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६' मधील तरतुदींनुसार कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असे कळविण्यात आले आहे.

'एक दिवा वंचितांसाठी'

भाजपचा 'पालावरची दिवाळी' उपक्रम

-धामणा येथील पारधी समाजबांधवांसोबत दिवाळीचा आनंद



खल्लार/प्रतिनिधी:- समाजातील वंचित व दुर्लक्षित घटकांनाही दिवाळीचा आनंद घेता यावा, या सामाजिक बांधिलकीतून भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने 'एक दिवा वंचितांसाठी' या संकल्पनेतून 'पालावरची दिवाळी २६' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत भाजप दर्यापूर-अंजनगाव विधानसभा मतदारसंघाच्या वतीने तोंगलाबादजवळील धामणा येथील पारधी वस्तीवर जाऊन पारधी समाजबांधवांसोबत दिवाळीचा सण साजरा करण्यात आला.

यावेळी वस्तीवरील महिला, पुरुष आणि लहान मुलांना दिवाळीचा फराळ वाटप करण्यात आला. तसेच मुलांना फराळ देत त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न करण्यात आला. कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा अमरावती जिल्हा परिषदेचे माजी आरोग्य सभापती बाळासाहेब हिंगणीकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून पारधी वस्तीवरील बांधवांना कापडांचे व फराळाचे वाटप करण्यात आले. वंचित समाजबांधवांच्या सहवासात त्यांचा जन्मदिवस साजरा करून सामाजिक बांधिलकीचा अनोखा संदेश यावेळी देण्यात आला.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सणाचा आनंद पोहोचविणे, वंचित बांधवांशी आपुलकीचे नाते निर्माण करणे आणि सामाजिक समरसतेची भावना अधिक दृढ करणे हा आहे.

याप्रसंगी भाजपचे जिल्हा महामंत्री बाबाराव पाटील बरवट, गोपाल चंदन, मदनराव बाविस्कर, माणिकराव मानकर, नितीन बापू देशमुख, मंडळ अध्यक्ष स्वप्निल गावंडे, रावसाहेब पवार, रावसाहेब गावंडे, बिजवाडे, उमेश गावंड, विजय मोंढे,अनिल कुंडलवाल,अनिल बोंडे, मेघा भारती, तृप्ती राऊत,अपर्णा मुळे, सुषमा पाचडे, मंगेश पाटील गावंडे,दत्ता शेवाळे परिसरातील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी पारधी समाजातील महिला, पुरुष व लहान मुलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. वंचितांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारी दिवाळी आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा हा उपक्रम परिसरात चर्चेचा विषय ठरला.

CHANGE IN NAME

My old name was salma Tabassum "My NEW NAME IS SALMA PARVEEN MOHAMMAD SOHEL "FROM AMRAVATI 444601

जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.५११/२०२६ ने.ता.२६.११.२०२६

अर्जदार : १. **साबेराबी शेख शब्बर,** वय ७४ वर्षे, व्यवसाय- घरकाम
२. **जुबेर जकी मोहम्मद शब्बर,** वय ५० वर्षे, व्यवसाय- मजुरी
३. **सोहेब जकी शेख शब्बर,** वय ४२ वर्षे, व्यवसाय- मजुरी
४. **मुसअब जकी शेख शब्बर,** वय ३६ वर्षे, व्यवसाय- मजुरी
५. **खुबैब जकी शेख शब्बर,** वय ३१ वर्षे,व्यवसाय- मजुरी
रा.मस्जीदपूरा, करजंगाव, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात.**मृतक शेख शब्बार अब्दूल अजिज** यांचा **मृत्यू दि.२४/०६/२०२६** रोजी रा.करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५११/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.३०.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

जाहीरनामा/सायटेशन नोटीस

एस.एस.भिंगारदेव, ७ वे न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. जि.अमरावती यांच्या न्यायालयात (कोर्ट नं.०७)

कि.कि.अर्ज क्रमांक १२८५/२०२६

अर्जदार : अश्विनी श्रीराम अर्डक
(अश्विनी साहेबराव राजुरकर लग्नापुवीचे नांव)
वय ४१ वर्षे,
रा.शिरजगांव अर्डक, ता.चांदूर बाजार, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार: मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
ग्रामपंचायत बोडणा-परसोडा, ता. जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०१ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३)(अ) प्रमाणे यातील अर्जदार **नामे अश्विनी श्रीराम अर्डक** स्वतः यांचा जन्म दिनांक **१२.०६.१९८५** रोजी झाला आहे. अशी नोंद करण्याचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०७ यांनी आपले म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०७ योग्य तो हुकूम काढतील याची नोंद घ्यावी.

शिक्का
स्वाक्षरी/-
०७ वे सह दिवाणी न्यायालय,
कनिष्ठ स्तर, अमरावती

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.५५२/२०२६ ने.ता.१०.१२.२०२६

अर्जदार : १. **इंदू तुळशिराम कुरवाळे,** वय ४३ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.वासेवाडी, पो.निंबा, ता.भातकुली, जि.अमरावती
२. **रेनाबाई ज्ञानेश्वर भानगे (मृतक) तर्फे वारस**
२अ) **मिरा जानराव पारिसे,** वय ४० वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.वाढोणा, ता.अचलपूर, जि.अमरावती
२ब) **मुरलीधर ज्ञानेश्वर भानगे,** वय ३८ वर्षे, व्यवसाय- मजुरी
रा.सावळापुर, ता.अचलपूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : १. **प्रल्हादराव महादेवराव अमझरे,** वय ४६ वर्षे, व्यवसाय- शेती
२. **भास्कर महादेवराव अमझरे,** वय ४४ वर्षे, व्यवसाय- शेती
दोन्ही रा.टाकरखेडा पूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार व गैरअर्जदार वरील ठिकाणी राहतात.**मय्यत महादेव नागोराव आमझरे** यांचा **मृत्यू दि.१३/०३/१९९१** रोजी तसेच **मृतक कासाबाई महादेव आमझरे** हिचा मृत्यू **दि.०५/१२/२०२२** रोजी रा.टाकरखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.तसेच **मृतक रेनाबाई ज्ञानेश्वरराव भानगे** यांचा मृत्यू **दि.१८/६/२००६** रोजी रा.सावळापुर, ता.अचलपूर, जि.अमरावती येथे झालेला आहे.त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार व गैरअर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार व गैरअर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार व गैरअर्जदारांला मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५५२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.०२.११.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

-सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.६८७/२०२६ ने.ता.२०.११.२०२६

अर्जदार - १. श्री शरदसिंग मारोतीसिंग चव्हाण, **वय ८८ वर्षे, धंदा - घरकाम**
२. शितलसिंग शरदसिंग चव्हाण, **वय ५५ वर्षे, धंदा - कंत्राटदार**
दोन्ही अर्जदार रा.निंभार्णी, राजुरवाडी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. शिल्पा दिनेशसिंग कचवे, **वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम**
रा.साईबाबा स्कूल जवळ, उदय कॉलनी, अमरावती, जि.अमरावती
३. स्वाती निलेशसिंग येवतीकर, **वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम**
रा.नवाबपुर, नेर, ता.नेर, जि.यवतमाळ

-- विरुध्द --
निरंक

वरील अर्जदाराने वि.दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार क्र.१ ची पत्नी, तर अर्जदार क्र.२ ते ४ ची आई नामे मिना शरदसिंग चव्हाण **यांचा** दि.२१/०६/२०२६ **रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मृत्यू झाला.तसेच अर्जदार यांची आई ब-याच वर्षापूवी मयत झालेल्या आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशिर वारस आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

दिनांक ०७.११.२०२६

शिक्का
आदेशान्वये,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय (क.स्तर),मोर्शी

जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.५४३/२०२६ ने.ता.१७.११.२०२६

अर्जदार : १. **सैय्यद इब्राहीम सैय्यद रहेमान,** वय ७३ वर्षे, व्यवसाय - निरंक
२. **सैय्यद इसा सैय्यद रहेमान,** वय ७१ वर्षे, व्यवसाय - मजुरी
३. **सैय्यद मुसा सैय्यद रहेमान,** वय ४७ वर्षे, व्यवसाय - मजूरी
सर्व रा.घाटलाडकी, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
४. **कुरेशा बी सय्यद इब्राहीम,** वय ५३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.अतारपुरा शिराळा, ता.जि.अमरावती
५. **नुरजहॉ बी शेख इब्राहीम,** वय ७४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.हलवाईपुरा रिध्दपुर, ता.मोर्शी, जि.अमरावती
६. **आशा बी शेख हुसेन (मय्यत)**
६अ) अब्दुल रशिद शेख हुसेन, वय ५० वर्षे, व्यवसाय - शेती
६ब) अब्दुल सलाम शेख हुसेन, वय ५४ वर्षे, व्यवसाय - शेती
६क) जुलेखाबी शेख हुसेन, वय ४८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
अर्जदार क्र.६अ) ते ६क) रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती
७.साहेब बी शेख रहिम (मय्यत)
७ अ) सायरा बानो अब्दुल आदीम, वय ३६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती
७ ब) यासिन बानो शेख कलीम, वय ३२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
७ क) शेख रफीक शेख रहिम, वय ४० वर्षे, व्यवसाय - मजूरी
७ ड) शेख दुलु शेख रहीम, वय ३८ वर्षे, व्यवसाय - मजूरी
अर्जदार क्र.७ क) व ड) रा.करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : **१. सैय्यद ईस्माईल शेख रहेमान,** वय ५५ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार व गैरअर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मय्यत स.रहेमान स.मन्नु** यांचा **मृत्यू दि.०२/०९/१९९७** रोजी तसेच **मृतक जोहराबी सैय्यद रहेमान** यांचा **मृत्यू दि.१०/०५/१९९८** रोजी रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार व गैरअर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार व गैरअर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार व गैरअर्जदाराला मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५४३/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.३०.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५४६/२०२६ ने.ता.०५.१२.२०२६

अर्जदार : १. सुनिता नंदू उर्फ नंदकुमार देशमुख, वय ६१ धंदा - घरकाम
२. प्रसाविका नंदू उर्फ नंदकुमार देशमुख, वय ३५ धंदा - घरकाम
३. संपदा नंदू उर्फ नंदकुमार देशमुख, वय ३१ धंदा - शिक्षण
सर्व रा.गुलाबराव महाराज नगर, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत नंदू उर्फ नंदकुमार देशमुख** यांचा मृत्यू दिनांक **२९.०८.२०२५** रोजी रा.शिरजगांव बंड, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५४६/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०२.११.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१९७/२०२६
वंदना व एक -वि- निरंक
पुढील ता.२४.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : १. वंदना विनायकराव गाढवे, वय ४७ वर्षे, धंदा - गृहिणी
रा.पांडे प्लॉट भिवापूर नगर, हनुमान मंदिरासमोर, अमरावती
२. निरज विनायक गाढवे, वय २४ वर्षे, धंदा - शिक्षण
रा.प्लॉट नं.२४, गोपालकृष्ण कॉलनी, रिंग रोड, रहाटगांव, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **विनायक सितारामजी गाढवे** हे दिनांक 20.08.2026 रोजी **मुंबई** येथे मयत झाले. अर्जदार **वंदना विनायकराव गाढवे अधिक एक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वंदना विनायकराव गाढवे अधिक एक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५०७/२०२६ ने.ता.२६.११.२०२६

अर्जदार : १. **नर्मदा वासुदेव पावडे, वय ७६ धंदा - घरकाम**
२. **प्रविण वासुदेव पावडे, वय ५६ धंदा - मजुरी**
३. **प्रदीप वासुदेव पावडे, वय ४७ धंदा - मजुरी**
अर्जदार नं.१ ते ३ रा.बेलोरा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
४. **सुनिता विलास घुरडे, वय ३९ धंदा - घरकाम**
रा.वार्ड नं.३, शेंदुरजना बु., पो.शेंदुरजना बाजार, ता.तिवसा, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. मयत वासुदेवराव संभाजी पावडे **यांचा मृत्यू दिनांक** १०.०९.२०२६ **रोजी रा.बेलोरा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी.क्र.५०७/२०२६ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.३१.१०.२०२६ **रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का
आदेशानुसार,
.डी.बी.गुल्हाने
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ६७
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

सरकारी धोरणे उठली शेतकऱ्यांच्या मुळावर

दरवर्षी ४६.९ अब्ज डॉलर्सचे नुकसान; 'ओईसीडी'चा अहवाल

पॅरिस - सरकारी धोरणांमुळे भारतातील शेतकऱ्यांचे दरवर्षी सरासरी ४६.९ अब्ज डॉलर्सचे नुकसान होत आहे. २०२३ ते २०२५ या काळातील ही सरासरी आहे. हे नुकसान शेतकऱ्यांच्या एकूण उत्पन्नाच्या ९.२ टक्के आहे. देशांतर्गत बाजार नियमन आणि निर्यातबंदी सारख्या व्यापार धोरणांमुळे शेतीमालाचे भाव जागतिक भावांपेक्षा खाली राहतात. खत, वीज आणि पाण्यावरचे अनुदान मिळूनही हा तोटा भरून निघत नाही, असे एका आंतरराष्ट्रीय अहवालात म्हटले आहे.


ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को-ऑपरेशन अँड डेव्हलपमेंट (ओईसीडी) या संस्थेने २ नोव्हेंबर रोजी 'ॲग्रिकल्चरल पॉलिसी मॉनिटरिंग अँड इव्हॅल्युएशन २०२६' हा अहवाल प्रसिद्ध केला. यामध्ये भारतासह ५६ देशांच्या कृषी धोरणांचा आढावा घेतला आहे. सरकारी धोरणांमुळे शेतीमालाचे भाव दाबले जातात आणि अनुदान मिळूनही शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागतो. असा सर्वाधिक तोटा होणाऱ्या मोजक्या देशांत भारताचा समावेश होतो. भारतात गेल्या वीस वर्षांपासून शेतकऱ्यांना धोरणांचा फायदा कमी आणि तोटा जास्त होत आहे.



ज्या शेतीमालाचे भाव धोरणांमुळे दाबले जातात, त्यांच्या बाबतीत शेतकऱ्यांचे नुकसान उत्पन्नाच्या २३.४ टक्क्यांपर्यंत गेले. ज्या शेतीमालाला भावाचा आधार मिळतो, तिथे हा फायदा फक्त ३.५ टक्के होता. २०२३ ते २०२५ या काळात तांदूळ, गहू, साखर, कांदा आणि गव्हाचे पीठ यांच्या निर्यातीवर निर्बंध होते. गहू, मका, साखर, पोल्ट्री मांस आणि अंडी यांच्या उत्पादकांना मात्र फायदा झाला.

शेतकऱ्यांना सरकारी तिजोरीतून मिळणारी मदत त्यांच्या उत्पन्नाच्या १०.७ टक्के आहे. यातील बहुतेक रक्कम खत, वीज आणि सिंचनाच्या पाण्यावरील अनुदानात जाते.

२०२५ मध्ये काही निर्यात निबंध शिथिल झाले. 'डीओआरबी'वरील निर्यातबंदी पूर्णपणे उठवण्यात आली. खाद्यतेलांवरील आयात शुल्क कमी



वर्ष	अब्ज डॉलर्स	उत्पन्नाच्या टक्क्यांत
२०२३	५७.६	१०.२
२०२४	५३.१	१०.६
२०२५	३६.२	७.१

झाले आणि कापसावरील शुल्क तात्पुरते हटवले गेले. दुसरीकडे देशातील कडधान्य उत्पादकांच्या हितासाठी पिवळ्या वाटाण्यावरील आयात शुल्क वाढवण्यात आले.

तांदूळ, गहू, साखर आणि कांद्यावर वेळोवेळी अचानक निर्यातबंदी लादू नये, अशी शिफारस संस्थेने केली आहे. खत, वीज आणि पाण्यावरील अनुदान हळूहळू कमी करावे, असेही सुचवले आहे. त्यातून वाचणारा पैसा ग्रामीण पायाभूत सुविधा, शिक्षण, डिजिटल कौशल्ये आणि शेतीतील जोखीम कमी करण्यासाठी वापरावा. ई-नाम आणि २०१७ चा मॉडेल बाजार कायदा सर्व राज्यांत सारख्या पद्धतीने लागू करावा, असेही अहवालात म्हटले आहे.

जगभरात शेतीला मिळणारा एकूण सरकारी आधार २०२५ मध्ये ९५० अब्ज डॉलर्सच्या पुढे गेला. हा आतापर्यंतचा उच्चांक आहे. ही रक्कम २०२३ च्या तुलनेत १२१ अब्ज डॉलर्सने म्हणजे जवळपास १५ टक्क्यांनी जास्त आहे.

झेंडूच्या फुलांना विक्रमी भाव!

अंजनगाव बारी/ वार्ताहर

अमरावती मार्केटमध्ये झेंडूच्या फुलांना २० ते ४० रुपये प्रतिकिलो दर मिळत असताना अंजनगाव बारी येथील स्वामी विवेकानंद मार्केटमध्ये मात्र झेंडूच्या फुलांना ५० ते ८० रुपये प्रतिकिलो असा चढा भाव मिळत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. दि. ६ व ७ नोव्हेंबर रोजी झालेल्या या दरवाढीमुळे सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशाला चांगलीच कात्री लागत आहे.

विशेष म्हणजे, दसऱ्यासारख्या महत्त्वाच्या सणाच्या काळात झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असतानाही शेतकऱ्यांना अवघा १० ते २० रुपये प्रतिकिलो दर मिळाला होता.

अपेक्षित भाव न मिळाल्याने अनेक शेतकऱ्यांना आपली फुले कवडीमोल दराने विकावी लागली, तर दुसऱ्याच दिवशी रस्त्यावर झेंडूच्या फुलांचे ढीग पडल्याचे चित्र दिसून आले. मात्र त्याच फुलांना आता ५० ते ८० रुपये प्रतिकिलो दर मिळत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. एकीकडे शेतकऱ्यांच्या फुलांना सणासुदीच्या काळात योग्य भाव मिळत नाही, तर दुसरीकडे खासगी विक्रेत्यांकडून



५० ते ८० रुपये प्रतिकिलो दराने विक्री; सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री

ग्राहकांना चढ्या दराने फुलांची विक्री केली जात असल्याची चर्चा आहे. शेतकऱ्यांच्या मेहनतीचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना मिळतोय की ग्राहकांच्या खिशातून होणाऱ्या अतिरिक्त वसुलीचा फायदा खासगी विक्रेत्यांना मिळतोय, असा सवाल उपस्थित होत आहे.

शेतकऱ्यांना कवडीमोल भाव आणि ग्राहकांना चढ्या दराचा फटका; झेंडूच्या फुलांच्या बाजारभावातील या तफावतीमागचे नेमके गौडबंगाल काय? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

मेळघाटात 'साद' संस्थेचा अभिनव व कौतुकास्पद उपक्रम

'उबदार स्पर्श' अभियानांतर्गत ४५० आदिवासी विद्यार्थ्यांना स्वेटरचे वाटप

चिखलदरा/ वार्ताहर

मेळघाटातील थंडीत आदिवासी व वंचित विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळावा, यासाठी चिखलदरा येथील 'साद' सोशल अवेयरनेस अँड आदिवासी डेव्हलपमेंट' या सामाजिक संस्थेच्या वतीने नुकताच 'उबदार स्पर्श' (स्वेटर वाटप २०२६) हा अत्यंत स्तुत्य उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. पूर्णपणे समाजशक्ती आणि लोकसहभागातून चालवल्या जाणाऱ्या या अभियानांतर्गत यंदा धारणी व चिखलदरा तालुक्यातील ४ शाळा व वसतिगृहांमधील तब्बल ४५० गरजू विद्यार्थ्यांना नवीन स्वेटरचे वाटप करण्यात आले.

अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा येथे २००९ पासून कार्यरत असलेली 'साद चिखलदरा' ही संस्था मेळघाटातील आदिवासी आणि ग्रामीण समुदायांच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी सातत्याने कटिबद्ध आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रवींद्रजी कडू यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त मेळघाटातील



आदिवासीबहुल विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य देण्याच्या कार्याची एकट्याने सुरुवात केली होती. त्यांच्या या सामाजिक प्रेरणेतून आज अनेक नागरिक आणि दानशूर व्यक्ती 'साद'च्या माध्यमातून जोडल्या गेल्या आहेत. या माध्यमातून दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, रेनकोट आणि उबदार कपड्यांचे वाटप केले जाते.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. रवींद्र कडू यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्वेटर वाटपाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. हरगोविंद छात्रालय, धारणी: येथील ४१ विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप करण्यात आले. याप्रसंगी वसतिगृह प्रमुख डॉ. सुनीलजी कतले, शेडलाजी, संस्थेचे सचिव भागवत आणि धारणीचे ज्येष्ठ पत्रकार रवीजी नवलाखे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांच्या स्वागतप्रसंगी सादर केलेले 'राम स्तवन' उपस्थित सर्वांचे विशेष आकर्षण ठरले.

जि.प. पूर्व माध्यमिक शाळा, टोळी: येथील ८१ विद्यार्थ्यांना स्वेटर देण्यात आले. या कार्यक्रमात विजयजी भाजपाले यांनी प्रास्ताविक व मार्गदर्शन केले. जि.प. पूर्व प्राथमिक शाळा, पोहरा: येथील ७४ विद्यार्थ्यांना लाभ मिळाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनिता लहाने यांनी केले, तर प्रास्ताविक विजयजी भाजपाले यांनी मांडले. जिजाऊ मुलींचे वसतिगृह, आलाडोह: या वसतिगृहातील ३५ विद्यार्थिनींना स्वेटरचे वाटप करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिक एम. अशरफ काका, विठ्ठलराव लकडे आणि गृहिणी वर्षा चौधरी उपस्थित होते. जि.प. पूर्व प्राथमिक शाळा, मोथा: येथील तब्बल १५० विद्यार्थी या उपक्रमामुळे लाभान्वित झाले. याप्रसंगी गट शिक्षणाधिकारी जावेद आणि संपूर्ण शाळा समिती व शिक्षकवृंद उपस्थित होता. जि.प. पूर्व प्राथमिक शाळा, मनभंग: येथील ७२ गरजू विद्यार्थ्यांनाही स्वेटर वाटप करण्यात आले.

हा संपूर्ण उपक्रम पूर्णपणे विनाशासकीय अनुदानावर चालत असल्याने, तो यशस्वी करण्यासाठी 'साद' संस्थेचे सचिव आनंद ढगे, सहसचिव डॉ. स्वप्निलजी पोतदार, विजयजी भाजपाले, मनिषजी कुलकर्णी, वैभवजी डांगे आणि डॉ. सुरुची काकडे यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. तसेच स्थानिक पातळीवर सरपंच सरिताताई धुर्वे व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा अनिता खेडकर यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी दिल्ली येथील 'टिना रबर अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड' चे व्यवस्थापकीय संचालक तसेच नागपूरच्या सोलर इंडस्ट्रीज संचालक श्यामल चॅटर्जी, आणि अमरावती चे व्यवसाई सुनीलजी कामदार व विनोदजी डागा यांनी सढळ हाताने आर्थिक मदत केली. सदर कार्यक्रमाला अनिश सरवैया, ॲड. राजेश मुंदडा, गटशिक्षणाधिकारी बी.आर. गिरासे, विस्तार अधिकारी शेख जावेद, केंद्र समन्वयक प्रशांत उंडे, मुख्यध्यापक मणभंग स्मिता निरातकर हे उपस्थित होते.

श्री हव्याप्र मंडळाचा 'मल्लखांब' युनेस्कोच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

चीनमध्ये होणाऱ्या जागतिक महोत्सवात भारतीय पारंपरिक खेळांचा गौरव

अमरावती/ का.प्र.

भारतीय पारंपरिक खेळांच्या जतन आणि संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी कार्यरत असलेल्या आयसीएच एनजीओ फोरमच्या 'हेरिटेज अलाइव्ह' उपक्रमांतर्गत आयोजित आंतरराष्ट्रीय चित्रपट निवड प्रक्रियेत मंडळाच्या 'मल्लखांब' या चित्रपटाची पहिल्या सहा चित्रपटांमध्ये निवड झाली आहे.

चीनमधील शियामेन येथे ३० नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२६ दरम्यान होणाऱ्या अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या जतनासंदर्भातील आंतरसरकारी समितीच्या २१व्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

जगभरातील पारंपरिक कला, क्रीडा, संस्कृती आणि लोकपरंपरांचे महत्त्व चित्रपटांच्या माध्यमातून महत्व समाजाला पटवून देणे तसेच या सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी कार्यरत संस्थांच्या प्रयत्नांना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा 'हेरिटेज अलाइव्ह' उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत जागतिक स्तरावर सादर करण्यात आलेल्या ७० चित्रपटांमधून सात परीक्षकांनी सहा निकषांच्या आधारे १४ चित्रपटांची निवड केली. त्यामध्ये श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या 'मल्लखांब' चित्रपटाने पहिल्या सहा चित्रपटांमध्ये स्थान मिळिवले आहे.

या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर जगभरातील सुमारे २०० स्वयंसेवी संस्थांचा सहभाग अपेक्षित असून, विविध देशांच्या सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडविणारे चित्रपट सादर केले जाणार आहेत.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे आंतरराष्ट्रीय समन्वयक प्रा. प्रणव चेंडके हे युनेस्कोच्या आयसीएच एनजीओ फोरमच्या कार्यकारी समितीचे सदस्य असून, भारतीय पारंपरिक खेळांचा जागतिक स्तरावर प्रचार व प्रसार करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या पुढाकारातून भारतीय मल्लखांब या वैशिष्ट्यपूर्ण पारंपरिक क्रीडाप्रकाराची ओळख आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने हा चित्रपट साकारण्यात आला आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शन व लिखाण प्रा. शुभम ठाकरे आणि प्रा. प्रणव चेंडके यांनी केले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे. तसेच प्रा. प्रणव चेंडके, प्रा. शुभम ठाकरे आणि संपूर्ण चित्रपट निर्मिती पथकाचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा वाढता भार

अध्यापनावर परिणाम होण्याची शक्यता



अमरावती/ का.प्र.

शाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकांवर असताना त्यांच्याकडे सातत्याने विविध अशैक्षणिक कामे सोपविली जात आहेत. त्यामुळे शिक्षकांचा मोठा वेळ अध्यापनाऐवजी प्रशासकीय कामांमध्ये खर्च होत असून त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रात शिक्षकांना एसआयआरच्या कामात गुंतविण्यात आले होते. या कामामुळे नियमित अध्यापनात अडथळे निर्माण झाले. आता दुसऱ्या सत्रात शिक्षकांवर जनगणनेची जबाबदारी सोपविण्यात येणार असल्याने त्यांची पुन्हा एकदा धावपळ होणार आहे. एसआयआरच्या कामासाठी २५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याने शिक्षकांवरील कामाचा ताण आणखी वाढला आहे.

जनगणनेच्या तयारीसाठी २१ डिसेंबर ते १० जानेवारीदरम्यान प्रगणक आणि पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याला तीन ते चार दिवसांचे प्रशिक्षण घ्यावे लागणार आहे. त्यानंतर २१ जानेवारी ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत प्रत्यक्ष जनगणनेचे काम पार पडणार आहे. २८ फेब्रुवारीच्या मध्यरात्री बेघर नागरिकांची गणना केली जाणार असून, १ ते ५ मार्चदरम्यान पुनर्गणना होणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेत शिक्षकांचा मोठा वेळ खर्च होणार आहे.

शिक्षकांचे मुख्य कार्य विद्यार्थ्यांना शिकविणे, त्यांच्या शैक्षणिक अडचणी दूर करणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे आहे. मात्र, सततच्या अशैक्षणिक जबाबदाऱ्यांमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे पुरेसे लक्ष देणे कठीण होत आहे. त्यामुळे शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करून त्यांचा अधिकाधिक वेळ अध्यापनासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. यावेळी संकलित चाचणी १ ते ५ डिसेंबरला पॅडची परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यामुळे परीक्षेचा निकाल वेळेने लागणार आहे. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकांना आवश्यक शैक्षणिक वातावरण आणि पुरेसा वेळ मिळणे गरजेचे आहे. अन्यथा प्रशासकीय कामांच्या वाढत्या ओझ्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शेतकऱ्यांच्या घरी जाऊन आ. केवलराम काळेंनी साजरी केली दिवाळी

फळबाग उत्पादक शेतकऱ्यांशी साधला संवाद!

अचलपूर/ वार्ताहर

दिवाळीचा सण सर्वत्र उत्साहात साजरा होत असताना मेळघाट विधानसभा मतदारसंघाचे आमदार केवलराम काळे यांनी अचलपूर तालुक्यातील पश्रोट येथील फळबाग उत्पादक शेतकरी बांधवांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेत दिवाळीचा आनंद साजरा केला.



यावेळी आ. केवलराम काळे यांनी शेतकऱ्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देत त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधला. शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांच्या अडचणी आणि शेतीविषयक प्रश्न जाणून घेतले. लोकप्रतिनिधी म्हणून शेतकऱ्यांच्या बांधावर आणि त्यांच्या घरी जाऊन त्यांच्याशी संवाद साधण्याचा हा उपक्रम उपस्थितांसाठी विशेष ठरला. 'बळीराजाच्या चेहऱ्यावरील आनंद हीच माझ्यासाठी खरी दिवाळी आहे. शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हे माझे कर्तव्य आहे,' अशी भावना यावेळी आ. केवलराम काळे यांनी व्यक्त केली. या भेटीदरम्यान भाजप तालुकाध्यक्ष समीर हावरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अतुल वाट, भाजप महासचिव सुधीर रसे, विनोद खलोकार, दिनेश चव्हाण, आकाश जयस्वाल, सुजित भास्कर यांच्यासह गावकरी, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकरी बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्याच्या या उपक्रमातून आ. केवलराम काळे यांनी शेतकऱ्यांशी असलेली आपुलकी आणि जिव्हाळ्याचे नाते अधोरेखित केले.

निधन वार्ता

प्रमिला बिंड

कुऱ्हा - येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अंबापेट शाखा कुऱ्हाचे स्वयंसेवक राजेश रमेशराव बिंड यांच्या मातोश्री प्रमिला रमेशराव बिंग यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती दोन मुलं राजेश, योगेश असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्व. प्रमिला बिंड यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरातील गावकरी व नातेवाईक उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.



सविता देशमुख

आसरा - येथील प्रतिष्ठित नागरिक श्री सुधाकरराव देशमुख यांच्या पत्नी सविता सुधाकरराव देशमुख यांचे ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती, मुले धिरज व पराग, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. आपला संपूर्ण गावात, कुटुंबातील नातेसंबंधात त्या आपल्या शांत, प्रेमळ, विनम्र व मनमिळावू स्वभावामुळे सर्वांना सुपरिचित होत्या. कोणाच्याही सुखदुःखात धावून जाण्यासाठी त्या नेहमी तत्पर असायच्या, त्यामुळे त्यांच्या निधनामुळे परिवारासह गावात सर्वत्र शोककळा पसरली आहे.



शुद्ध पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर

जिल्ह्यातील १०६ पाणी नमुने दूषित; १८ स्त्रोतांमध्ये 'नायट्रेट'चे घातक प्रमाण

अमरावती/ का.प्र.

जिल्ह्यातील ग्रामीण भागात शुद्ध पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून, गेल्या सात महिन्यांत तपासण्यात आलेल्या पाणी नमुन्यांपैकी १०६ नमुने पिण्यायोग्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष न म्हणजे, रासायनिक तपासणीत तब्बल १८ ठिकाणच्या पाण्यात आरोग्यास घातक असणाऱ्या नायट्रेटचे प्रमाण आढळून आल्याने चिंतेचे वातावरण या पार्श्वभूमीवर संबंधित अण्णा स्त्रोतांच्या शुद्धीकरणासाठी पाणी स्त्रोतांचायोजना हाती घेण्यात आल्या आहेत.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधील विविध स्त्रोतांचे रासायनिक आणि जैविक नमुने गोळा करण्यात आले. एकूण १० हजार ४२५ नमुन्यांची प्रयोगशाळेत तपासणी करण्यात आली. यात



रासायनिक विश्लेषणासाठी घेतलेल्या १ हजार ८१३ नमुन्यांपैकी २१, तर जैविक तपासणीच्या ८ हजार ६१२ नमुन्यांपैकी ८५ नमुने दुषित आढळले. विहिरी, कूपनलिका आणि नळयोजनांमधून हे पाणी नमुने संकलित केले जातात. दुषित आढळलेल्या सार्वजनिक विहिरी व अन्य स्त्रोतांमध्ये तातडीने क्लोरिनेशन करून निर्जंतुकीकरण केले जात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

'ओटी टेस्ट' द्वारे चाचणी

ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्यावर बारीक लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक गावात 'जलसुरक्षक' नियुक्त करण्यात आले असून, त्यांच्यामार्फत दररोज पाण्याची 'ऑर्थोटोलोडीन' (ओटी) चाचणी केली जात आहे.

नायट्रेटचा धोका वाढला

पाण्यातील नायट्रेटचे प्रमाण विहित मयदिपेक्षा जास्त असणे मानवी आरोग्यासाठी, विशेषतः लहान मुलांसाठी अत्यंत घातक ठरू शकते. रासायनिक तपासणीत १८ ठिकाणच्या स्त्रोतांमध्ये नायट्रेटचे प्रमाण अधिक नोंदवले गेल्याने अशा गावांमध्ये विशेष दक्षता घेतली जात असून, दूषित स्त्रोतांच्या शुद्धीकरणावर भर दिला जात आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

दिवाळीच्या रात्री तरुणाची गळा चिरून हत्या!

महेंद्र कॉलनीतील घटना; तिघांना अटक, एक आरोपी फरार

अमरावती/प्रतिनिधीः- जुन्या वैमनस्यातून दिवाळीच्या रात्री एका ३१ वर्षीय तरुणाची चाकूने गळ्यावर वार करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील महेंद्र कॉलनीत घडली. चैतन्य ऊर्फ निक्कू राजेंद्र कचरे (वय ३१) असे मृत तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी चार जणांविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला असून, भूषण राजेश टाले, राजू शरद काळे आणि विशाल श्यामबहादूर यादव या तिघांना अटक केली आहे. तर एक आरोपी फरार आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मृत चैतन्यचे वडील राजेंद्र तुलसीराम कचरे (वय ६५) हे एसटी महामंडळातून चालक पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, चैतन्य आणि महेंद्र कॉलनीतील राजू काळे यांच्यात सुमारे सहा ते सात वर्षांपूर्वी वाद झाला होता. त्यावेळी चैतन्यने राजूवर चाकूने हल्ला केला होता. या प्रकरणी गुन्हा दाखल होऊन चैतन्यला अटकही झाली होती. तेव्हापासून दोघांमध्ये वैमनस्य असल्याचे तक्रारीत नमूद आहे. रविवारी ८ नोव्हेंबर रोजी रात्री सुमारे १० वाजता चैतन्य घरी झोपलेला असताना त्याच्या मोबाइलवर विशाल यादव याचा फोन आला. फोनवर राजू काळेदेखील बोलत होता. त्यांनी चैतन्यला महेंद्र कॉलनीतील रेतीच्या ठिय्यावर दारू पिण्याच्या बहाण्याने बोलावले. वडिलांनी जाण्यास मनाई केली असतानाही चैतन्य आपल्या मोपेडने तेथे गेला. चैतन्य घटनास्थळी पोहोचताच तेथे दबा धरून बसलेल्या गुल्ल्या नामक आरोपीने रात्री त्याच्या ☞(पान २ वर)

ऊर्ध्व वर्धा प्रकल्प क्षेत्रात पाणीटंचाई

-रब्बी हंगामासाठी पाणी सोडणे अशक्य
-धरणात एकूण क्षमतेच्या ४१.८६ टक्के पाणीसाठा

अमरावती/प्रतिनिधीः- यंदाच्या रब्बी हंगामासाठी ऊर्ध्व वर्धा प्रकल्पातून (अप्पर वर्धा धरण) सिंचनासाठी पाणी सोडणे शक्य होणार नाही, असे जलसंपदा विभागाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. यावर्षी पडलेला अपुरा पाऊस आणि अल-निनो तसेच आयओडी (इंडियन ओशीयन डायपोल) च्या प्रभावामुळे धरणातील उपयुक्त पाणीसाठा घटला आहे. धरण क्षेत्रात पाणीसाठा शिल्लक नसल्यामुळे यंदा रब्बी हंगाम २०२६-२७ राबविणे शक्य होणार नसून उपलब्ध पाणी केवळ पिण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आल्याचे ऊर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.गु.उमप यांनी कळविले आहे. पाटबंधारे विभागाने जाहीर प्रकटनानुसार, ऊर्ध्व वर्धा प्रकल्पांतर्गत धरणाची सद्यस्थिती आणि पाणी नियोजनाची माहिती कळविली आहे. त्यानुसार ९ नोव्हेंबर २०२६ पर्यंत धरणात एकूण क्षमतेच्या ४१.८६ टक्के (२३६.१० दश लक्ष घनमिटर) उपयुक्त



पाणीसाठा असून वार्षिक सरासरी बाष्पीभवनाप्रमाणे यातील ८८.५१ दलघमी पाणीसाठा कमी होणार आहे. धरण परीक्षेत्रातील महानगरपालिका, नगरपरिषदा, ग्रामपंचायती आणि शासनाच्या अन्य पाणीपुरवठा योजनांसाठी ६६.८४ दलघमी पिण्याचे पाणी आणि औद्योगिक वार्षिक एकूण २९.७५ दलघमी पाणी आरक्षित करण्यात आले आहे. तर शासकीय निर्णयाच्या अधीन राहून ३३.०९ दलघमी म्हणजेच १० टक्के पाणी हे आकस्मीक राखीव साठा म्हणून ठेवण्यात आले आहे. गुरे-जनावरांसाठी १० दलघमी पाण्याचा राखीव साठा ठेवण्यात आला असल्याने शेतीच्या रब्बी हंगामासाठी धरणात पाणी शिल्लक नसल्याचे ऊर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागाद्वारे कळविण्यात आले आहे.

शासकीय आदेशानुसार, भविष्यात प्रत्यक्षात पाऊस पडून धरणात उपलब्ध होणाऱ्या पाणी साठयातून प्रथम पिण्यासाठी, बीज निर्मितीसाठी व औद्योगिक वापरासाठी पाणी आरक्षित करण्यात येणार आहे. त्यानंतर उपलब्धता लक्षात घेऊन सिंचनासाठी पाणी सोडण्यात ☞(पान २ वर)

ग्रामीण भागात १८ पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश

अमरावती/प्रतिनिधीः- जिल्ह्याच्या ग्रामीण भागात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि कोणताही अनुचित प्रकार टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे प्रतिबंधक आदेश लागू केले आहेत. १८ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री २४.०० वाजेपर्यंत प्रभावी राहतील.अपर जिल्हादंडाधिकारी संतोष काकडे यांनी याबाबतचे अधिकृत आदेश निर्गमित केले आहेत.

जिल्ह्यात स्थानिक पक्ष, संघटना, विविध विद्यार्थी संघटना आणि शेतकरी संघटनांकडून विविध मागण्यांसाठी उपोषणे व आंदोलने केली जात आहेत. दीपावली आणि इतर सणांच्या पार्श्वभूमीवर शहरात व ग्रामीण भागात महालक्ष्मी व इतर सार्वजनिक कार्यक्रमांची स्थापना करण्यात आली आहे. काही खोडसाळ समाजकंटकांकडून क्षुल्लक कारणावरून वाद निर्माण करून शांतता भंग होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे आदेशात नमूद केले आहे.

हा आदेश केवळ अमरावती जिल्ह्याच्या ग्रामीण भागासाठी लागू असणार असून, पोलीस प्रशासनाला ☞(पान २ वर)

कोकर्ड्यात विविध मागण्यांसाठी युवकांचे साखळी उपोषण

-संथगतीने रस्त्याचे कामासह स्वतंत्र विज उपकेंद्राचा प्रश्न ऐरणीवर



खल्लार/प्रतिनिधीः- येथून जवळच असलेल्या कोकर्डा परिसरातील प्रलंबित विकासकामे आणि शेतकऱ्यांच्या विज समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कोकर्डा येथे युवकांच्या वतीने साखळी उपोषणाला आजपासून (दि.९) सुरुवात करण्यात आली आहे.

या आंदोलनातून कोकर्डा ते कोकर्डा फाटा रस्त्याचे संथगतीने सुरू असलेले काम आणि शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र विज उपकेंद्र उभारण्याची मागणी प्रामुख्याने करण्यात येत आहे.

कोकर्डा ते कोकर्डा फाटा या रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असून ☞(पान २ वर)

वंशपरंपरेने चालत आलेली परंपरा

४०० वर्षांपासून मोर्शीत दिवाळीच्या रात्री धेंडाई काढण्याची प्रथा!

मोर्शी/प्रतिनिधीः- मोर्शी शहरातील संत्रानगरीत दिवाळीच्या रात्री धेंडाई काढण्याची प्रथा ४०० वर्षांपासून मोर्शी शहरात जपली जात आहे. येथे धेंडाईची वेगवेगळी चार मंडळे असून,त्यात काही वंशपरंपरेने चालत आलेली आहेत.धेंडाई हा एक आगळावेगळा व पारंपरिक प्रकार मोर्शी शहरात पहायला मिळतो. जिल्ह्यातील सावंगा येथून धेंडाई काढण्यास सुरूवात झाली असे ग्रामस्थ सांगतात.राज्यात अवधुती पंथ,वैष्णवीपंथ आणि महानुभाव



पंथ असे तीन पंथ प्रामुख्याने मानले जातात.त्यापैकी अवधुती पंथाने धेंडाईची सुरूवात केली. धेंडाई ही संपूर्ण लाकडापासून पालखीसारखी बनविलेली असते.दोन माणसांना उचलता येईल अशी समोर आणि मागच्या बाजूला ☞(पान २ वर)

दहा क्विंटल झेंडूची फुले नागरिकांना दिली मोफत!



-सातेगावात अनोखा उपक्रम

अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः- दिवाळीचा सण म्हटला की, श्रीमंतापासून ते गरीबांपर्यंत सर्वांच्याच मनात एक वेगळाच उत्साह आणि आनंद असतो. मात्र, यावर्षी पडलेल्या कोरड्या दुष्काळामुळे सर्वसामान्य नागरिकांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. अशा कठीण परिस्थितीतही दिवाळीचा सण आनंदाने साजरा व्हावा आणि सणावर दुष्काळाचे सावट येऊ नये, यासाठी अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सातेगाव येथे तब्बल १० क्विंटल झेंडूची ☞(पान २

गोकुळ निवडणुकीतील सत्तेचे गणित बदलण्याचा बेकायदेशीर प्रयत्न रोखा

मोर्शी शहर काँग्रेस कमिटीची मागणी, तहसिलदारांना निवेदन

मोर्शी/प्रतिनिधीः- कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत दूध उत्पादकानी दिलेला लोकशाही कौल डावलून शासन नियुक्त सदस्यांच्या माध्यमातून सत्तेचे गणित बदलण्याच्या बेकायदेशीर प्रयत्न रोखण्यात यावा, अशा आशयचे निवेदन मोर्शी शहर काँग्रेस कमिटी तर्फे विपुल भडांगे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीचे सचिव



यांचा नेतृत्वात नायब तहसीलदार विनोद वानखडे यांना निवेदन देण्यात आले.

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या निवडणुकीत काँग्रेसचे नेते आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजश्री शाहू ☞(पान २ वर)

पोलीस आयुक्तालय क्षेत्रात

१५ दिवसांसाठी प्रतिबंधात्मक आदेश

अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती शहर आणि पोलीस आयुक्तालय परिक्षेत्रात सार्वजनिक सुरक्षितता राखण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ३७ (१) आणि ३७ (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. हे आदेश ८ नोव्हेंबर २०२६ रोजी मध्यरात्री १२.०१ वाजेपासून ते २२ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री २४.०० वाजेपर्यंत (एकूण १५ दिवस) लागू राहतील, अशी माहिती अमरावतीचे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी दिली आहे.

सार्वजनिक सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ नये, यासाठी सक्षम अधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीशिवाय कोणत्याही मानवी मेळाव्याचे किंवा मिरवणुकीचे आयोजन करण्यास बंदी घालण्यात आली आहे.अंत्ययात्रा वगळता इतर कोणत्याही मिरवणुकीसाठी संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक असेल. परवानगी देण्यापूर्वी स्थानिक पोलीस ठाणे अधिकाऱ्यांनी पोलीस उपायुक्त तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांच्याशी चर्चा करणे आवश्यक आहे. या आदेशाचे किंवा अधिसूचनेचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर 'महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५' मधील तरतुदींनुसार कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

ज्येष्ठ पत्रकार डॉ. संजय भक्ते यांचे आकस्मिक निधन

नागपूर/प्रतिनिधीः- ज्येष्ठ पत्रकार, लेखक, विचारवंत तथा आकाशवाणी नागपूरचे सेवानिवृत्त सहाय्यक केंद्र संचालक डॉ. संजय यशवंतराव भक्ते यांचे रविवार, दि. ८ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच पत्रकारिता, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली असून विविध स्तरांतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



डॉ. संजय भक्ते हे आपल्या परखड लेखणीसाठी आणि निर्भीड विचारांसाठी परिचित होते. समाजातील चुकीच्या प्रवृत्ती, अन्याय आणि अनिष्ट बाबींवर त्यांनी नेहमीच स्पष्ट व ठाम भूमिका मांडली. कोणत्याही दबावाला बळी न पडता आपल्या विचारांशी प्रामाणिक राहणे, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. लेखक, विचारवंत आणि पत्रकार म्हणून त्यांनी आपल्या स्वतंत्र विचारशैलीचा ठसा उमटविला होता. आकाशवाणी नागपूर येथे सहाय्यक केंद्र संचालक म्हणून त्यांनी प्रदीर्घ काळ सेवा बजावली. शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही लेखन, वैचारिक मांडणी आणि सामाजिक विषयांवरील परखड भाष्य यातून त्यांचा सक्रिय सहभाग कायम होता. सहकारी मित्रांशी जिव्हाळ्याचे संबंध जपणारे, सर्वांना मार्गदर्शन करणारे आणि प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व अनेकांच्या स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने पत्रकारिता आणि वैचारिक क्षेत्रातील एक निर्भीड आवाज हरपला असून मित्रपरिवार, सहकारी आणि चाहत्यांमध्ये दुःख व्यक्त होत आहे.

त्यांच्या पश्चात कुटुंबीय आणि मोठा मित्रपरिवार, आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर आज मानेवाडा घाट नागपूर येथे अंत्यसंस्कार पार पडले. याबेळी त्यांच्या नातेवाईकासह पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

